बुध्दधम्म परिचय
विद्यार्थ्यांकरिता



लेखक
भन्ते. डॉ. सी. फँनचँम

अनुवादक
आर. ए. खिल्लारे, औरंगाबाद

बुध्दधम्म परिचय

(विद्यार्थ्यांकरिता)

● लेखक ●

भन्ते. डॉ. सी. फँनचँम

● अनुवादक ●

आर. ए. खिल्लारे, औरंगाबाद

बी.एस्सी. एम.ए., एम्.एड्.



प्रज्ञा प्रसार धम्म संस्कार पब्लिकेशन - १९९९

औरंगाबाद (महाराष्ट्र)

Sabbadanam dhammadanam jinati
The Gift of Dhamma excels all gifts

सब्ब दानं धम्मदानं जीनाती
धम्मदान हे सर्वश्रेष्ठ दान होय

प्रकाशक :
भिक्खू विशुध्दानंद बोधी
प्रज्ञा प्रसार धम्म संस्कार केंद्र
विप्पश्यना विद्यापीठ, बुध्दलेणी, औरंगाबाद
महाराष्ट्र - ४३१ ००१

Second edition 1993 : 2000 copies
Printed in Bangkok, Thailand.
By Pim-pun printing Ltd., Part.
34/23 Amnouysongkram Rd.,
Dusit, Bangkok 10300, Thaiand.
Tel : 662-2432945, Fax : 662-2435069

Reprinted and Donated by
The Corporate Body of the Buddha Educational Foundation
11F., 55 Hang Chow South Road Sec 1, Taipei, Taiwan, R.O.C.
Tel: 886-2-23951198 , Fax: 886-2-23913415
Email: overseas@budaedu.org.tw
Website: http: //www.budaedu.org.tw

दायक तथा मुद्रक :
द कार्पोरेट बॉडी ऑफ बुध्दा
एज्युकेशन फाउंडेशन, तायवान

अक्षर रचना
शाम एल. कुलकर्णी
ॲक्टिव्ह कॉम्प्युटर्स, जालना

प्रस्तावना

पाश्चात्त्य देशातील वाढत्या समस्यांवर बुध्दधम्म हे एक शास्त्रोक्त उत्तर आहे. ही वस्तुस्थिती असल्यामुळे बुध्दधम्माकडे पाश्चिमात्य विचारवंत, अभ्यासक व अमेरिकन अभ्यासक आकर्षित झालेले आहेत.

अमेरिकेत शाळा, महाविद्यालये व विश्वविद्यालयातून बुध्दधम्म हा एक विषय म्हणून सध्या अभ्यासला जातो. थाई बौध्दांनी अमेरिकेत बुध्दविहारांची निर्मिती केलेली असून रविवारचे धम्म वर्ग तेथे घेतले जातात. अमेरिकन जनतेसाठी त्यांनी धम्मसेवा उपलब्ध करुन दिली आहे. स्वतः लेखक वटधम्म थाई बुध्द विहार, शिकागो येथे रविवारचे धम्मवर्ग घेऊन धम्मावर व्याख्याने देतात. १९८७ पासून लोकांची मागणी व आवड लक्षात घेता शिकागो येथे त्यांनी शाळा महाविद्यालये व विश्व विद्यालयातून व्याख्याने देण्यास प्रारंभ केला आहे.

धम्मविषय जनतेची आवड व वाढती गरज लक्षात घेता ह्या पुस्तकाची निर्मिती रविवारच्या धम्मवर्गासाठी व त्या वर्गास उपस्थित राहणाऱ्या सर्वांसाठी करण्यात आलेली आहे. साधारणतः बुध्दधम्म अमेरिकेत जपान, झेनचीन व तिबेट राष्ट्राकडून आत्मसात केला गेला आहे. थेरवाद प्रणालीतील सुलभ व सोप्या भाषेतील हे एक पुस्तक आहे. बुध्दधम्म म्हणजे निसर्ग नियम होय ज्यामध्ये चार आर्यसत्य व अष्टांगिक मार्ग म्हणजेच मध्यम मार्ग सांगितलेला आहे.

आजच्या आधुनिक जगात बुध्दधम्म जीवनातील समस्यांना शास्त्रोक्त उत्तर सांगतो. त्यातील आर्य अष्टांगिक मार्गाची शिकवण आपल्याला खरा मार्ग दर्शविते. आणि आपल्या समस्यांना उत्तर सांगते की मी कोण आहे? माझ्या जीवनाचा उद्देश कोणता? आणि मी कशासाठी जीवन जगतो? जर आपण विवेकबुध्दीने व सचोटीने धम्माचा अभ्यास केला व धम्म आचरणात आणला. ध्यानभावना आंगिकारली तर मनःशान्ती आपल्यासोबत निश्चित वास करील.

ह्या आवृत्तीमध्ये अनेक सुधारणा केलेल्या आहेत व अधिक माहिती टाकलेली आहे.

आशा आहे की हे पुस्तक केवळ विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त नसुन ज्यांना बुध्दधम्माविषयी आदर आहे व जे धम्माचे अभ्यासक आहेत त्यासर्वांसाठी तेवढेच उपयुक्त आहे.

सर्वजण शत्रुत्वासासून मुक्त असोत.
सर्वजण वाईट वर्तनापासून मुक्त असोत.
सर्वजण दुःखापासून मुक्त असोत.

सर्वजण आनंदी असोत.

- May all beings be free from enmity.
- May all beings be free from all illtreatment
- May all beings be free from suffering
- May all beings be happy.

डॉ. सी. फँग चॉम

१-१-१९९३

ऋणनिर्देश

श्रीमती लोरिया लालोर, बाल पुस्तक लेखक रेव्ह. मार्थाधरमपली आणि विलीयम बरटेल यांचा मी अत्यंत ऋणी आहे. पुस्तकाचे वाचन, त्यातील दुरुस्त्या, महत्वपूर्ण सूचना व पुस्तक जुळणीची कल्पकता ह्यासाठी मला त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

वटधम्माराम रविवार पाठशाला अभ्यासमंडळ शिकागो यांचा मी अत्यंत ऋणी आहे. कारण त्या मंडळानेच मला हे पुस्तक लिहिण्यासाठी प्रोत्साहित केले व पुस्तक लिहिण्यासाठी चालना दिली.

व्यक्तीशः श्रीमती सरीन बुनयँग, मंतल सी स्वॉत व सुत्तीच्याई होमच्यून यांचा मी अत्यंत ऋणी आहे. कारण त्यांनीच पुस्तकातील चित्रे, कॉम्प्यूटर काम पूर्ण करुन दिले. त्यांनी आपला अमूल्य वेळ ह्यासाठी खर्ची घातला.

आर्थिक मदत ज्यांनी केली ते डॉ. नाकरे बुसरा, नरिसरा व नाटे थेपजात्री, डॉ. नोपरत सिरीरत सुजारिचन, डॉ. केजोरंदेज, डॉ. रापीपन कोमुत्तनोन, डॉ. भीरोम बुरनकूल व त्यांचे मित्र, डॉ. बुनयासई पी. सी., डॉ. दले रिग्वे, डॉ. दाविड विल्यम, श्री मोरकोट डावरेक, श्रीमती अमन्यूसी थीटीओरन व त्यांचा मित्र परिवार व इतर दानशूर त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. धम्मदान हे सर्वश्रेष्ठ दान होय. 'सब्ब दानं धम्मदानं जीनाती'. त्यांच्या ह्या स्तुत्य व सद्गुणी कार्यामुळे ते सर्वजण सुखी असोत. त्यांचे शांतीमय जीवन असो. व ते शेवटी जीवनाचा अत्यानंद प्राप्त करोत, निब्बाण व दिव्यत्व प्राप्त करोत.

डॉ. सी. फँग चॉम

०२-०४-१९९०

प्रकाशकीय दुसरी आवृत्ती

विद्यार्थ्यांना थाई भाषा, थाईसंस्कृति व बुध्द धम्माचे ज्ञान मिळावे ह्यासाठी इ. स. १९७९ मध्ये वत धम्मराम रविवार पाठशाला वर्गाची सुरुवात झाली. १९८६ मध्ये अभ्यासक्रम मंडळ स्थापन झाले. मंडळाने थाईभाषा, समाजशास्त्र व बुध्दधम्म ज्ञान ह्या तीन विषयात सुधारणा करण्याचे प्रयत्न केले.

बुध्दधम्म अभ्यासक्रम विभागाचे डॉ. भन्ते सी. फँगचॅम हे प्रमुख होते. त्यांनी व त्यांच्या सहकार्यांनी परिश्रमपूर्वक सुंदर असे धम्म अभ्यासासाठी हे पुस्तक तयार केले. आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहोत.

ह्या पुस्तकांची मागणी केवळ शिक्षक व विद्यार्थी ह्यांच्यापुरती मर्यादित राहिली नसून अन्य वाचकवर्ग अमेरिका व इतर देशामधुन वाढल्यामुळे पुस्तकांच्या प्रतीचा तुटवडा भासत आहे.

आजच्या आधुनिक समाजासाठी धम्म प्रचाराची गरज आहे ह्याची जाणीव वतधम्मराम संस्थेस झालेली आहे. म्हणूनच संस्थेने हे पुस्तक प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली.

आम्हाला आशा आहे की हे पुस्तक केवळ रविवारच्या वर्गासाठी येणाऱ्या शिक्षक विद्यार्थ्यासाठीच उपयोग नसुन अन्य वाचक वर्ग जो अमेरिका व इतर देशामध्ये आहे त्यांनासुध्दा उपयुक्त ठरेल.

ज्यांनी ज्यांनी ह्या पुस्तक प्रकाशन कार्यासाठी हातभार लावला ते सर्वजण बुध्द धम्म व संघशक्तीच्या द्वारे आनंदी असोत. तद्वत्च त्यांचे कौटूंबिक जीवन सुखी समाधानी असो.

फ्रा-तेप्रासित्धिमोन्त
अध्यक्ष
वतधम्मराम, शिकागो इल्लिनॉईस
यू.एस्.ए. १-१-१९९३

अनुवादकाचे दोन शब्द

आदरणीय भन्ते डॉ. सी. फँगचँम यांनी विद्यार्थ्यांसाठी लिहीलेले पुस्तक *Buddhism for young students* प्रथम हातात पडले असता मला खूपच आवडले. त्याचवेळी निश्चय केला की, बहुसंख्य मराठी भाषिक विद्यार्थ्यांना व धम्म वाचकांना जर हे पुस्तक प्रादेशिक भाषेत त्यांच्यापर्यंत पोहोचविले तर अत्यंत उपयुक्त ठरेल. असे वाटल्याने त्याचा अनुवाद केला. हे पुस्तक म्हणजे धम्मपरिचय आपल्या पुढे सादर करतांना मला अतिशय आनंद होत आहे. काही अंशी धम्मकार्यात सहभागी झाल्याबद्दल मी स्वतःला धन्य समजतो.

आदरणीय भन्ते डॉ. सी. फँगचँम यांना प्रकाशन हक्कासाठी विनंती केली असता त्यांनी विना विलंब मला पत्र लिहून त्यांचा आशिर्वाद कळविला त्याचप्रमाणे भन्ते विशुध्दानंद बोधी, विप्पश्यना केंद्र, औरंगाबाद व भन्ते सुमेध बोधी, वटफळी, जि. अमरावती यांनी मला अधिक प्रोत्साहित केले.


धम्मपरिचय हे पुस्तक सर्व दृष्टीने परिपूर्ण आहे. कोणत्याही पुस्तकाचे तीन भाग पडतात. प्रस्तावना हे पुस्तकाचे डोके होय, मध्यवर्ती गाभा हे त्याचे धड तर शब्दसूची हातपाय होत. ह्यापैकी एक भाग जरी नसला तर ते पुस्तक अपूर्ण होय. धम्म परिचय ह्या पुस्तकामध्ये आदरणीय भन्ते डॉ. सी. फँगचँम यांनी त्या पध्दतीने ह्याची मांडणी केलेली आहे. प्रस्तावनेपासून ते शेवट शब्दसूचीपर्यंत धम्मपरिचय केलेला आहे. त्यातील शब्द न् शब्द प्रत्येकाला वाचावासा वाटतो. त्यामुळे ह्यातील हा भाग वाचू नये अशी भावना तयार होत नाही.

धम्म परिचय ह्या पुस्तकामधुन प्राथमिक स्वरुपाचे धम्मज्ञान होण्यास आपणास निश्चितच मदत होईल. मला आशा आहे की वाचकांना हे पुस्तक आवडेल.

आर. ए. खिल्लारे, औरंगाबाद

– अनुवादक –

अनुक्रमणिका



सारनाथ



भाग पहिला

बुध्दधम्मचा इतिहास व बुध्दाची शिकवणूक

१. बुध्दाचे जीवन

फार वर्षापूर्वी नेपाळ देशामध्ये शाक्यांचे राज्य होते. कपीलवस्तू ही त्यांची राजधानी होती आणि राजाचे नांव होते गौतम शुध्दोधन. गौतम कुळात राजा शुध्दोधनची जन्म झाला होता.

राजाला सुंदर अशी महामायावती नावांची राणी होती. लुंबिनी वनात सालवृक्षाखाली पौर्णिमेच्या दिवशी वैशाख महिन्यात राणी महामायावतीने राजपुत्रास जन्म दिला. राजाने त्याचे नाव सिध्दार्थ ठेवले. सिध्दार्थ सात दिवसांचा असतांना राणी महामायावतीचे निर्वाण झाले. त्यानंतर त्याचे संगोपन मावशी महाप्रजापती हिने केले. जीवनाचा प्रारंभीचा काळ सिध्दार्थाने ऐश्वर्य व आनंदात घालविला. वयाच्या सोळाव्या वर्षी राजकन्या यशोधराबरोबर विवाह केला. सिध्दार्थाचे पुढील तेरा वर्षांचे वैवाहिक जीवन सुखात गेले. त्यांना एक पुत्र प्राप्ती झाली. त्याचे नांव राहूल होते. एके दिवशी सिध्दार्थ, उद्यानात फिरावयास जातांना त्याच्या नजरेस चार घटना आल्या. ज्यामुळे त्याला जीवनाविषयी खूप विचार पडला. त्याने एक वृध्द मनुष्य पाहिला, एक आजारी मनुष्य पाहिला, एक प्रेत पाहिले व एक साधु पाहिला..........

त्याच्या लक्षात त्याचवेळी आले की, विलासी जीवनातून जीवनाचा खरा आनंद प्राप्त होत नाही. जेव्हा इतर लोक दुःखी आहेत तेंव्हा आपण शाश्वत सुखी नाहीत. त्यांना शाश्वत सुख सर्वासांठी हवे होते. त्या खऱ्या सुखात सर्व जनतेचा सहभाग हवा होता.

वयाच्या एकोणतीसाव्या वर्षी एका अंधाऱ्या रात्री त्यांनी सर्व ऐश्वर्याचा त्याग केला. राजमहल, संपत्ती, सुंदरपत्नी व प्रिय पुत्राचा जगाकरीता सुख शोधण्याच्या कार्यासाठी त्याग केला. ते साधू झाले व पुढील सहा वर्षे ब्राह्मण शिक्षकासोबत कठीण तपश्चर्येत सुख शोधण्यासाठी वनात घालविले. परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही.

शेवटी त्यांच्या लक्षात आले की टोकाची तपश्चर्या ही उपयोगी नाही. व ब्राम्हण

शिक्षकांना सत्याविषयी माहिती नाही. तेव्हा त्यांनी त्या ब्राम्हण शिक्षकास सोडले व टोकाची तपश्चर्या करण्याचे सुध्दा वर्ज्य केले. त्याचप्रमाणे आत्मरंजना मधुन सुध्दा जीवनाच्या खऱ्या सुखाची प्राप्ती होत नाही ह्याची सुध्दा त्यांना जाणीव होती. म्हणून त्यांनी टोकाची तपश्चर्या व आत्मरंजन यांचा मधील मार्ग शोधला. त्यास सुवर्णमध्यपथ तथा मध्यम मार्ग म्हणतात.

सहा वर्षाच्या भ्रमंतीनंतर वैशाख पौर्णिमेच्या (वैशाख) दिवशी ते बोधीवृक्षाखाली ध्यानस्थ बसले. त्यावेळी त्यांना खऱ्या शाश्वत सुखाची जाणीव झाली. सुखाच्या मार्गाचा शोध त्यांनी स्वतःच्या प्रयत्नातूनच लावला. त्यालाच आपण "दिव्यत्व" प्राप्ती असे म्हणतो. त्यादिवसापासून सिध्दार्थ बुध्द झाले. दिव्यपुरुष, संबोधीप्राप्त पुरुष म्हणून सर्वांना ज्ञात झाले. बुध्दाला खऱ्या सुखाचा मार्ग सापडला. त्यांना माहित होते की, जीवनात अनेक समस्या असतात. जीवन हे दुःखमय आहे. त्यांनी तीन तत्वे जगाला सांगितली.

१) मन शुध्द ठेवावे

२) कोणतेही वाईट कृत्य करु नये.

३) सतत चांगले कार्य करावे.

दिव्यत्वप्राप्तीनंतर दोन महिन्यांनी त्यांनी जगाला सत्य सांगण्यास प्रारंभ केला. त्यालाच आपण धम्म म्हणतो. असंख्य शिष्यांनी त्यांची शिकवण आत्मसात केली. त्यामुळे त्यांना जीवनाच्या खऱ्या सुखाचा आनंद मिळाला. बुध्दाच्या शिकवणूकीमुळे त्यांच्या शिष्यवर्गात खुप वाढ झाली. तेंव्हा पासून भारतात बुध्दधम्म कायमस्वरुपी प्रस्थापित झाला.

सतत पंचेचाळीस वर्षे भारतभर शाश्वत जीवनमार्गाचा संदेश देत, बुध्द भ्रमण करीत राहिले. शेवटी वयाच्या ऐंशीव्या वर्षी बुध्दास ज्ञात झाले की आपला परिनिर्वाण काळ समीप आला आहे. ते कुशीनगर येथे गेले व वैशाख पौर्णिमेच्या दिवशी सालवृक्षाखाली निर्वाण प्राप्त केले. त्यांनी आपल्यासाठी मौल्यवान, चिरस्थायी व जीवनाच्या खऱ्या सुखाच्या मार्गाची शिकवण मागे ठेवली.



२. त्रिमितीय बुध्दाची शिकवण

आज रविवार आहे. सुंदरला सुट्टी आहे. सकाळी लोक जागे होत आहेत. कोवळ्या प्रकाशांचा आनंद घेत आहेत. लहान मुले आनंदाने बागडतात, हसतात. कुत्रे सकाळच्या प्रहरी भुंकत आहेत, पक्षांची किलबील ऐकू येत आहे. अशा एका शान्त प्रहरी सुंदरसुध्दा रविवारचा आनंद घेत आहे. तो रोज शाळेत जातो पण आज त्याच्या शाळेला सुट्टी आहे. तो प्रथम घरकामात मदत करतो व नंतर विहारास जातो. तेथे सुंदरची आजी भिक्खूचे सकाळचे जेवण तयार करते. सुंदर आजीला ह्या कामात मदत करतो. भिक्खूंना जेवण देतो. त्यावेळी सुंदर आजीला विचारतो, "आजी भिक्खू स्वतः काम कां करीत नाहीत? ते काम करीत नाहीत कारण त्यांचे जीवन आपल्यासारख्या सामान्य माणसावर अवलंबून आहे. सुंदरची आजी उद्गारली! असे कां! सुंदर उद्गारला! बुध्द तत्वाप्रमाणे भिक्खू सर्वस्व त्याग करुन निर्धन बनतात. ते आपले जीवन बुध्दधम्माचा अभ्यास करण्यात व धम्म आचरणात घालवितात. नंतर सामान्य लोकांना ते धम्म शिकवितात.

आजी धम्म म्हणजे काय?

सुंदर! धम्म म्हणजे बुध्दाने स्थापन केलेला बुध्द धम्म होय.

त्यांनी कोणत्या प्रकारचा धम्म शिकविला? त्यांनी खुप काही सांगितले. त्यापैकी महत्वाची धम्म तत्वे कोणती? आजी जरा सावध झाल्या व सुंदरला विचारपूर्वक धम्माची माहिती देऊ लागल्या.

सुंदर! तु फारच चिकित्सक आहेस! ठीक आहे बुध्दाची सर्वच शिकवणूक महत्वाची आहे. तरी परंतु आपण सोपे व सहज समजेल असे तीन भाग पाहू! त्याला आपण तीन तत्वं म्हणूत! आजी ती तीन तत्वे कोणती?

वाईटकृत्ये करु नये, ती नेहमी टाळावित.

सतत चांगली कृत्ये करावित.

मन नेहमी विशुध्द असावे.

सुंदर, आजीने सांगितलेल्या तीन बाबीमुळे गोंधळून गेला व आजीला म्हणाला, ''आजी वाईटकृत्ये करु नये म्हणजे काय?'' ठीक आहे ह्याचा अर्थ असा की! हत्त्या करु नये, चोरी करु नये, व्यभिचार करु नये, खोटे बोलू नये, मद्यपान करु नये, नशील्या पदार्थाचे सेवन करु नये, दुसऱ्याबद्दल अपशब्द वापरु नये व दुसऱ्याविषयी वाईट बोलू नये! आपसात भांडण करणे म्हणजे वाईटकृत्ये होय. ठीक आहे! आजी! तर दुसरे तत्व सांग ना! सतत चांगले कृत्ये करावे स्वतःवर जसे आपण प्रेम करतो त्याप्रमाणेच इतरावर सुध्दा प्रेम करावे. दुसऱ्यास मदत करावी! शाळेत नियमीत जावे. शालेयगृहपाठ नियमीत करावेत. शिक्षक व पालक यांचे अज्ञाधारक असावे वगैरे! अशाप्रकारे खूप आहे परंतु बुध्दाच्या तत्वाप्रमाणे आठवणीत ठेवण्यासारखे म्हणजे दुसऱ्याला आपल्यापासून त्रास होणार नाही व आपल्याला सुध्दा त्याच्या वागण्याचा त्रास होणार नाही असे वागावे. ठीक आहे!

आजी! शेवटचे तत्व कोणते! मन नेहमी शुध्द असावे! म्हणजे माणसाने लोभ व राग ह्यापासून परावृत्त असावे. जेंव्हा जेंव्हा मनामध्ये लोभ व राग निर्माण होईल त्यावेळी ह्या तत्वाची आठवण करावी व हे करणे चांगले नाही जाणीवपूर्वक असे मन तयार करावे. लोभ व राग तेंव्हाच नष्ट होईल. ठीक आहे! आजी ह्यापासून फायदे कोणते होतात?

१. तुम्हा स्वतःस व इतरांना ह्या विशुध्द वर्तनामुळे त्रास होणार नाही.

२. तुम्हाला शत्रू मिळणार नाही, राहणार नाही

३. तुमचे जीवन सुखी व समाधानी राहील

आजी ही तत्वे जर नाकारली तर काय होईल?

१. ज्यांनी वरील तीन तत्वांचा अंगीकार केला नाही ते सतत दुःखी राहतात. त्यांच्यात गुन्हेगारी स्वभावाची वाढ होते.

२. अशा माणसावर कोणीही प्रेम करीत नाही. (अशा माणसाशी कोणीही प्रेमाने वागत नाही)

ही तीन तत्वे आत्मसात कशी करावीत?


१. नेहमी कुटूंबातील व्यक्तीशी सत्य असावे. तशी शपथ घ्यावी.

२. फळाची आशा न करता मनःपूवर्क मित्राशी, कुटूंबाशी, शिक्षकांशी चांगले वागावे.

३. पालकाचा, शिक्षकांचा, मित्राचा आदर करावा.

४. मैत्री भावना सर्वांसाठी वृध्दींगत करावी.

५. आज्ञाधारक व प्रसन्न असावे. जर पालक उपदेश करीत असतील तर तो प्रसन्न मनाने स्विकारा व त्याप्रमाणे वर्तन करावे.



Buddha preaching. Indonesia.

बुध्द – इंडोनेसिया

३. बुध्द - धम्म प्रचार



पहिले दोन अनभिज्ञ शिष्य

मे महिन्यातील वैशाखपौर्णिमेला पूर्व भारतातील गया शहराजवळ बोधीवृक्षाखाली ध्यान करीत असतांना सिध्दार्थास संबोधी प्राप्त झाली. शाश्वत सुखाचा शोध लागला व सिध्दार्थ गौतम बुध्द झाले. बोधीवृक्षाच्या जवळून जाणाऱ्या त्रुपूस्सा व भाल्लीक ह्या दोन व्यापाऱ्यांनी बुध्दास ध्यानस्थ बसलेले असतांना पाहिले व त्यांच्या जवळचे मधयुक्त भोजन बुध्दास संबोधनीनंतर प्रथम दान केले.

त्या जेवणाचा आस्वाद घेतल्यानंतर बुध्दाने त्यांना प्राप्त झालेला नवीन अनुभव सांगितला. तेच बुध्दाचे पहिले अनभिज्ञ शिष्य होत. बुध्द त्यावेळी वयाने पस्तीस वर्षाचे होते.

प्रत्येकाच्या मनात प्रश्न असू शकतो की संबोधी म्हणजे काय? संबोधी ही मनाची शुध्दावस्था होय. ह्या अवस्थेत मन अज्ञान, अंधःकार, द्वेष व उत्कट इच्छापासून मुक्त असते. अभिजात व आकलनक्षम अशी मनाची अवस्था प्राप्त झालेली असते.

पहिला धम्मोपदेश

बुध्द आता आपल्या धम्माची शिकवण देण्यास पूर्ण तयार झालेले होते. त्यांनी स्वतःशीच प्रश्न केला की प्रथम धम्माची शिकवण कोणास द्यावी. त्यांना त्यांच्या पहिल्या शिक्षकांची आठवण झाली. अलारकलम व उधकराम. परंतु त्यांचे ह्यापूर्वीच निधन झालेले होते. नंतर त्यांना त्यांच्या पांच मित्रांची आठवण झाली ज्यांचा त्यांनी संबोधीपूर्वी त्याग केला होता.मृगवनात पाटण्याजवळील सारनाथ येथे ते हयात होते. गयेपासून ते ठीकाण

शंभर मैल दूर होते. बुध्द त्याठीकाणी गेले. त्या मृगवनात सारनाथ येथे पांच शिष्यांना पहिला धम्मोपदेश केला. त्यास धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून ओळखले जाते.

धम्मोपदेशानंतर ते पांच संन्याशी बुध्दाचे पहिले शिष्य झाले. त्यांनी पुढे बुध्दाच्या तत्वांचा प्रचार केला व धम्माचे प्रथम पाईक म्हणून कार्य केले.

धम्म प्रचार उपक्रम

मृगवनात भगवान बुध्द विहार करीत असतांना एका प्रातःकाळी एक नवयुवक 'यश' बुध्दाजवळ आला. ज्याने श्रीमंत कुटुंबामध्ये जन्म घेतलेला होता. बुध्दाची शिकवणूक त्याने ऐकली. जीवन हे दुःखमय आहे. त्यात मानवास अनेक प्रश्नास सामोरे जावे लागते. त्रास सहन करावा लागतो. ह्या सर्वप्रश्नावर केवळ बुध्दाचा मध्यम मार्ग हाच एक उपाय होय. तेव्हापासून 'यश' बुध्दाचा शिष्य बनला. लवकरच बुध्दाने यशाच्या पत्नीस व पालकास (आईवडीलास) धम्म दिक्षा दिली. यशला ५४ मित्राचा परिवार होता. पुढे त्यांनी सुध्दा धम्मात प्रवेश करुन ते बुध्दाचे शिष्य बनले. त्यासर्वांना लवकरच संबोधी प्राप्त झाली. अशा अरहंत भिक्खूची संख्या पुढे वाढत गेली.

धम्मोपदेश चळवळ -

बुध्दाच्या शिष्याची संख्या आता बरीच वाढली होती. तेंव्हा त्या सर्वांना बुध्दाने आदेश दिला की प्रत्येकाने वेगवेगळ्या ठीकाणी जाऊन प्रत्येक माणसाला सत्याच्या मार्गाची शिकवण द्यावी आणि स्वतःसुध्दा धम्मोपदेशासाठी दूरच्या भ्रमंतीवर निघाले.

सतत पंचेचाळीस वर्षे बुध्दाने सत्याच्या मार्गाचा संदेश लोकांपर्यंत पोचविण्याचे कार्य केले. दुःखमुक्ती मार्गाची शिकवण दिली. फक्त पावसाळ्याचे दिवस वगळता सतत बुध्दाच्या संघाने, भिक्खू भिक्खूनीणी धम्मोपदेशाचे कार्य देशाच्या उत्तर पूर्व भागात केले. बुध्दाच्या अथक प्रयत्नामुळे व शिष्याच्या भ्रमंतीमुळे भारतात बुध्द धम्म प्रस्थापित झाला. इ. स. पूर्व ५८८ मधील ही घटना होय.

बुध्दाचा अखेरचा संदेश -

वयाच्या ऐंशीव्या वर्षी मल्लदेशाची राजधानी कुशीनगर येथे 'चंद' लोहाराकडे भोजन घेतल्यामुळे बुध्द आजारी पडले. बुध्दाने त्यांच्या जवळच्या शिष्यास आनंदास सांगितले की, चंद ह्यास कळवा की तुझ्याकडून मिळालेले हे आमचे शेवटचे भोजन आहे. त्यामुळे आम्ही समाधानी आहोत. तू दिलेले भोजन फलदायी व महत्वाचे आहे. माझ्या आजाराबद्दल आपण स्वतःला दोषी मानू नये.

बुध्दाने निर्वाणासाठी मल्ल राज्यातील कुशीनगरजवळ सालवृक्ष वनात जागा निवडून त्याकडे प्रस्थान केले व आनंद शिष्यास सालवृक्षामध्ये मंचक तयार कण्यास सांगितला व


त्या मंचकावर उजव्या कुशीवर बुध्द शांत व सावध झोपले. सर्व भिक्खू त्याच्या सभोवती होते. ती वैशाख पौर्णिमा होती. जरी ते अंतीम क्षण मोजत होते तरीही जेंव्हा लोकांनी त्यांच्याकडे धम्म संदेशाची याचना केली ती बुध्दाने आनंदाने स्विकारली व धम्मोपदेश देण्यास तयार झाले. त्यावेळी सुभद्र, अनेक याचक व गरीब लोक बुध्दाचा शेवटचा संदेश ऐकण्यासाठी आली होती. तेव्हा दोन सालवृक्षाच्या खाली मृत्यू मंचकावर वैशाख पौर्णिमेच्या दिवशी बुध्दाने सर्व शिष्याना खालील प्रमाणे संदेश दिला.

भिक्खूनो! तुम्ही शिक्षकाविना नाहीत मी जरीही आपल्यात नसलो तरी धम्मतत्व व नियम जी आपणास शिकवणुकीतून सांगितलेली आहेत ती आपल्यासोबत आहेत.

भिक्खूनो! शरीर नाशवंत आहे. प्रत्येक सजीव घटक नाशवंत आहे. स्वतःची मुक्ती स्वतःच्याच परिश्रमाने करावी.
अत् दिपं भवं।


बुध्दाचे हे शेवटचे शब्द होते. त्यांचा चेहरा सुवर्ण प्रकाशाप्रमाणे तेजोमय दिसत होता. त्यांचे मन वरवर परमानंद प्राप्त करीत होते. शेवटी निर्वाण प्राप्त केले व कायमस्वरुपी जगाचा निरोप घेतला. परंतु त्यांची शिकवण आपणा सर्वांना मार्गदर्शक म्हणून सदैव जगामध्ये आहे. त्यांच्या शिष्यानी, भिक्खू व भिक्खूनीणी बुध्दाची शिकवण आजही सांभाळलेली आहे. जतन करुन ठेवली आहे.





Casket : Buddha's Sacred Relics.

बुध्द - पवित्र अस्थि



४. बुध्दधम्म निर्वाणानंतर

थोडक्यात

बुध्दाच्या निर्वाणानंतर शिष्यांनी धम्माचा प्रसार दूरवर, जगभर केला. धम्माची शिकवण सुरक्षित व अबाधीत राहण्यासाठी बुध्दानंतर पहिल्या शतकात दोन धम्म परिषदा भरल्या व त्यामध्ये बुध्दाची शिकवण शुध्द स्वरुपात जोपासण्याचा प्रयत्न झाला.

पहिली परिषद - बुध्दाच्या निर्वाणानंतर तीन महिण्यानी राजगीर येथे ५०० अरहंत भिक्खूच्या समवेत पहिली परिषद झाली, या परिषदेचा प्रमुख उद्देश होता - बुध्दाची धम्मतत्वे व नियम निश्चित करणे. भिक्खू महाकाश्यप यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली ही पहिली परिषद झाली. मगधचे राजे अजातशत्रू ह्यांनी परिषदेचे पालकत्व सांभाळले. परिषद सात महिने चालू होती.

दुसरी परिषद - बुध्दानंतर शंभर वर्षानी ऐतिहासिक अशी ही दुसरी परिषद झाली. धम्म बाबींना कलाटनी देणारी अशी ही दुसरी परिषद होय. त्यावेळी वैशाली येथील वज्जीपूत भिक्खू संघ बुध्दाची धम्मविषयक नियम अमलात आणण्यास कसूर करीत होता.अनुभवी संघाने त्यांना सुधारण्याचा प्रयत्न केला. अनुभवी संघाने केलेल्या मार्गदर्शनाकडे त्यांनी दूर्लक्ष केले व परिणामी ७०० अरहंत भिक्खूली वैशाली येथे नवीन दुसरी परिषद घेतली व सुधारित धम्म नियमावली तयार करण्यात आली. तेव्हापासून बुध्द शिकवणूकीचे दोन भाग झाले. हिनयान (थेरवाद) व महायान. अनुभवी असा जुना संघ म्हणजे हिनयान (थेरवाद) होय. त्याचबरोबर वज्जीपूत भिक्खू संघाने महायान संघ विकसीत केला.

तिसरी परिषद - राजा अशोकाच्या अगोदरचा काळ बुध्दधम्माकरीता उत्तर काळ होता. परंतु अशोकाच्या काळात बुध्दधम्म विकासाच्या शिखरावर पोहचला होता. पाटलीपूत्र

(पाटणा) येथे राजा अशोकाच्या काळात तिसरी परिषद भरली. भिक्खूमधील अनियमितपणा व धम्माची तत्वे ह्यावर ह्या परिषदेत भर देण्यात आला. पाटणा सध्या बिहार राज्याची राजधानी आहे. भिक्खू मोगलपूत्त यांच्या मार्गदर्शनाखाली व राजा अशोकाच्या पालकत्वाने ही परिषद यशस्वी झाली. १००० अरहंत भिक्खूनी परिषदेत भाग घेतला होता.

परिषदेनंतर राजा अशोकाने नऊ संघ विविध ठीकाणी धम्म प्रसारासाठी भारतात व भारताबाहेर पाठविले. भारताबाहेर धम्म प्रसार होण्याची ही प्रथम घटना होय. भारताबाहेर बुध्दधम्माचा झपाट्याने प्रसार झाला व आज जगातील बौध्द, हिन्दू, ख्रिश्चन व इस्लाम ह्या चार प्रमुख धर्मामध्ये बौध्दधम्माचे महत्वाचे स्थान आहे.

सध्या संपूर्ण जगात बुध्दधम्माचे दोन संप्रदाय आहेत. १. थेरवाद बुध्दधम्म, २. महायान बुध्दधम्म. थेरवादीय बुध्दधम्म सध्या भारत, श्रीलंका, थायलंड, ब्रह्मदेश, लाओस, कंबोडिया, मलेशिया, सिंगापूर, इंडोनेशिया देशात मानला जातो. तसेच ऑस्ट्रेलिया, युरोप, उत्तर अमेरिका, कॅनडात आज ह्याच संप्रदायाचा प्रसार होत आहे. तर महायान पंथाच्या धम्माचा प्रसार उत्तर भारत, तिबेट, मंगोलिया, सोवियत युनियन, चीन, जपान, कोरिया व व्हिएतनाम येथे आहे. महायान पंथाचा प्रसार सध्या युरोप व अमेरिकन देशातसुध्दा होत आहे.



५. बुध्दधम्म संप्रदाय

बुध्दाच्या महानिर्वाणानंतर शंभर वर्षानी दुसरी धम्म परिषद झाली होती. व ह्याच परिषदेत मतभिन्नता होऊन दोन संप्रदाय उदयास आले. बुध्दधम्माच्या नियमातील नरमपणा व विहार संस्थेच्या नियमावलीतील भिन्नता ह्यामुळे वज्जीपूत्त भिक्खूसंघ वैशाली परिषदेतच वेगळा झाला. त्यांनी तेथेच दहा सूचना मांडल्या ज्या धम्माच्या नियमावलीस विसंगत होत्या. परंतु वज्जीपूत संघ मानतो की त्यांचे आचरण बुध्दाच्या शिकवणूकीप्रमाणेच आहे.



दुसरे महत्वाचे कारण म्हणजे विविध देशातील त्यांची संस्कृती, तेथील वातावरण व त्यादेशाची भौगोलिक परिस्थिती होय. ज्या देशात धम्म प्रसार झालेला होता त्या देशातील भौगोलिक परिस्थितीमुळे बुध्दधम्मातील प्राथमिक नियम प्रथम ते लोक आचरणात आणू शकत नव्हते.

दिवसेंदिवस बुध्दधम्माच्या अनुयायाची वाढ झपाट्याने होत गेली. भिक्खूची संख्या, सामान्य अनुयायी यांची वाढ झपाट्याने झाली व भिक्खू यश ककंदपूत्त ह्याने ७०० अरहंत भिक्खूसमवेत वैशाली येथे केवळ भिक्खूचीच बैठक दुसऱ्या धम्मपरिषदेच्या संदर्भात घेऊन त्यामध्ये ज्या दहा सूचना धम्मनियमांच्या विसंगत होत्या त्यावर चर्चा केली व निष्कर्ष काढला की, त्यांनी ज्या दहा सूचना केल्या त्या धम्मास हानिकारक आहेत. त्याचवेळी अन्य गोष्टी विषयीसुध्दा मतभिन्नता होती. म्हणून भिक्खू यशने सुधारीत धम्म नियमावली व बुध्दाची शिकवण पुन्हा तयार केली. त्याचवेळी वज्जपूत संघाने स्वतंत्र वज्जीपूत भिक्खूसंघाची दूसरी बैठक घेतली.

हा प्रसंग धम्मसंघाचे दोन स्वतंत्र संघ तयार करण्यास कारण होय. वज्जीपूत संघाने महायान संघ म्हणून धम्म कार्य चालू ठेवले तर दुसरा संघ हिनयान होय. जो आज थेरवादी म्हणून ओळखला जातो. ह्या हिनयान थेरवादी संघास कधीकधी दक्षिणी धम्मसंघ

म्हणूनसुध्दा संबोधले जाते. व महायान संघास उत्तरीय संघ म्हणून संबोधले जाते. अर्थात हिनयान म्हणजे थेरवाद नव्हे. हिनयान व महायान शब्दाविषयी विविध अर्थबोध लावण्यात आले आहेत.

राजा अशोकाच्या काळात जवळ जवळ अठरा ते वीस बुध्दधम्म संप्रदाय अस्तित्वात होते व महायान हिनयान यांचे अनेक उपसंप्रदाय होते. हिनयान पंथाचे अकरा प्रकार तर महायान पंथाचे सात प्रकार झालेले आढळतात. परंतु ह्या उपसंप्रदायापैकी कोणताही उपसंप्रदाय जास्त काळ अस्तित्वात राहिला नाही. वज्रायन हासुध्दा अशाच प्रकारचा एक संप्रदाय होय. हा संप्रदाय तिबेट, भूतान, लदाख, आसाम येथे अस्तित्वात आहे. आज हिनयान ह्या ऐवजी थेरवाद ह्या शब्दाचांच योग्य अर्थी वापर केला जातो.

राजा अशोकाच्या काळात बुध्दधम्माच्या हिनयान संप्रदायाचाच झपाट्याने प्रसार झालेला होता. हा संप्रदाय श्रीलंका, ब्रम्हदेश, थायलंड, लाऊस व कंबोडिया मध्ये मोठ्या प्रमाणात मान्यता पावला. महायान संप्रदाय नेपाळ, तिबेट, चीन, मंगोलिया, सोविएत युनिय, व्हिएतनाम, कोरिया, जपानमध्ये प्रमाण मानला जातो.

आज सद्यपरिस्थितीत बुध्दधम्माविषयी जगभर विविध परिषदा घेण्यात येत आहेत. व एक संघपणा प्रस्थापित करण्यात येत आहे. व विभन्नता कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. सध्या दोन्हीही संप्रदाय हिनयान व महायान संपूर्ण जगामध्ये विकसीत होत आहे. आज बुध्दधम्म जगातील चार मोठ्या धर्मापैकी एक झालेला आहे. हिनयान व महायान संप्रदायाचे पाचशे लक्ष अनुयायी जगभर आहेत. युरोप, अमेरिका व ऑस्ट्रेलिया खंडातील जास्तीत जास्त लोक बुध्दाच्या शिकवणूकीकडे व ध्यान साधनेकडे आकर्षिले जात आहेत.

६. अस्तित्वाची तीन लक्षणे

नैसर्गिक वस्तूच्या अस्तित्वाविषयी बुध्दाने कोणते विचार मांडले ते विद्यार्थ्यांना माहित असणे जरुरीचे आहे. सजीव व निर्जीव वस्तू विषयी तीन महत्वाची लक्षणे त्यांनी सांगितलेली आहेत ती खालीलप्रमाणे.



१. अनिच्च लख्खन - (अनित्य लक्षण)

२. दुःख लख्खन - (दुःख लक्षण)

३. अनात्त लख्खन (अनात्म लक्षण)

१. अनिच्च लख्खन - (अनित्य लक्षण)

अनित्य लक्षण म्हणजे अशाश्वतपणा होय. प्रत्येक वस्तू ही बदलकारी आहे, नाशवंत आहे आणि ती अस्थिर व अविश्वसनीय आहे. कोणतीच वस्तू शाश्वत नाही. सर्व वस्तू सतत नाश होत जातात. आपण त्या वस्तूला धरुन ठेऊ शकत नाही. आज मितीला ज्यास्थितीत आहे त्याच स्थितीत ती उद्या राहू शकत नाही किंवा नंतरच्या काळात राहू शकत नाही. उदाहरनार्थ आपण एका पेटत्या मेणबत्तीचे निरीक्षण करु. तिच्या ज्योतीविषयी विश्लेषण करु. त्यातून काही विशेष लक्षणे स्पष्ट होतात. सुरुवातीला मेणबत्ती पेटविल्यावर तिची ज्योत सतत वाढत जाते. काही वेळ सामान्य स्थितीत जळत राहते. नंतर हळूहळू संपतांना कमी कमी होत जाते व शेवटी संपूर्ण संपताना नष्ट होते.

दुसरे उदाहरण सजीवांच्या जीवनचक्राचे पाहू. तो प्राणी असेल, मानव असेल किंवा वनस्पती असेल. लहान मुल जन्मास येते. ते वाढू लागते, तरुण होते, नंतर वृध्द होते व आजारी पडून शेवटी मृत्यू येतो. फूल उमलते नंतर काही वेळाने कोमेजते व शेवटी सुकून जाते.

अशाप्रकारे हे अद्वितीय विशेष लक्षण आपण निरीक्षण केल्यानंतर ध्यानात येते की ज्योत ही अशाश्वत आहे. त्याचप्रमाणे आपल्या ध्यानात येते की सर्व वस्तू ह्या बदलणाऱ्या आहेत व त्या अशाश्वत आहेत.

२. दुःख लख्खन (दुःख लक्षण)


माणसाचा तथा प्राण्याचा असंतुष्ठपणाचा अनुभव म्हणजे दुःख होय. मानव प्राणी यांचे जीवन दुःखमय आहे. दुःख लख्खनाची चिन्हे क्लेश, दडपण, विफलता, वेदना, आजारीपणा, दुर्दैवीपणा, अस्थिरपणा वगैरे आहेत. अशाश्वतपणाचे लक्षण म्हणजे दुख होय. संसारातील जन्ममृत्यूचे चक्र हे दुःखमय आहे अशी सूज्ञांची संकल्पना आहे.

थोडक्यात बोलावयाचे झाल्यास पृथ्वीवरील दुःखाची संकल्पना आपणास खालील यादीप्रमाणे दर्शविता येईल.

१) जन्मामुळे दुःख, २) नाशामुळे दुःख, ३) शारीरिक आजारीपणामुळे दुःख, ४) मानसिक आजारामुळे दुःख, ५) मृत्यूमुळे दुःख, ६) शोकामुळे दुःख, ७) आक्रोशामुळे दुःख, ८) आशाभंगामुळे दुःख, ९) प्रियजनाच्या विभक्तीमुळे होणारे दुःख, १०) अनिष्ठ वस्तूप्राप्तीमुळे होणारे दुःख, ११) इच्छा अतृप्तीमुळे होणारे दुःख, १२) अप्रिय व्यक्तीच्या संघामुळे होणारे दुःख, १३) वाईट वातावरणात राहत असल्यामुळे होणारे दुःख

जागतिक सुख जरी प्राप्त झाले तरीही प्रसंगानुसार तेथेही दुःख प्रवेश करील.

३. अनात्त लख्खन (अनात्म लक्षण)



प्रत्येक वस्तू ज्या अस्तित्वात आहेत त्या निरपेक्ष आहेत. प्रत्येक वस्तू निरपेक्ष आहे कारण त्या वस्तूचा असा स्वतंत्र भाग सापडू शकत नाही ज्याला आपणास स्वतंत्र म्हणता येईल. म्हणून आपणास कोणत्याच बाबीवर अधिकार सांगता येत नाही. उदाहरणार्थ आपण आपल्या शरीरास सांगू शकत नाही की तु आजारी पडू नको, तथा म्हातारपणास थांबवू शकत नाही. म्हणून म्हणता येईल की मानवी शरीर विविध घटकांचा संच आहे त्यात पांच वस्तूचे अस्तित्व आहे. शरीर, भावना, मन, मानसिक कार्य व जागृतपणा ह्या पांच घटकाला अलग करता येत नाही. यामध्ये कोणताच घटक कायमस्वरुपी नाही. त्यापैकी एक जरी नष्ट झाला तरी मागे काहीच राहत नाही.

सर्व सजीव व निर्जीव घटक चार बाबीपासून बनलेले आहेत. पृथ्वी, पाणी, तापमान व वायू. मानवी शरीर आणखी पुढे बत्तीस घटकांचे बनलेले आहे. पाणी, रक्त, आश्रू, तेल, कफ, लाळ, अस्थी, दात, नखे, केस, मांस, यकृत, फुफ्फुसे, इत्यादी.

जर वरीलपैकी एखादा भाग योग्यप्रकारे कामकरीत नसेल तर त्या शरीराचे अस्तित्वच नाहीसे होते.

बुध्दाने स्पष्ट केले आणि आपल्या शिकवणूकीत सांगितले की प्राथमिक तीन वाईट बाबी इच्छा, द्वेष व मोह जर स्वतःमधील नष्ट झाले तर मनुष्य सर्वबाबीपासून मुक्त होईल व तेथे अज्ञानाचा नाश झालेला असेल. त्याने स्वः ओलांडलेले असेल. मन हे दिव्यत्वप्राप्ती झालेले असेल.

७. पंचशील



सामान्यतः पांच तत्वांना पंचशील म्हणून संबोधले जाते. पंचशील हे पांच नियम आहेत, पाच गुण आहेत. बुध्दाने सामान्य माणसाकरीता आपल्या शरीरावर नियंत्रण ठेवण्यासाठी व शाब्दिक कृती नियंत्रित करण्यासाठी, त्यापासून परावृत्त होण्यासाठी, बोलणे व जे हानिकारक आहे त्यापासून परावृत्त होण्याकरीता हे पांच गुण सांगितलेले आहेत.

१. प्राणीमात्राची हत्त्या न करणे किंवा त्यांना इजा न करणे अलिप्त राहणे.

२. चोरी करण्यापासून अलिप्त राहणे.

३. मिथ्याचारापासून अलिप्त राहणे.

४. खोटे तथा मिथ्य बोलण्यापासून अलिप्त राहणे.

५. मद्यपान करण्यापासून अलिप्त राहणे.

वरील पांच ही गुण महत्वाचे आहेत. आपण त्यांना नाकारु शकत नाही. जर नाकारले तर त्यापासून मानवाचे नुकसान आहे. व्यक्तीने मन व शरीरावर संयम ठेवून हे पांचही गुण आत्मसात केले तर ती व्यक्ती शीलवान होय.

शीलग्रहण प्राप्तीसाठी पायऱ्या -

शील ग्रहणाच्या दोन पध्दती आहेत. ज्याठीकाणी भिक्खू नाहीत तेथे पांच शीलाचा उच्चार व्यक्तीनेच करावयाचा असतो. दुसरी पध्दती अशी की व्यक्तीने भिक्खूसमोर नम्रपणे बसावे व हात जोडून भिक्खूना शील देण्यासाठी विनंती करावी.

ओकास वन्दामि भन्ते ।
ओकास द्वारत्तयेन कतं संब्ब अपराधं खमतूमे भन्ते
ओकास अहं भन्ते *तिसणेन सह पंचशील धम्मं याचामि ।*
अनुग्गहं कत्वा शीलं देयमे भन्ते ।।
दुतियम्पि ओकास अहं भन्ते, तिसरणेनसह पंचशील धम्मं याचामि ।
अनुग्गहं कत्वा शीलं देयमे भन्ते ।
ततियाम्पि ओकास अहं भन्ते, तिसरणेनसह पंचशील धम्मं याचामि
अनुग्गहंकत्वा शीलं देयमे भन्ते ।।
नंतर भन्ते खालील ओळी तीन वेळा म्हणतील

नमोस्तस्स भगवन्तो अरहतो । सम्मासम्म बुध्दस्स

आपण त्यांच्या मागे म्हणावे. त्रिशरण ग्रहणानंतर खालील ओळी भन्ते म्हणतील.

बुध्दं सरणं गच्छामि
धम्मं सरणं गच्छामि
संघं सरणं गच्छामि
दुतियम्पि बुध्दं सरणं गच्छामि
दुतियम्पि धम्मं सरणं गच्छामि
दुतियम्पि संघं सरणं गच्छामि
ततियम्पि बुध्दं सरणं गच्छामि
ततियम्पि धम्मं सरणं गच्छामि
ततियम्पि संघं सरणं गच्छामि

भन्ते खालील ओळी उच्चारतील -

तिसारनागमनम
आमभन्ते

ह्यानंतर मुख्य व महत्वाचा भाग. तो आपण भन्तेनंतर काळजीपूर्वक उच्चारवयाचा आहे. एकानंतर एक ओळी म्हणावयाच्या आहेत.

पंचशील
पाणातिपाता वेरमणि सिख्खापदं समादियामि ।
आदिन्नादाना वेरमणि सिख्खापदं समादियामि ।
कामेसु मिच्छाचारा वेरमणि सिख्खापदं समादियामि ।
मुसावादा वेरमणि सिख्खापदं समादियामि ।
सुरा-मेरय-मज्ज पमादठ्ठाणा वेरमणि सिख्खापदं समादियामि ।
साधु । साधु । साधु । तीन वेळा म्हणावे
तीन वेळा वंदन करावे.

भन्तेसमोर शील ग्रहण करण्याची प्रक्रिया येथे पूर्ण होत आहे.

शीलाचे पालन जेवढे अधिक तेव्हढा अधिक आनंद मिळतो.

शीलग्रहण करणे चांगले कां मानले जाते?

१. त्यामुळे व्यक्ती सुखी जीवनाकडे वाटचाल करतो.

२. तो दुसऱ्याचा द्वेष करीत नाही

३. शील ग्रहण करणारी व्यक्ती पूर्णत्वप्राप्त केलेली असते.

४. तो सर्वांचा चांगला मित्र असतो.

शील ग्रहण न केल्यामुळे कोणते परिणाम होतील.

१. व्यक्ती क्रूर बनतो

२. व्यक्ती गुन्हेगारी प्रवृत्तीचा होऊ शकतो.

३. कोणी त्याच्यावर प्रेम करणार नाही, त्याच्याशी एकनीष्ठ राहणार नाही.

४. तो दुसऱ्याना व स्वतःशी क्लेषदायी असेल

५. चांगल्या सूज्ञ व्यक्ती त्याच्याशी मैत्री करणार नाहीत.

शीलाची उपासना कशी करावी -

प्रारंभीक काही महत्वाच्या पायऱ्या शील ग्रहणासाठी उपयोगी आहेत.

१. एकावेळी सर्व शीलाची उपासना जर शक्य नसेल तर क्रमाक्रमाने पांच शीलाची उपासना वाढवावी.

२. जर दररोज पंचशील ग्रहण करणे शक्य नसेल तर आठवड्यातून एक दिवस निवडावा व त्यादिवशी नियमीत शील ग्रहण करावे. किंवा आपला जन्मदिवस निवडा.

सामान्यतः जगातील सर्व बौध्द पांच ही शीलाचे पालन करतात. त्यामुळे त्यांच्या कुटुंबातील सर्व व्यक्ती सुखी व समाधानी असतात. प्रत्येक कुटूंब जर सुखी व समाधानी असेल तर तो समाज सुखी व समाधानी होईल. समाज सुखी झाला तर सर्व जग सुखी होईल.



८. चार आर्य सत्य

बुध्द धम्माचा मूळ पाया कोणता? असा प्रश्न विद्यार्थ्यांनी केल्यास चार आर्यसत्य हा बुध्द धम्माचा पाया होय. साधारणतः २५७५ वर्षापूर्वी बनारस जवळील सारनाथ (उत्तरपूर्व भारतात) येथे बुध्दाने पहिला धम्मसंदेश आपल्या पांच शिष्यास दिला होता. व त्यावेळी हे चार आर्यसत्य सांगितली होती. आपण त्याविषयी माहिती पाहू.

१. पहिले आर्यसत्य - दुःख

दुःख तथा विफलता दैनंदिन जीवनातील प्रश्नांशी निगडीत आहे. जन्म, वृध्दत्व, आजार, मृत्यू, क्लेष आणि सर्वप्रकारचे वैफल्य म्हणजे दुःख होय. अनावश्यक वस्तूची प्राप्ती तथा आवश्यक वस्तूची अप्राप्ती म्हणजे दुःख होय. हे प्रश्न इच्छा नसणारे प्रश्न आहेत. लोक हे प्रश्न टाळण्यासाठी त्यांच्यापरिणे प्रयत्न करतात व त्यापासून मुक्तता मिळण्यासाठी प्रयत्न करतात. हे आर्यसत्य समस्यांशी निगडीत आहे. हे आर्यसत्य प्रतीपादन करुन, समस्याविषयक परिस्थीती व तिचे आकलन विषयी मदत करते. ह्या करीता प्रथम आत्मपरिक्षण आवश्यक आहे. आत्मपरिक्षणाशिवाय हे सत्य पूर्ण होत नाही. काळजीपूर्वक निरीक्षणावरुन स्पष्ट होते की जीवन हे अस्थिर आहे.

२. दुसरे आर्यसत्य - दुःखाचे मूळ

बुध्दाने दुःखाच्या उगमस्थानाविषयी सांगितलेले आहे की, प्रत्येक दुःखाच्या मुळाशी उत्कट इच्छा असते. त्याचा परिणाम म्हणजे अज्ञान व भ्रान्ती होय. उत्कट इच्छा आनंद प्राप्तीकरीता, अस्तित्वाकरीता किंवा आत्मनाशाकरीता असू शकते.

आपली तीव्र इच्छा हिच मूळ दुःखाचे कारण होय. उदा. महेषला मोटारकार हवी आहे. तो त्यासाठी रात्रंदिवस मेहनत करतो. १५, १६ तास अविश्रांत काम करतो, पैसा मिळवितो. श्रम पडल्यामुळे आजारी पडतो. त्याला दुःख होते. यावरुन तीव्र इच्छा ही मूळ दुःखाचे कारण होय. सामान्य माणसाने आहे त्यात आनंद मानून जीवन प्रवाह चालू ठेवावा. म्हणजे गरीबच राहावे असे नाही. तर मध्यम मार्गाचा अवलंब करावा.

३. तिसरे आर्यसत्य दुःख निरोध

बुध्द धम्माचा मूळ उद्देश आहे तो दुःख निरोध. लोभ, द्वेष व भ्रम यांचा शेवट करणे हा मूळ हेतू आहे. जेव्हा तृष्णा तथा उत्कट इच्छेची जागा निर्वाण घेईल त्यावेळी शाश्वत आनंद प्राप्त होतो. लोभ, द्वेष व भ्रम यांना क्षीण करण्यासाठी मनुष्याने धम्म जाणला पाहिजे. तो आचरणात आणला पाहिजे. अष्टांगिक मार्गाचा स्विकार केला पाहिजे. अष्टांगिक मार्गाचा अवलंब केल्याशिवाय तृष्णा क्षीण होत नाही.

४. चौथे आर्यसत्य - दुःख निरोधासाठी मार्ग शोधणे

बुध्दधम्म जीवनाचा मार्ग दर्शविते. धम्म म्हणजे नीति होय नीतिचा विकास म्हणजे दुःख निरोधन होय. प्रत्येकाने नीति आचरणात आणावी. केवळ नीतिच आपल्याला निश्चित उद्दिष्टापर्यंत पोहोचवू शकते. त्यालाच धम्म शिकवणूकीप्रमाणे अष्टांगिक मार्ग म्हणतात. त्यात आठ घटकांचा समावेश आहे. त्यालाच मध्यम मार्गसुध्दा म्हणतात. ते खालीलप्रमाणे आहेत.

१) सम्यक दृष्टी २) सम्यक संकल्प ३) सम्यक वाचा ४) सम्यक कर्मान्त ५) सम्यक आजीविका ६) सम्यक व्यायाम ७) सम्यक स्मृती ८) सम्यक समाधी

थोडक्यात कोणत्याही प्रश्नांची उकल करण्यासाठी शीलाचे पालन आवश्यक आहे. (आत्मसंयम तथा नीति), समाधी (मनसंयम) व प्रज्ञा (ज्ञानवान) आवश्यक आहेत. म्हणून प्रज्ञा, शील, समाधी ह्या तीन बाबीला धम्मात महत्वाचे स्थान आहे. ह्या तीन बाबीवर अष्टांगिकमार्ग आधारित आहे.

काम तृष्णा, भव तृष्णा व विभव तृष्णा ह्या दुःख्याच्या मुळाशी असतात. त्यांच्याविषयी प्रत्येकाला जाणीव असावी. तृष्णेवर प्रभूत्व प्राप्त करणे म्हणजे तो जीवनातील सर्वात मोठा विजय होय.



९. जीवनाचा मध्यम मार्ग (भाग १)

दिव्यत्व प्राप्तीनंतर उर्वरीत आयुष्य बुध्दाने धम्माची शिकवण सांगण्यासाठी खर्च केले. त्यांच्या शिकवणूकीस बुध्दधम्म म्हणतात. आज आशियायी राष्ट्रामध्ये बुद्धधम्म हा प्रमुख धर्म म्हणून बऱ्याच ठिकाणी आहे. बुध्दधम्मात अष्टांगिक मार्ग म्हणजे जीवनमार्ग होय. हा धम्ममार्ग सामान्याच्या विचारांना विशिष्ट धार देणारा धम्म आहे. अयोग्य व हानिकारक विचारांना थांबविणारा मार्ग आहे. मध्यम मार्गाचा स्विकार केल्याने, अंगीकृत केल्याने, आचरण केल्याने, दुःख निरोध होते. मध्यम मार्गाच्या अंगीकृतपणामुळे आपण



निश्चित ध्येय गाठू शकतो, जीवनाचा खरा आनंद प्राप्त करु शकतो. निर्वाण प्राप्त करु शकतो.

१. सम्यक दृष्टी

कोणतीही कृती करण्यापूर्वी किंवा प्रश्नांची उकल करण्यापूर्वी आपले मन प्रथम स्वच्छ, स्पष्ट असावे. नंतरच तो प्रश्न इतर प्रश्नापासून अलग करुन त्याचे सत्यस्वरुप पडताळून त्याप्रश्नामागील कारणे शोधली पाहिजेत आणि सम्यक दृष्टी ही कृतीपूर्व अवस्था होय. हे मार्गक्रमण करण्यापूर्वी जीवनाशी निगडीत असलेल्या तीन वैशिष्ट्याविषयी प्रथम विचार केला पाहिजे. ते म्हणजे अनिच्च लक्षण, दुःख लक्षण व अनात्म लक्षण मानवी जीवनाविषयी, मूल्यांविषयी, अस्तित्वाविषयी व सजीवातील घटकाविषयी ज्यांच्यामुळे जन्म मृत्यूचे चक्र

चालू आहे त्या घटकाविषयी आपली स्पष्ट संकल्पना असावी.

२. सम्यक संकल्प

आपले मन कोणतीही कृती करण्यापूर्वी स्पष्ट व स्वच्छ असावे. ते शुध्द असावे. ते अपकारक व बाधक विचारापासून मुक्त असावे. प्रश्नांची, समस्यांची उकल करतांना मन मुक्त असावे. उच्चस्तरांवरुन विचार केल्यास आपले मन संवेदनापासून, विकृतइच्छा, क्रोध, द्वेष, संशय, चिंता व आळस या सर्वांपासून मुक्त असावे. हे केवळ ध्यान व एकाग्रचित्ताद्वारे साध्य होईल. त्याच बरोबर आपण मानसिक, प्रगतीमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या बाबीवर ध्यान साधने मधूनच मात करु शकतो.

३. सम्यक वाचा

ध्यान धारणेपूर्वी आपले मन, मिथ्य विचार, चहाडी, कठोर शब्द, निरर्थक गप्पा यापासून परावृत्त करणे आवश्यक आहे. त्यानंतर आपण विचार व कृति यामध्ये एकाग्रता निर्माण करु शकतो. या वैशिष्ट्याला ज्ञान आणि कल्पकतेची जोड आहे. सम्यक वाचा म्हणजे पूर्ण गोड शब्दाचे बोलणे असावे. वाणी गैरशिस्त व भावनाप्रधान नसावी. सम्यक वाचा ही मन कलुषीत करणारी, विकृत विचारांची, स्वार्थी नसावी. सम्यक वाचा ही असंयमी व भावनाप्रधान नसावी. सम्यक वाचा ही प्रेमळ व सत्य असावी. ती प्रसंगानुरुप योग्य असावी. ऐकणाऱ्यांसाठी व समाजासाठी सुध्दा.

४. सम्यक कृती

साधारणतः सम्यक कृती ही पंचशीलावर आधारित आहे. ही बुध्दधम्माची प्राथमिक तत्वे आहेत. त्यांचे वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१) हत्त्या न करणे, प्राणीमात्रावर दया करणे

२) कांही न स्विकारणे (अपरिगृह) परोपकार व औदार्य आचरणात आणणे.

३) संवेदनाचा गैरवाप नसावा, शुध्द आचरण व आत्म संयम असावे.

४) असत्य व कठोर वाचा याचा उपयोग करु नये, प्रामाणिकपणा, सचोटी व वक्तव्यापूर्वी वैचारिकता यांचे आचरण असावे.

५) मद्यपान करु नये जे अनियंत्रित वर्तनास प्रेरित करते, आत्मसंयमन व विचारपूर्वक आचरण असावे.

उच्च जीवनमानासाठी या पांच तत्वांचे आचरण आवश्यक आहे. जो याप्रमाणे मार्गक्रमण करेल, कृती करेल, तो इतरांनाही त्रासदायक नाही व स्वतःसाठी सुध्दा.

१०. जीवनाचा मध्यम मार्ग (भाग २)

५. सम्यक आजिविका

सम्यक आजिविका ज्या व्यवसायापासून समाजाला उपद्रव होणार नाही अशा घटकांशी संबंधीत आहे. उपद्रवी व्यवहार पाच प्रकारचे आहेत. ते सामान्य व्यक्तीनी टाळले पाहिजेत. शस्त्राचा व्यापार, जे व्यक्तीला कमीपणा प्राप्त करुन देतात असे व्यवहार, मद्य व्यवहार, विषारी घटकाचा व्यवहार व्यक्तीने टाळावेत. आणि पैसे व्याजाने देऊन जास्त मिळकत प्राप्त करणेसुध्दा टाळावे. या आधुनिक जगात स्वतःच्या व्यवसायाची निवड करतांना स्वतःचा विचार लागतो. व योग्य व्यवसाय निवडावा लागतो.

वरील प्रकारचे समाजोपद्रवी व्यवसाय बुध्दधम्मामध्ये निषेध मानले जातात. बौध्द व्यक्तीने ह्यासर्व बाबींचा विचार करुनच आपला योग्य व्यवसाय निवडावा. त्यामध्ये समाजाला हानिकारक असणाऱ्या व्यवसायाचा समावेश असू नये. सम्यक आजिविका अष्टांगिक मार्गाची पाचवी पायरी होय.

६. सम्यक व्यायाम

चांगला व हुशार विद्यार्थी प्रत्येकाने झाले पाहिजे म्हणजे सम्यक व्यायाम होय. प्रत्येकाचे सतत चांगले प्रयत्न असावेत. अपकारक किंवा बाधक वर्तन सर्वांनी टाळावे. सम्यक व्यायामविषयी खालील चार बाबी महत्वाच्या आहेत.

१) मनात निर्माण झालेला अपकारक तथा बाधक व्यायाम प्रथम काढून टाकावा.

२) मनात अपकारक तथा बाधक व्यायाम उद्भवत असल्यास उद्भवू देऊ नये.

३) मनात उपयुक्त सम्यक व्यायाम विकाशीत करावा.

४) मनात उपयुक्त सम्यक व्यायाम उद्भवत असल्यास त्याचा विकास करावा.

जर धम्म शिकवणूकीविषयी वर्ग चालू असतील तर अशा ठीकाणी जातीने प्रवेश घेऊन धम्म आत्मसात करावा. तेथे सांगितलेली सर्व कामे करावित.

७. सम्यक स्मृती

सम्यक स्मृती म्हणजे जागृतपणाचा विकास करणे. त्यामुळे धार्मिक प्रगती साधली जाते. थोडक्यात स्पष्ट करता येईल की, मन सम्यक स्मृतीमुळे असे तयार होईल की ते अपकारक तथा बाधक बाबी कोणत्या ते सहज ओळखू शकते. आपण जे काही करु ते सम्यक स्मृती ठेवूनच करु त्यावेळी पूर्णपणे त्याच गोष्टीकडे लक्ष दिलेले असेल. अभ्यास करतांना एकाच बाबीवर जर स्मृती असेल तरच अभ्यासांती चांगले परिणाम प्राप्त होतील.

जर आपण कोणतेही काम स्मृती ठेवून केले तर तुम्ही चांगले काम करणार व चूकांना त्याठीकाणी वाव राहणार नाही. कोणत्याही कामासाठी स्मृती ही अत्यंत महत्वाची आहे. उच्चस्तरांवर ध्यान भावना करणाऱ्याना सम्यक स्मृती व मन ह्याविषयी विशेष ज्ञान असते. ध्यानभावनेशी सम्यक स्मृतीचा जवळचा संबंध आहे. स्मृती कधी कधी चूकीची असू शकते. फसवणूक करणे, चोरी करणे ह्यासाठी सुध्दा स्मृती आवश्यक आहे परंतु ती सम्यक स्मृती होत नाही. मन हे सतत चांगले असावे.

८. सम्यक समाधी

सम्यक समाधी ही अष्टांगिक मार्गची शेवटची पायरी आहे. ही मध्यम जीवनमार्गाची एक पायरी आहे. ती मनाविषयी केंद्रीत झालेली आहे. सम्यक समाधी म्हणजे ध्यान भावनेचा सराव होय. जो आपणास पूर्णत्वाकडे जाण्यासाठी मार्गदर्शक आहे. अनिच्च लक्ष व निब्बाणविषयी मार्गदर्शक आहे.

साध्या शब्दात सांगावयाचे झाल्यास सम्यक समाधी व्यक्तीला मन केंद्रीत करण्यास उपयुक्त आहे. उदा. जर आपणास एखादी गोष्ट करावयाची आहे त्यापूर्वी आपण एकाग्रता करावी, मनाची एकाग्रता वाढवावी. वाचन, लेखन किंवा कोणतेही काम करण्यापूर्वी एकाग्रता ही आवश्यक आहे. त्याचे परिणाम चांगले प्राप्त होतात. एकाग्रता सराव हा पुन्हा पुन्हा करणे आवश्यक आहे. अष्टांगिक मार्ग तीन स्तरावर विभागता येतील.

१) शीलस्तर, सम्यक वाचा, सम्यक कृती व सम्यक आजिविका हे शीलाशी संबंधीत आहेत.

२) समाधीस्तर - सम्यक व्यायाम व सम्यक स्मृती, समाधी स्तराशी निगडीत आहेत. ज्यांना मनाला उच्चस्तरावर प्रशिक्षित करावयाचे आहे. त्यांच्याकरीता हा समाधीस्तर होय.

३) प्रज्ञास्तर - सम्यक दृष्टी व सम्यक संकल्प प्रज्ञा स्तराशी निगडीत आहेत.

सामान्य जनतेस धम्मविषयक प्रशिक्षण देणारा हा प्रज्ञास्तर आहे. हा दुसऱ्या स्तराची फलश्रूती होय. कोणतीही कृती करण्यापूर्वी प्रथम ती पूर्णपणे जाणून घेतली पाहिजे. कृती करण्यास प्रारंभ करण्यापूर्वी आपले मन त्याकृती विषयी संपूर्ण ज्ञात असले पाहिजे. अष्टांगिक मार्ग कोणत्याही कृतीसाठी लागू पडतो. ही बुध्दधम्मातील शास्त्रीयपध्दती मनाचा विकास करणारी आहे.



११. बुध्दधम्मातील समाधी परिचय

खालील प्रश्नोत्तराचा उतारा ध्यान भावनासंबंधी आहे. बुध्दधम्माचा अभ्यासक नात्याने खालील प्रश्न आपल्यासमोर केव्हाही उद्‌भवू शकतात. आपल्याला त्या प्रश्नांची उत्तरे माहिती असणे जरुरीचे आहे व त्या प्रश्नांचा उकल करता येणे आवश्यक आहे.

प्रश्न : बुध्दधम्मातील ध्यान भावना म्हणजे काय?

उत्तर : बुध्द शिकवणूकीप्रमाणे ध्यान भावना म्हणजे मनशान्ती होय. मनास मुद्देसूद वळणावर आणून ठेवणे म्हणजे ध्यान भावना. ध्यान भावना हा एक मार्ग आहे तो स्वतःवर नियंत्रण ठेवून मनाची एकाग्रता वाढविते. अपकारक विचारापासून शुध्दीकरण करण्याचा तो मार्ग होय. उदा. द्वेष, स्वार्थीइच्छा, लोभ, अज्ञान किंवा भ्रष्टाचार किंवा अशुध्दता यांच्यापासून परावृत्त होण्यासाठी हा मार्ग उपयुक्त आहे. थोडक्यात द्वेष, लोभ व अज्ञानापासून शुध्दीकरण करण्याचा मार्ग म्हणजे ध्यानभावना होय.

प्रश्न : मनाला प्रशिक्षण देण्याची आवश्यकता कां आहे?

उत्तर : बुध्दधम्मात मन हे प्राथमिक महत्वाचे मानले आहे. ती सर्वांत महत्वाची बाब आहे. सर्व अपकारक किंवा उपकारक कार्याचे परिणाम मन प्रक्रियेतून प्राप्त होतात. म्हणून बुध्दाने पुन्हा पुन्हा सांगितले की मन हे सर्व बाबींच्या कार्यासाठी अग्रभागी असते. ते सर्व धटनांचे प्रमुख आहे. म्हणून मन हे प्रथम प्रशिक्षित व शुध्द असले पाहिजे. ध्यान भावना मनाची शुध्दता व बुध्दीसामर्थ्यासाठी आवश्यक आहे. जे ध्यान भावना करतांत त्यांना मनाच्या शुध्दतेविषयीचे लाभप्राप्त होतात. विद्यार्थ्यांना सुध्दा त्याचे गृहपाठ व अभ्यास करण्यासाठी मनाची एकाग्रता आवश्यक आहे. एव्हढेच नव्हे तर ध्यान भावना सराव हा प्रत्येकाला त्याच्या जीवनात व कार्यात उपयुक्त आहे. म्हणून व्यक्ती ध्यान भावनेच्या माध्यमातूनच जीवनात यशस्वी होऊ शकतात.

प्रश्न : ध्यान भावना किती प्रकारची आहे?

उत्तर : साधारणतः ध्यान भावनेचे दोन भाग केलेले आहेत. समाधी ध्यान भावना व विप्पश्यना ध्यान भावना. समाधी ध्यान भावनेचा उद्देश मन एका विशिष्ट बिंदूवर केंद्रित करण्यासाठी आहे. बुध्दाची प्रतीमा किंवा गोलाकार रंगीत तबकडीवर एका ठीकाणी मन केंद्रित करतात. ध्यान करणारा व्यक्ती वरीलपैकी एक घटक निवडून त्यावर मन केंद्रित

करतो. जोपर्यंत समोरील घटक आपणास स्पष्ट जाणतो तोपर्यंत मन त्याविशिष्ट बिंदूच्या ठीकाणी केंद्रित करावे व हळूहळू डोळे बंद करीत जावे. मनात दुसरे कोणतेही विचार आणू नयेत. डोळे मिटून असलेल्या अवस्थेत त्याच घटकावर मन केंद्रित ठेवावे.

अशा प्रकारे मन तात्पुरते एकाग्र करता येते व राग, चिंता, अस्वस्थता, अतितृष्णा, शंका ह्या बाबीचे तात्पुरत्या स्वरुपात दमन करता येते.

विप्पश्यना - सत्यास्वरुपात व पूर्णपणे परिश्रमपूर्वक, सर्व बाबीविषयी सूक्ष्मदृष्टी प्राप्त करणे होय. सर्व बाबी विषयी जाणीवपूर्वक आकलन, त्या वस्तू ज्या सत्यस्वरुपात आहेत त्याच स्थितीत जान ठेवणे म्हणजे विप्पश्यना होय. उदा. जेव्हा ध्यानभावना करणारा डोळे मिटून ध्यान करतो तेंव्हा तो श्वासोच्छ्वासाचे काळजीपूर्वक निरीक्षण करतो. तो आत जातांना व बाहेर येतांना हळूहळू मनशांत व स्वच्छ बनते नंतर ध्यान भावना करणारा आपल्या मनातील विचाराचे निरीक्षण करु लागतो, व भावना विषयी सत्यस्वरुपात विचार करु लागतो, तो भावना विषयी विचार करतो, त्याच्या बदलत्या स्वरुपाविषयी व अनिच्च लक्षणाविषयी विचार करु लागतो. तो श्वास आंत व श्वास बाहेर जातांनाचे निरीक्षण करतो. श्वासोच्छ्वासातील चढ उतार जाणतो. अशाप्रकारे जेव्हा ध्यान भावना करणारा मनाची नैसर्गिक अवस्था जाणतो तेंव्हा त्याचे मन सर्व बाबीपासून मुक्त व स्वतंत्र असते. हा विप्पश्यना करण्याचा योग्य मार्ग होय. सध्या बरेच लोक श्वास आत जाणे व बाहेर येणे ह्या बाबी जाणतात म्हणजे परिपूर्ण विप्पश्यना नव्हे. ते श्वासोच्छ्वासातील चढ उतार जाणतात तेथपर्यंत ते योग्य आहे. परंतु ह्यापुढील पायरी म्हणजे मन जाणून घेणे होय. ही उच्च पायरी होय. प्रज्ञेपर्यंत पोहचण्यासाठी विप्पश्यना ही अत्यावश्यक आहे. कोणत्याही सामान्य तथा असामान्य कृतीसाठी एकाग्रता व बुध्दी सामर्थ्य आवश्यक आहे. ते विप्पश्यनेतून प्राप्त होते. योग्य ध्यान भावनेसाठी अनुभवी व चांगल्या मार्गदर्शकाची गरज असते.

प्रश्न : मनसामर्थ्य व एकाग्रते शिवाय जर काम केले तर काय परिणाम होतील?

उत्तर : जर मनसामर्थ्या अभावी व एकाग्रतेशिवाय काम केले तर त्यातून निश्चित स्वरुपाची प्राप्ती होणार नाही. उदा. विद्यार्थ्याने एकाग्रतेशिवाय व मनसामर्थ्या शिवाय अभ्यास केला तर त्याला त्या विषयाचे स्मरण पाहिजे त्यास्वरुपात होणार नाही. येथे अभ्यासाठी एकाग्रतेची महत्वाची भूमिका आहे. आकलन व सूक्ष्मदृष्टी हे कोणतेही कार्य करण्यासाठी उपयोगात येणारी साधने आहेत. रोजच्या जीवनात सूक्ष्मदृष्टीची महत्वाची भूमिका असते.

प्रश्न : ध्यान भावनेचे फायदे कोणते?

उत्तर : ध्यान भावनेचे अनेक फायदे आहेत. थोडक्यात येणे प्रमाणे.

मनाला शांती प्राप्त करण्यास मदत करणे. ध्यान भावना मनाला बळकटी आणण्यासाठी

मदत करते व मनाला समर्थ बनविते. दैनंदिन जीवनात आत्मविश्वासपूर्वक मन कोणत्याही प्रश्नावर व अडचणीवर मात करण्यासाठी समर्थ बनते.

मनाचा मानसिक विभाग ध्यान भावनेतून धारदार बनतो.

दडपण, चिंता व उत्कंठा ह्यापासून मुक्त होतो.

ध्यान भावनेमुळे आपले शारीरिक व मानसिक आरोग्यात सुधारणा होते.

सुदृढ शरीर व सुदृढ मन वाढीसाठी ध्यान भावननेची मदत होते.

मन शुध्दिकरणासाठी ध्यान भावनेची मदत होते.

ध्यान भावनेमुळे मनात करुणेची, दयेची, शांतीची वाढ होते.

द्वेष, लोभ, उत्कट इच्छा, स्वार्थीपणा, मत्सर इत्यादिबाबीपासून ध्यान भावना मनास परावृत्त करते. सामान्य जीवनासाठी व सांसारिक प्रयत्नासाठी ध्यान भावनेचे वरील फायदे होत. थोडक्यात ध्यान भावनेचे फायदे जाणून घेण्यासाठी व प्राप्त करण्यासाठी योग्य वातावरण, आत्मविश्वास, सातत्य व नियमीत सराव हा आवश्यक आहे.

चांगले सराव प्राप्त मन शाश्वत आनंददायी असते आणि ते विश्वातील सर्वांसाठी चिरस्थायी शांती देणारे होय.



१२. बुध्दानुसत्ती

बुध्दानुसत्ती म्हणजे काय? बुध्दानुसत्ती म्हणजे बुध्दाप्रती सन्मान व पूजा करणे आणि त्यांनी सांगितलेल्या नीतिचा, सदाचाराचा जीवनात उपयोग करणे. मानवी इतिहासात बुध्द हे सर्वश्रेष्ठ शिक्षक होते आणि म्हणून आजही ते सर्वासाठी आदरणीय आहेत.

बुध्द-वन्दना (पाली)

इति पि सो भगवा अरहं, सम्मासम्बुध्दो,
विज्जाचरणसम्पन्नो,
सुगतो,
लोकविदू,
अनुत्तरो, पुरिसदम्म सारथि,
सत्था देव-मनुस्सानं,
बुध्दो
भगवा'ति

बुध्द-वंदन (मराठी अर्थ)

अर्हत, सम्यक् संबुध्द,
विद्येनुरुप आचरणाने संपन्न, सुगती
निर्वाण प्राप्त केलेले, लोक -
लोकांतराचे रहस्य जाणणारे,
सर्वश्रेष्ठ, दमनशील पुरुषांचे सारथी,
देव आणि मनुष्यांना सुमार्गावर
नेणारे असे भगवान बुध्द आहेत.

वंदनेचा सराव कसा करावा

जेंव्हा आपण बुध्दपूजा करतो त्यावेळी आपण केवळ सर्वश्रेष्ठ अशा बुध्दाचीच पूजा व आदर करावा. आपला आत्मविश्वास बुध्दाप्रती वृध्दिंगत करावा. आपण त्याचवेळी कृतज्ञतापूर्वक संकल्प करावा व त्यांनी दिलेल्या सांगितलेल्या शिकवणूकीनुसार स्वतःला प्रज्ञावान करण्यासाठी आचरण करावे आणि इतरांनाही आपली सेवा मिळेल असे प्रयत्न असावेत.



१३. धम्मानुसत्ती

धम्मानुसत्ती म्हणजे धम्माच्या नीतिविषयी व सदाचाराविषयी प्रकाश टाकणे. थोडक्यात धम्मानुसत्ती म्हणजे बुध्दाची शिकवणूक. शारीरिकदृष्ट्या ते जरी आज आपल्यात नसले तरी ही धम्माच्या स्वरुपात मार्गदर्शक तथा शिक्षक म्हणून आजही ते आपल्यात आहेत. अशा प्रकारे धम्माने प्रत्यक्ष बुध्दाचे स्थान घेतले व प्रत्यक्ष धम्म म्हणजेच बुध्दत्व म्हणून कार्यरत आहे. बुध्दत्व म्हणजे सत्य आणि सत्य म्हणजे धम्म व धम्म म्हणजे सत्य होय. धम्म जाणीवेतूनच बुध्दत्व प्राप्त होते. थोडक्यात धम्माशिवाय बुध्द होऊच शकतं नाही. म्हणून बुध्द म्हणतात

जो धम्म जाणतो तो मला जाणतो
जो मला जाणतो तो धम्म जाणतो.

धम्माला निश्चित बुध्दा एव्हढे स्थान आहे. थोडक्यात बुध्द व धम्म हे एकमेकास पूरक व समसमान आहेत. बुध्दानुसत्ती प्रमाणेच धम्मवंदना पाठांतर करुन ध्यान भावना हे एकाग्रतेचे एक प्रमुख साधन होय.

पाली	**मराठी अर्थ**
स्वाखातो भगवता	भगवान बुध्दाचा धम्म उत्तम प्रकारे उपदेशलेला आहे.
धम्मो	तो ज्ञानेंद्रियाना आकलन होणारा आहे.
सन्दिट्ठिको	तो वेळ काळाच्या बंधनापासून मुक्त आहे.
अकालिको	'या आणि पाहा' या न्यायाने कोणीही अनुभव
एहिस्सिको	घेण्यासारखा आहे
ओपनायको	तो निर्वाणाकडे नेणारा आहे.
पच्चतं वेदितब्बो	आणि प्रज्ञावंताना स्वतः अनुभव घेता येण्यासारखा आहे.
विञ्युहीति।।	

वरील स्पष्टीकरणावरुन धम्म म्हणजे काही नसून शुध्दाचरण होय.

ते केवळ पाठांतर किंवा स्मरण करणे नव्हे. धम्माचरण म्हणजे बुध्दाची शिकवणूक आचरणात आणणे व बुध्दत्वाच्या जवळजवळ जाणे होय. आपण लक्षात ठेवले पाहिजे की केवळ गांभिर्यपूर्वक धम्म आचरणच मानवी कल्याणकारी आहे. जे व्यक्ती प्रामाणिकपणे व सचोटीने धम्म आचरण करतात त्यांना तो निश्चितच उपकारक आहे.

वरील स्पष्टीकरण बुध्दाची शास्त्रीय शिकवणूक होय. जगातील कोणतीही व्यक्ती केव्हाही व कोठेही धम्माचरण करुन स्वतःच्या प्रयत्नातून प्रज्ञावंत होऊ शकतो. उदा. आपण आजारी पडलो असता डॉक्टराना भेटतो व आजार बरा करण्यासाठी डॉक्टराकडून औषधी घेतो. त्याचप्रमाणे चांगल्या व प्रज्ञावंत व्यक्तीमत्वासाठी धम्माचरण सचोटीपूर्वक करणे आवश्यक आहे.

१४. संघानुसत्ती

तीन रत्नापैकी संघ हे एक रत्न आहे. कंदन पासून ह्या रत्नाचा प्रारंभ झाला. तेंव्हापासून संघातील शिष्यामध्ये प्रचंड वाढ होत गेली. त्यासर्वांनी धम्माच्या शिकवणूकीचा प्रसार केला.

बुध्दाने धम्माचा शोध लावला व तो त्यांनी जगाला सांगितला. संघाशिवाय धम्म आजपर्यंत व पुढे अस्तित्वात राहणे शक्य नाही. केवळ संघामुळे तो बुध्दकाळापासून अस्तित्वात आहे. संघ जर नसता तर आज जगाला धम्माचा फायदा मिळाला नसता. श्रेष्ठ संघाने धम्म सत्य स्वरुपात लोकांना सांगितला व लोकांना ज्ञात केले. म्हणून संघ हा धम्माचा खजिनदार आहे. संघ धम्माचा अभ्यास करतो. धम्म आत्मसात करुन आचरणात आणतो व नंतर इतरांना देतो. ही पध्दत बुध्दानंतर सतत चालू आहे. म्हणून संघाने धम्म जोपासण्यासाठी महत्वाची भूमिका बजाविली आहे. केवळ त्याच्यामुळे धम्म आज जगभर फोफावू शकला. धम्माची वस्तूस्थिती २५०० वर्षापूर्वीची आजही जशीच्या तशी संघाने जनतेपुढे ठेवली आहे. त्यासाठी संघाचा मोठा प्रयत्न व त्याग आहे. संघ म्हणजे नीति व सदाचार यांचा संचय होय. पवित्र व श्रेष्ठ व्यक्तीचा संचय म्हणजे संघ होय.

मुळपाली -

सुप्पटिपन्नो भगवतो, सावक संघो,

उजुप्पटिपनो भगवतो सावक संघो

त्रायप्पटिपन्नो भगवतो, सावक संघो,

सामीचिप्पटिपन्नो भगवतो, सावक संघो,

यदिदं चत्तारिपुरिस युगानी अट्ढपुरिस पुग्गला

एस - भगवतो सावक संघो,

आहुनेय्यो, पाहुनेय्यो,

दक्खिणेट्यो, अज्जलगिकरणीयो, अनुत्तरं

पुत्र्यकखेतं लोकस्साति ।।

मराठी अर्थ -

भगवंताचा श्रावक संघ सन्मार्गावर आरुढ आहे. भगवंताचा श्रावक संघ न्यायमार्गावर आरुढ आहे. भगवंताचा श्रावक संघ उचित मार्गावर चाललेला आहे.

भगवंताचा श्रावक संघ आठ प्रकारच्या श्रेष्ठ पदांची प्राप्ती केलेल्या आणि चार जोड्यात

विभागलेल्या पुरुषोत्तमांचा बनलेला आहे.

हा संघ आमंत्रण देण्यास, पाहुणचार करण्यास, दान देण्यास आणि हात जोडून वन्दन करण्यास पात्र आहे. सर्व लोकांसाठी हा श्रेष्ठ संघ एक अनुत्तर पुण्यक्षेत्र आहे आणि सर्व लोकांचा खरा साथीदार आहे.

देव म्हणून आपण संघाचा आदर करीत नाही किंवा सन्मान करीत नाही. तर एकश्रेष्ठ व आदरणीस लोकांचा श्रावकाचा तो संघ आहे म्हणून आपण संघाचा आदर करतो. आपणास बुध्दधम्म केवळ संघामुळेच ज्ञात आहे. संघ जर नसता तर आपणास बुध्द, धम्म व शिकवणूकीची माहिती झालीच नसती. केवळ २५०० वर्षाची बुध्दशिकवणूक संघामुळेच जोपासल्या गेली आहे. व ती आज आपणास रत्नाच्या स्वरुपात मिळाली आहे म्हणून आपण संघाचा आदर करतो. अन्नदान करतो त्यांना विहारवासाकरीता लागणाऱ्या सर्व वस्तू दान करतो. व संघ त्यामुळे धम्म अभ्यासतात, आचरण करतात व प्रसार करतात. आज संघानेच धम्म जगाला दिला आहे.

भाग दुसरा बुध्दधम्मातील व थायलण्डमधील महत्वाचे वार

१५. वैशाख पूजा दिन

आज रविवार आहे. ताराच्या शाळेला सुट्टी आहे. ती रविवारच्या धम्मशाळेला जाते. तिचे शिक्षक वैशाख पूजा विषयी तिला व तिच्या मित्रांना माहिती देतात.

तारा : वैशाख पूजा म्हणजे काय?

शिक्षक : वैशाख पौर्णिमेस बुध्दाची पूजा करुन त्याच्याप्रती आदर व्यक्त करणे होय.

तारा : वैशाख पूजा साजरी कां करावी?

शिक्षक : आपण वैशाख पूजा तीन घटनामुळे साजरी करतो. कारण ह्याच दिवशी बुध्दाचा जन्म झाला, ह्याच दिवशी त्यांना ज्ञान प्राप्ती झाली व ह्याच वैशाख पौर्णिमेस निर्वाण प्राप्त झाले. आणि म्हणून ह्या दिवसाला आपण वैशाख पूजा दिन म्हणून मानतो.

तारा : सर! ह्या विषयी सविस्तर माहिती सांगा?

शिक्षक : ह्या दिवशीच तीन महत्वाचे प्रसंग बुध्दाच्या जीवनात घडलेले आहेत.

१. लुंबिनी येथील सुंदर वनामध्ये पौर्णिमेच्या दिवशी बुध्दाचा जन्म झाला.

२. वयाच्या पस्तीसाव्या वर्षी वैशाख पौर्णिमेच्या दिवशी बोधी वृक्षाखाली गया येथे ज्ञान प्राप्ती, दिव्यत्व प्राप्त झाले.

३. वयाच्या ऐंशीव्या वर्षी, सतत पंचेचाळीस वर्षे ज्ञानप्राप्ती नंतर धम्माची शिकवणूक, सत्याचा मार्ग सांगितल्यावर, साल वृक्षाखाली कुशीनगर येथे त्यांना निर्वाण प्राप्त झाले.

ह्या तीनही घटनांचा योगायोग म्हणावा लागेल. त्यांचा जन्म, ज्ञानप्राप्ती व निर्वाण ह्या तीनही घटना वैशाख पौर्णिमेच्याच दिवशी घडलेल्या आहेत.

तारा : सर ! श्रामणेर शब्दाचा अर्थ काय होतो?

शिक्षक : श्रामणेर म्हणजे तरुण भिक्खू ज़्यांनी संघात नुकताच प्रवेश केलेला आहे व भिक्खू जीवनाशी पूर्वपरिचीत नाहीत आणि त्याचे वय वीस वर्षापेक्षा कमी आहे. अशाला श्रामणेर म्हणतात. त्याच्यासाठी २२७ शील आहेत.

तारा : कोणकोणत्या देशात वैशाख पूजा साजरी केली जाते?

शिक्षक : वैशाख पूजा थायलंड, भारत, श्रीलंका, बांगलादेश, लाओस, चीन, जपान, कोरिया, मंगोलिया, इंग्लंड, सोविएत युनियन, अमेरिका, कॅनडा ह्या देशात साजरी करतात.

तारा : त्यादिवशी बुध्द उपासक काय करतात?

शिक्षक : ते विहारावर एकत्र येतात सोबत फुले, मेणबत्ती व अगरबत्त्या ठेवतात. बुध्दाप्रती भिक्खू समवेत पूजा करतात व आदर व्यक्त करतात. पंचशील ग्रहण करतात. जेथे शक्य आहे त्याठीकाणी बुध्दाची प्रतीमा, मूर्ती उजव्या बाजूला राहील त्या कृतीने तीन वेळा विहारामध्ये प्रदक्षिणा घालतात. प्रदक्षिणा (परिक्रमा) करताना बुध्द धम्म व संघाविषयी व त्याच्या सदाचाराविषयी स्मरण करतात. अशाप्रकारे वैशाख पूजा दिनी सर्व बुध्द उपासक बुध्दाप्रती आपला आदर व्यक्त करतात.

तारा : दैनदिन जीवनात उपासकाने कोणती कामे केले पाहिजेत?

शिक्षक : बुध्दाने तीन गोष्टी सांगितलेल्या आहेत.

१. कोणतेही वाईटकृत्ये करु नये

२. सतत चांगले कार्य करावे व इतरांना मदत करावी

३. मन शुध्द करावे (ठेवावे)

ही बुध्दाची प्राथमिक शिकवणूक आहे. आपण ती आत्मसात केली पाहिजे व आचरणात आणली पाहिजे. नंतरच आपणास शाश्वत सुख प्राप्त होईल. आपण वैशाख पूजा दिन तेव्हढ्यासाठी, स्मरण म्हणून साजरा करतो. व ती आपली जबाबदारी आहे. त्यानिमित्ताने तीन तत्वांचा उपयोग आचरणात करतो. सर्व सजीवाविषयी करुणा वृध्दिंगत करतो.

तारा : ह्या तीन तत्वाविषयी सविस्तर सांगा.

शिक्षक : ते खालीलप्रमाणे.

वाईटकृत्ये करु नये म्हणजे, हत्त्या करु नये, चोरी करु नये, व्यभिचार करु नये, खोटे बोलू नये, मद्यपान करु नये.

सतत चांगली कृत्ये करावीत म्हणजे आपण प्रामाणिक, सत्यवादी, जागृत असावे. आपण नेहमी करुणा व दया, शांती आचरणात आणावी.

मन शुध्द ठेवावे म्हणजे मन द्वेष, मत्सर, भ्रम, उत्कट इच्छा पासून परावृत्त करावे. हे आपण ध्यान भावनामधुन एकाग्रतेमधुन प्राप्त करु शकतो. चांगली विचारसरणी असल्यानंतरच मन शुध्द ठेवता येते.

तारा : सर! आपण सांगितलेल्या बाबी बद्दल मी कृतज्ञ आहे.

शिक्षक : ठीक आहे! आपले स्वागत असो.



१६. आषाढ पूजा

ह्या पाठामध्ये आपण आषाढ पूजाविषयी अभ्यास करु. जो बुध्द उपासकांसाठी महत्वाचा आहे. बुध्दाच्या जीवन काळात २५७५ वर्षापूर्वी ह्या दिवशी कोणती घटना घडली, पूजा आणि शिक्षक यांच्या मधील संवाद आपण पाहू.

पूजा : आषाढ पूजा म्हणजे काय? सर

शिक्षक : साधारणतः जुलै महिन्यात येणाऱ्या पौर्णिमेच्या दिवशी आपण बुध्दाची पूजा करतो व त्यांच्याप्रती आदर व सन्मान व्यक्त करणे म्हणजे आषाढ पूजा होय. बुध्द उपासकासाठी ही अत्यंत महत्वाची घटना होय.

पूजा : केंव्हा व कशाप्रकारे आषाढ पूजा साजरी करतात.

शिक्षक : सर्व बौध्द राष्ट्रामध्ये हा दिन साजरा केला जातो. प्रामुख्याने हा प्रथम इ.स. २५०१ मध्ये थाईलंडमध्ये साजरा करण्यात आला (१९५८)

पूजा : ह्या आषाढ पूजा दिनी बुध्दाच्या काळात कोणतां प्रसंग घडला सर?

शिक्षक : भगवान बुध्दाने ह्या आषाढ पूजा दिनी पाच शिष्यांना आपले प्रवचन देऊन ह्याच दिवशी पहिले पाच शिष्य (भिक्खू) बनविले होते. त्यांचे नांवे कौडिण्य, वप्प, भद्रेय, महानामा आणि अश्वजीत असून सारनाथ येथे मृगारण्यामध्ये सध्याच्या बनारस (भारत) येथे हा पहिला दिक्षा समारंभ झाला होता.

पूजा : सर ! मला सांगा पहिल्या दिक्षा समारंभानंतर पुढे काय झाले?

शिक्षक : सर्व श्रेष्ठ भिक्खू कौडिण्य ह्यास दिव्यत्व प्राप्त झाले (सोतापन्न अवस्था). ह्या धम्म प्रवाहात प्रवेश केल्यामुळे त्यास निर्वाण प्राप्त झाले.

पूजा : ह्या पहिल्या दिक्षा समारंभास काय म्हणतात?

शिक्षक : हा पहिला दिक्षा समारंभ धम्मचक्र प्रवर्तन सूत्त म्हणून सर्वाना ज्ञात आहे. धम्माचे गतीचक्र म्हणून सुध्दा ह्या दिनास ओळखतात.

पूजा : सर मी आभारी आहे! आणि ह्या पहिल्या धम्मोपदेशातील महत्वाची तत्वे कोणती?

शिक्षक : पहिल्या धम्मोपदेशातील खालील महत्वाची तत्वे आहेत.

१. दुःख २. दुःखाचे कारण ३. दुःख निरोध ४. दुःख निरोधनासाठी उपाय (मार्ग) थोडक्यात बुध्दाचा पहिला दिक्षा समारोह मानवी जीवनातील प्रश्नाशी निगडीत आहे. प्रश्नाचे कारण, प्रश्नाची उकल करणे व उकल करण्यासाठी पध्दती वापरणे.

पूजा : पहिला दिक्षा समारोह संपल्यावर पुढे काय झाले?

शिक्षक : आपण वर सांगितल्याप्रमाणे ह्या पांच शिष्यापैकी ज्येष्ठ शिष्य कौंडिण्य ह्यांना ज्ञानप्राप्ती झाली. निर्वाण पद प्राप्त झाले. त्याने बुध्दास विनंती केली की, त्यास भिक्खू म्हणून मान्यता द्यावी. आणि बुध्दाने कौंडिण्यला जगातील पहिला भिक्खू म्हणून मान्यता दिली.

पूजा : ह्या आषाढ पूजा दिनी आणखी कोणते महत्वाचे प्रसंग बुध्दाविषयी घडलेले आहेत.

शिक्षक : होय पूजा ! बुध्दाने ह्याच वेळी पहिला धम्मोपदेश लोकांना दिला. व बुध्दाला पहिला भिक्खू संघ ह्यावेळीच प्राप्त झाला. व विश्वामध्ये संघ हे पहिले रत्न निर्माण झाले.

पूजा : ह्या दिवशी बुध्द उपासक (थायलंड व इतर देशामधील) काय काम करतात?

शिक्षक : प्रातःकाळी लोक भिक्खूना, नवीन भिक्खूना व भिक्खूनीना अन्नदान करतात. व संध्याकाळी गरीब व अपंग लोकांना अन्नदान करतात. पंचशील ग्रहण करतात. धम्माविषयी विहारात भिक्खूचे प्रवचन ऐकतात. ध्यान भावना करुन मन अपकारक बाबीपासून परावृत्त करतात. हा उत्सव थायलंड, अमेरिका, आशियायी व युरोपियन देशातील बौध्द उपासक साजरा करतात.

पूजा : सर आज मी आपणाकडून खूप अध्ययन केले. मी आपली आभारी आहे. आपण माझ्यासाठी अमूल्य वेळ देऊन धम्माची अत्यंत मौलिक माहिती सांगितली.

१७. माघ पूजा

बुध्द धम्ममध्ये अनेक महत्वाचे व पवित्र दिन आहेत ते पौर्णिमेच्या दिवशी येतात. त्यापैकी वैशाख पूजा, आषाढ पूजा व माघ पूजा दिन हे महत्वाचे आहेत. ह्या पाठात माघ पूजा दिनाविषयी माहिती पाहू.

साधारणतः माघ पूजा मार्च महिन्यातील पौर्णिमा होय. ह्या माघ पौर्णिमेस दोन महत्वाचे प्रसंग बुध्दाच्या जीवनप्रणालीत घडले आहेत. पहिली घटना बुध्द धम्मातील संघाविषयी प्रारंभीच्या काळात घडलेली आहे.

पहिल्या वर्षावासानंतर बुध्द सारनाथ येथील मृगदायवनातून राजगीर शहराकडे गेले होते. १२५० अरहंत बुध्दाप्रती आदर व्यक्त करण्यासाठी बुध्दाची परवानगी न घेता राजगीरला जमा झाले होते. ते वेळूवनात सर्व एकत्रित झाले होते. तेथे सारिपुत्त व मोग्गलान हे मुख्य शिष्य सुध्दा होते. ह्या सभेला बहुश्रूत सभासुध्दा म्हणतात. कारण ह्या सभेत चार महत्वाचे घटक घेतलेले होते.

१. ह्या सभेतील १२५० शिष्य अरहंत होते.

२. ह्या सर्वांना अरहंतांना बुध्दाने प्रमाणित केलेले होते.

३. ते कोणतीही पूर्व कल्पना नसताना स्वतःहोऊन एकत्र आले होते.

४. ती माघ महिन्यातील पौर्णिमा होती.

बुध्द धम्मातील प्राथमिक तत्वे

बुध्दाने ह्या सभेत धम्मातील प्राथमिक तत्वे व बुध्द शिकवणूक ह्या सर्वांना स्पष्ट केली. व धम्माचे पालन करण्यास सांगितले.

सब्ब पापस्स अकरणं,
कुसलस्स उपसंपदा ।
सचित परियोदपनं
एतं बुध्दान सासनं ।।

अर्थ : कोणतेही पाप न करणे पुण्य संपादणे, स्वचित्ताची शुध्दी करणे हे बुध्दाचे सांगणे.

ही धम्म शिकवणूकीची प्राथमिक तत्वे आहेत. जर जगातील सर्व जनतेने ह्या तत्वाप्रमाणे आचरण ठेवले तर त्याचे जीवन सुखी व शांतीमय निश्चित राहील. हा बुध्द धम्मातील संघाविषयी उपदेश देण्या संदर्भातील महत्वाचा पहिला प्रसंग होय म्हणून माघ पूजा दिनाचे महत्व अन्योन्य साधारण होय.

महत्वाचा निर्णय

बुध्दाच्या जीवनातील दुसरा महत्वाचा निर्णय त्यांच्या आयुष्याच्या अंतिम वर्षात बुध्दाने ह्या माघ पौर्णिमेलाच घेतला होता. साधारणतः मार्च महिन्यातील ती माघ पौर्णिमा होय.

बुध्दाने ह्या माघ पौर्णिमेला धम्म प्रवचन दिले त्याला इदि - पाद - धम्म तथा हेतू धम्म म्हणतात. हेतू धम्मामध्ये यशाचे गमक, महत्वाकांक्षा, प्रयत्न, वैचारिकता व संशोधन ह्या मुख्य बाबी आहेत. त्यांनी त्यावेळी आपला शिष्य आनंद ह्यास आपला कठोर निर्णय सांगितला की, मे महिन्यातील वैशाख पौर्णिमेस मी निर्वाण प्राप्त करणार आहे. माझ्या जीवनातील आजपासून बाकी असलेले केवळ तीन महिने आहेत. बुध्दाच्या जीवनातील ह्या माघ महिन्यात घडणाऱ्या दोन महत्वाच्या घटना आहेत. अत्यंत महत्वाचे असे हे प्रसंग होत. वैशाली शहराजवळ उत्तर भारतातील हे ठीकाण ह्या प्रसंगाची साक्ष होत. बुध्द, धम्म व संघ ही अत्यंत मौल्यवान अशी तीन रत्ने होत. त्यांच्या प्रती माघ पौर्णिमेस वंदन (पूजा) करुन आदरव्यक्त केला जातो. म्हणून ह्यास माघपूजा म्हणतात. ज्या ज्या देशात बुध्दाचे उपासक राहतात तेथे माघ पूजा मोठ्या स्वरुपात साजरी केली जाते.

माघ पूजा कार्यक्रम

माघ पौर्णिमेस (लोक) उपासक सकाळी भिक्खूला अन्नदान करतात व आपण केलेल्या कामाचे मोजमाप करुन मूल्यांकन करतात. दुपारी गरीब दुबळयांना अन्नदान करतात. नंतर विहारात जाऊन पंचशील ग्रहण करतात व भिक्खूकडून धम्म प्रवचनाचा लाभ घेतात. संध्याकाळी विहारावर मेणबत्ती पूजा करण्यासाठी एकत्र येतात. मेणबत्त्या पेटवून सर्व सहभागी होतात व बुध्दाप्रती वंदन करुन आदर व्यक्त करतात. सोबत फुले, अगरबत्ती ठेवतात व बुध्दास अर्पण करतात.

बुध्द विहारास परिक्रमा करतात बुध्द वंदना, धम्म वंदना व संघ वंदना परिक्रमा चालत असतांना म्हणतात. व माघ पौर्णिमेस घडलेल्या दोन्ही प्रसंगाचे स्मरण करतात. बुध्द, धम्म व संघाप्रती आदर व्यक्त करतात.

आपण केवळ बुध्द, धम्म व संघाप्रती वंदन करुन आदर व्यक्त करणे पुरेसे नाही तर त्याचवेळी तीन महत्वाची तत्वे आचरणात ठेवावी. सतत चांगले कृत्ये करावे, वाईट कृत्यापासून अलिप्त असावे व मन सतत शुध्द असावे. स्वचित्ताचे शुध्दीकरण असावे.



१८. कठीण चिवरदान

प्रथम बुध्दधम्म ज्यावेळी अस्तित्वात आला त्यावेळी भिक्खू भिक्खूनीची संख्या कमी होती. तेंव्हा ते सर्व धम्म प्रचारासाठी सतत अविश्रांत भ्रमण करीत होते. ते एकाच ठीकाणी कोठेही थांबत नव्हते. बुध्दाची शिकवणूक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सतत भ्रमण करीत होते. जनतेच्या कल्याणासाठी व सुखशांतीसाठी बुध्दाची शिकवणूक लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य संघ सतत करीत असे.

पावसाळ्याच्या दिवसात सतत पाऊस पडत असल्यामुळे त्यांना एकाठीकाणाहून दुसऱ्या ठीकाणी जाणे कठीण होते. त्यांच्या भ्रमंतीमध्ये पावसामुळे आडकाठी येत असे. शेतकरीसुध्दा शेती पेरणी व उगवण कामात गुंतलेले असत. त्यामुळे बुध्दाने भिक्खूसंघास पावसाळ्याच्या दिवसात तात्पुरत्या स्वरुपाच एका ठीकाणी थांबण्याची व भ्रमण थांबविण्याची परवानगी दिली होती. त्यालाच वर्षावास म्हणतात. साधारणतः वर्षावास जुलै ते आक्टोबर महिन्याच्या दरम्यान असतो. सर्व जगातील भिक्खू भिक्खूंनी वर्षावास काळात एकाच ठिकाणी वास करतात. काही ठीकाणी वर्षावासकाळात बदल करण्यात आला आहे.

भिक्खू व भिक्खूनीच्या तीन महिन्याच्या एकान्तवास अनुष्ठानानंतर दक्षिण एशियायी देशामध्ये मोठा उत्सव साजरा करुन त्यांना अन्नदान केले जाते. त्याचवेळी संघातील सर्व भिक्खू भिक्खूनीस चीवर दान करतात. ह्या पित्तरंगाच्या वस्त्रास कठीण चिवरदान म्हणतात. हा समारंभ पौर्णिमेस एकान्तवास अनुष्ठानानंतर केला जातो.

थायलंडमधील वर्षाउत्सव : नद्या, तलाव पाण्यानी तुडूंब भरलेले असतात अशा पावसाळ्यातील पौर्णिमेच्या दिवशी थाई उपासक हा वर्षा उत्सव आनंदाने साजरा करतात. थाई संस्कृतीमध्ये ह्या उत्सवास लॉयक्रथोंग उत्सव म्हणतात. उपासक ज्यांना ह्या उत्सवात भाग घ्यावयाचा आहे ते पानाच्या द्रोणामध्ये मेणबत्ती, फुले, अगरबत्ती, मिष्ठान्न तथा पैसे घेऊन एका निश्चित केलेल्या ठीकाणी एकत्र येतात.

प्रत्येकजण आपल्याकडील मेणबत्त्या पेटवितात. तलावातील, नदीतील तथा अन्य वाहत्या पाण्यातील पृष्ठभागावर क्रथाँग सोडतात. नदीवरील विहार करण्याच्या बुध्दाच्या स्मरणार्थ त्यांना वंदन करुन पूजा केली जाते.

थाई इतिहासानुसार राजा रुंगच्या काळात नागनोफामस ह्या महिलेने क्रथाँग तयार करण्यासाठी आपले कौशल्यपणास लावून सुंदर क्रथाँग तयार केले होते. त्यामुळे कलाकारांच्या स्मरणार्थसुध्दा ह्या उत्सवास महत्व दिले जाते. त्यामुळे मुलामुलींना व इतर जनतेला एकत्र येऊन प्रत्येकाला भेटण्याची संधी प्राप्त होते. ह्याकाळास सुखोताई काळापासून प्रारंभ झाला असून आजही तो उत्सव साजरा केला जातो.

१९. साँगक्रन उत्सव

आज तेरा एप्रिल आहे. थायलंडमध्ये एप्रील महिन्यात उन्हाळ्याच्या सुट्ट्या असतात आणि अमेरिकेत वसंत ऋतु असतो. शिकागोमध्ये उन्हाळ्याच्या सुट्ट्या सुरु होण्यास आहेत. जॉनी व्हिकीला सांगतो.

सतीत म्हणाला माझे वडील आणि मी आज सकाळीच उठून शिकागो येथील विहारात गेलो होतो. तेथे विहाराबाहेर पुष्कळ भिक्खू होते. त्यांच्या हातामध्ये भिक्षापात्र होते. ते एका ओळीत उभे राहून चालत होते. माझे वडील व इतर लोक त्यांच्या समोर उभे होते व त्यांच्या भिक्षापात्रात अन्नदान करीत होते. मी, जॉनी व व्हिकीला चर्चा करताना ऐकले. त्यांचा आपसात संवाद चालू होता.

जॉनी : तुला भिक्खू दिसतात?

व्हिकी : होय! मला भिक्खू दिसतात.

जॉनी : तुला उपासक दिसतात?

व्हिकी : होय! तेथे उपासक सुध्दा आहेत.

जॉनी : उपासक काय करतात?

व्हिकी : उपासक भिक्खूना अन्नदान करतात.

जॉनी : तू भिक्खूना अन्नदान करतो?

व्हिकी : नाही! माझे वडील व बहीण भिक्खूना अन्नदान करतात.

जॉनी : हे उपासक दररोज भिक्खूना अन्नदान करतात का?

व्हिकी : होय! काही उपासक रोज अन्नदान करतात तर कांही करीत नाहीत.

जॉनी : आज पुष्कळसे उपासक भिक्खूना अन्नदान कां करतात?

व्हिकी : आज तेरा एप्रिल आहे. साँगक्रन उत्सव आहे. आज थाई नववर्ष आहे. ह्या नववर्षानिमित्त उपासक विहारात जातात. भिक्खू, भिक्खूणीस अन्नदान करतात. त्याचप्रमाणे अपंगास व गरीबांससुध्दा अन्नदान करतात.

जॉनी : दुपारनंतर काय करतात?

व्हिकी : दुपारनंतर बुध्दमूर्ती व भिक्खू यांचे वर उपासक गुलाब पाण्याचा वर्षाव करतात. आदर व्यक्त करण्याचा हा एक संकेत होय. ह्या मोबदल्यात भिक्खू त्यांना आशिर्वाद देतात.

जॉनी : पालकाप्रती मुले कशाप्रकारे आदर व्यक्त करतात?

व्हिकी : पालकांना छोटी भेट वस्तू देतात आणि प्रेम व आदराप्रित्यर्थ अंगावर गुलाब पाण्याचा वर्षाव करतात. त्या मोबदल्यात पालक मुलांना आशिर्वाद देतात.

जॉनी : साँगक्रन दिनाच्या अगोदरच्या दिवशी लोक (थाईउपासक) काय करतात?

व्हिकी : ते त्यांची घरे स्वच्छ करतात व कपडे स्वच्छ करतात, अन्न तयार करुन दुसऱ्या दिवशी भिक्खूना ते अन्नदान करातत.

जॉनी : थाई उपासक साँगक्रनदिनी शिकागो येथे काय करतात?

व्हिकी : शिकागोतील थाई उपासक जे तेथे आहे ते थाई पध्दतीप्रमाणेच हा नववर्षाचा उत्सव साजरा करतात. थायलंडमधील सर्व उपासक हा नववर्षाचा उत्सव मोठ्या आनंदाने साजरा करतात. सर्व उपासक त्यांची घरे, गावातील रस्ते स्वच्छ करतात. दोन तीन दिवसपर्यंत भिक्खू नवभिक्खू ह्याच्यावर गुलाब पाण्याचा वर्षाव करतात.

जॉनी : थायलंडमधील शाळांना ह्या दिवशी सुट्टी असते काय?

व्हिकी : होय! थायलंडमध्ये ह्या नववर्षाची सार्वजनिक सुट्टी असते. थाईपध्दतीनुसार हे नववर्ष साजरे केले जाते.

जॉनी : नवीन वर्षाचे अभिनंदन व्हिकी

व्हिकी : नवीन वर्षाचे तुझेही अभिनंदन जॉनी


जॉनी : भिक्खूना अन्नदान केल्यानंतर मोठ्या शहरातील व वटधम्मराम विहारातील लोक काय करतात?

व्हिकी : ते पंचशीलाचे ग्रहण करतात, धम्म जाणतात व विहारास पैशाचे सुध्दा दान करतात.


जॉनी : लोकांना धम्माविषयी कोण माहिती देतो.

व्हिकी : धम्मविषयी चर्चा व शिकवणूक ही भिक्खूकडून दिली जाते. ती धम्मशिकवणूक दैनंदिन जीवनाशी निगडीत असते.





सांची स्तूप



भाग तिसरा - बुध्दधम्म व समाज, धम्म दैनंदिन जीवनासाठी

२०. समाज व विहार यांचे नाते

पूर्वइतिहास

थायलंडमध्ये तेथील सामान्य जनता व विहार ह्यांचा फार वर्षापासून जवळचा संबंध आहे. थाई बौध्दानी सामान्यतः जनतेसाठी प्रथम विहार निर्माण केले व त्यातून विहार संस्थांची निर्मिती झाली. त्याचप्रमाणे इतर देशामध्ये सुध्दा त्यांनी विहार संस्था निर्माण केली. ते बुध्दधम्माविषयी सखोल विश्वास ठेवतात व दैनंदिन जीवनात बुध्दधम्म आचरणात आणतात. थायलंडमध्ये लग्न समारंभ, वाढदिवस, पूण्यतिथी ह्या सर्व कार्यक्रमात भिक्खूचा मुख्य सहभाग असतो.

तात्पुरता संघप्रवेश

थायलंडमध्ये उपासक भिक्खूना प्रत्येक कार्यक्रमासाठी निमंत्रित करतात. व त्यामुळे तो कार्यक्रम आणखी धार्मिक बनतो. त्याबरोबरच भिक्खू समाज रचनेचे कार्यसुध्दा त्यावेळी करतात व त्यामधुन जनतेमधील जवळीकतेचे संबंध प्रस्थापीत करतात. थाईलंडमध्ये पुरुषाकरीता एक प्रथाच आहे की त्यानी वयाच्या पंचेवीस वर्षेपर्यंत संघामध्ये तात्पुरत्या स्वरुपात वास्तव्य करावे. साधारणतः पावसाळ्यातील दिवसात त्यांनी एकांतवास व वर्षावास करावा. त्यानंतर ते सामान्य गृहस्थ होतात. सोबत बुध्दधम्म तत्वे घेऊन दैनंदिन जीवनासाठी ती आचरणात आणतात. काही स्त्रियासुध्दा तात्पुरत्या किंवा कायमस्वरुपी भिक्खूणी बनतात.

विहार संस्थेची भूमिका :

ग्रामीण भागात प्राथमिक शाळा प्रामुख्याने विहार संस्थेमध्येच चालतात. थायलंडमध्ये

ह्या प्राथमिक शाळेत बहुतेक भिक्खूच अध्यापक असतात. युरोप व अमेरिकेतील ख्रिस्ती मिशनऱ्याप्रमाणे ते अध्यापन कार्य करतात. विहार संस्थेमध्ये एक मोठे धम्म सभागृह असते. ते गावातील प्रत्येक कार्यासाठी सर्वांना मुक्त असते. ही शाळेची इमारत गावासाठी महत्वाचे काम करते. बाहेरुन येणारे प्रवाशी, गावातील पंचायत बैठक, उपहार गृह व शाळा अशा विविध कार्यासाठी शाळेच्या इमारतीचा गावातील व्यक्ती उपयोग करतात.

तद्वतच विहार हे गावासाठी माहिती केंद्र, बहुविध कार्यक्रम केंद्र मानसिकदृष्ट्या त्रासलेल्यासाठी निवारा केंद्र तर वृध्दासाठी आश्रमस्थान होय. गावातील मुले मुली भिक्खूकडून प्राथमिक स्तरावर वाचन, लेखन, थाई अंकगणित व पंचशील अध्ययन करतात.

सामान्य उपासक :

अष्टमी व पौर्णिमा ह्या दिवशी उपासक विहारावर जातात. भिक्खू, नवभिक्खू आणि भिक्खूणीस अन्नदान करतात. त्यानंतर उपासक पंचशील ग्रहण करतात. ध्यानभावना करतात व त्यादिवशी संपूर्ण दिवस - रात्र विहारावर थांबून ध्यान भावना करतात. अष्टमी व पौर्णिमेस वानप्रहर म्हणतात. विहाराचे मैदान सुंदर असे तयार केलेले असते त्यावर विविध सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्याने व निवडणूक विषयक कार्यक्रम सहज व व्यवस्थित घेता येतात.

सध्या विहार व समाज ह्याच्यामध्ये बराच बदल झालेला आहे. मोठ्या शहराध्ये शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि विश्वविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी ज्यांची राहण्याची व्यवस्था नाही किंवा त्यांची व्यवस्था होईपर्यंत विहारातच राहतात अभ्यास करतात. त्यांच्याकडून कोणतीही शुल्क घेतली जात नाही असे विद्यार्थी आपला अभ्यासक्रम विहारात राहून पूर्ण करतात.

पश्चिम अमेरिकेत सध्या ३५ थाईविहार आहेत. त्यापैकी सात विहारामध्ये रविवारला धम्माचे अध्ययनकार्य होते व त्याचबरोबर थाई भाषा शिकविली जाते. थाईसंस्कृती आणि बुध्दधम्म भिक्खूकडून किंवा सामान्य बौध्द व्यक्तीकडून रविवारला शिकविला जातो. ह्या विहारसंस्थासुध्दा समाजाचे एक बहूविध कार्यक्रम केंद्र आहेत.

उदाहरण म्हणून वट धम्मराम थाई विहार शिकागो, इल्लीनोइस, लॉस एन्जीलस, कॅलिफोर्निया येथील विहाराचे घेता येईल. हे विहार केवळ थाई जनतेसाठी नसून सर्वांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यासाठी, करमणूकीचे कार्यक्रम घेण्यासाठी स्थानिक सर्व लोकासाठी मुक्त आहेत. मध्य पश्चिमेकडील सर्व बौध्द परिषदा येथेच होतात. अमेरिकन बौध्दांसाठी, कॉंग्रेससाठी, शिकागो असोसिएशनसाठी ह्या विहाराचा उपयोग करतात. पहिली आंतरराष्ट्रीय विशाखा परिषद येथेच १९८५ ला भरली होती. २८ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर ९३ ला जागतिक धम्म परिषद ह्याच वटधम्मराम शिकागो विहारातच घेण्यात आली होती.

आज वटथाई विहार लॉस एन्जीलीस, कॅलिफोर्नियामधील विहारांतसुध्दा सर्व जनतेसाठी विविध उपक्रम घेण्यात येतात. लॉस एन्जीलीस मधील विहारात रोजगार प्रशिक्षण केंद्र चालू करण्यात आले आहे. शहरात राहणाऱ्यासाठी मूल्य शिक्षण दिले जाते. विहार व शहर यांच्यात जवळीकतेचे संबंध प्रस्थापित केले जात आहेत. अशाप्रकारे थाईविहार व तेथील स्थानिक समाज ह्यांच्यामधील संबंध वाढविले जात आहेत.

श्रेष्ठ उदाहरण

बुध्द शिकवणूकीत प्रारंभीपासूनच बुध्दाने सतत भिक्खू व भिक्खूणीस सांगितले होते की तुम्ही सामान्य जनतेची व समाजाची सेवा करा. भिक्खू व भिक्खूणी यांनी त्यांच्या तत्वाचा स्विकार करुन समाजाला पंचशील तत्वे सांगतात. त्यांना मार्गदर्शन करतात. सुखी जीवनाचा मार्ग दर्शवितात, ध्यानभावना करण्यासाठी मागदर्शन करतात व धार्मिक विकास समाजामध्ये घडवून आणतात. भिक्खू व भिक्खूणी ह्या निःस्वार्थीपणे सतत करुणा, दया व मदतीचा हेतू ठेवून समाजात वावरतात. बुध्दाने सतत ४५ वर्षे धम्म प्रचाराचे काम केले. सारनाथ येथील मृगवनात पहिले धम्म प्रवचन प्रारंभ करुन शेवटचे धम्म प्रवचन कुशीनगर येथील सालवृक्षाखाली दिले.

सारांश - ज्ञानप्राप्तीनंतर बुध्दाने जनतेला धम्म शिकविला, मार्गदर्शन केले व सत्याचा मार्ग दाखविण्यासाठी मदत केली, सुखांचा शाश्वत मार्ग दाखविला व श्रेष्ठ जीवन जगण्यासाठी मार्गदर्शन केले. ह्या सर्व बाबींसाठी त्यांनी आपल्या सुखी जीवनाचा त्याग करु सर्व जनतेला सुखाचा मार्ग दाखविला. ज्यामध्ये शब्दाचरण, प्रज्ञा, शील व करुणा हे मुख्य आधार होत. तद्वतच सर्व विहारसंस्थामध्ये कोणत्याही प्रकारची बंधनं न ठेवता सर्वांना धम्म सांगितला जातो. लोकांची सेवा केली जाते. म्हणून उपासक विहाराची व्यवस्था ठेवून सर्वतोपरी सहकार्य करतात. त्याचप्रमाणे धम्मासाठीसुध्दा सहकार्य करतात.





२१. गुणी मुलं

''कृतज्ञता हे चांगल्या व गुणी मुलांचे लक्षण होय''

आज रविवार आहे. जूनच्या शाळेला आज सुट्टी आहे. वट धम्मराम हे इलिनॉईस व शिकागो येथे राहणाऱ्या थाई जनतेने स्थापन केलेल्या बुध्द विहाराचे नांव आहे. ह्या स्थानाचा अर्थ म्हणजे धम्मस्थान होय. तेथे बुध्दधम्म शिकविला जातो व तेथे भिक्खू राहतात.

जून रविवारच्या शाळेत थाई भाषा, बुध्दधम्म व थाई संस्कृतिचा अभ्यास करते. ती चांगली हुशार विद्यार्थीनी आहे. ती अभ्यास करताना वर्गात पूर्ण लक्ष केंद्रित ठेवते. जूनला चांगला मित्र आहे. त्याचे नांव प्रिच्चा आहे. जून व प्रिच्चा दोघेही एकाच वर्गात शिकतात. त्यांची घरे वटधम्मराम विहारापासून जवळ आहेत. त्यांचे पालक त्यांना आठवड्यातून दोन वेळा वटधम्मराम विहारास घेऊन जातात.

एके दिवशी वर्ग संपल्यावर जून व प्रिच्चा भिक्खूना भेटण्यासाठी गेले व बुध्द जीवनाविषयी माहिती विचारली. भिक्खू म्हणाले तुम्ही हुशार विद्यार्थी आहात! त्यावर विद्यार्थ्यांनी त्यांचे आभार मानले. आपणास कसे माहित झाले सर? मला तुमच्या पालकाकडून माहिती मिळाली, की तुम्ही शनिवारी सकाळी लवकर उठता व स्वतःची खोली, घर स्वच्छ करण्यासाठी, कपडेधुण्यासाठी, जेवनाचा मेज लावण्यासाठी घरकामात मदत करता.

सकाळची न्याहारी झाल्यावर दिलेले गृहपाठ व अभ्यास करतात. पालक त्यामुळे तुमच्यावर खुष आहेत की अशा प्रकारची हुशार मुलगी व मुलगा आहेत. तुम्ही मेहनती मुले आहात काम करता व अभ्याससुध्दा करता. मागच्या आठवड्यात तुमच्या आईकडून शालेय प्रगती कशी आहे ते समजले. तुमचे प्रगतीपत्रक सांगते की तुम्ही हुशार आहात. तुमची वर्तणूक चांगली आहे. नियमीत अभ्यास करण्याची सवय आहे. व तुम्ही वर्गात पूर्ण लक्षपूर्वक काम करता.

शांतपणे भिक्खूने जे सांगितले ते त्यांनी ऐकूण घेतले. ही चांगल्या विद्यार्थ्यांची लक्षणे आहेत. ही कृतज्ञ मुलांची लक्षणे आहेत. जूनचीसुध्दा प्रगती व वर्तन चांगले आहे. तुम्हा

दोघानां पाहून मला खुप बरे वाटले. ठीक आहे! तुम्ही घरी परत जाण्यापूर्वी मला आणखी तुम्हास कांही सांगावयाचे आहे.

बुध्दाविषयी नवीन कांही सांगावयाचे आहे. बुध्दाने आपणास सांगितले आहे की चांगली मुले ही आईवडीलावर प्रेम करतात, त्यांचा आदर करतात. कारण पालक हे त्यांचे निर्माते आहेत. ते त्यांना जन्म देतात व जगाची ओळख करुन देतात. त्यांनी आईवडीलांशी अज्ञाधारक असलेच पाहिजे. त्यांनी कधीही (insolvent) उध्दटपणे आईवडीलांशी वर्तन करु नये.

जर मुलांना कांही प्रसंग आईवडीलाबरोबर स्पष्ट करावयाची असतील तर ती आदरपूर्वक त्यांच्या समोर मांडावीत. त्याला माहित असले पाहिजे की, आपले पालक आपल्यावर किती प्रेम करतात व त्याग करतात. त्यांच्या प्रगतीविषयी स्वाभिमान बाळगतात. तेंव्हा मुलांनी आईवडीलांना दिलेले प्रेम अतिशय कृतज्ञतापूर्वक परत दिले पाहिजे. व त्यांच्या इच्छा अज्ञाधारकपणे पूर्ण केल्या पाहिजेत.

त्यांनी भिक्खूंविषयीसुध्दा आदर ठेवला पाहिजे. त्याचप्रमाणे धम्मसंस्कृती विषयीसुध्दा आदर ठेवावा. चांगली मुले ही स्वार्थी नसतात. सामाजिक दृष्ट्या सर्वांसाठी ते दयाळू असतात. कोणत्याही सजीवाप्रती ते दयाळू असतात. ते सर्वांशी प्रेमाने बोलतात व सर्वांशी दयाळूपणाने वागतात. भिक्खू म्हणाले आजच्यासाठी एव्हढे पूरे झाले. पांचवाजण्याची वेळ झाली आहे आता तुम्ही घरी जाऊ शकता.

जून व प्रिच्चा भिक्खूस वंदन व नमस्कार करुन परत जातात.

२२. सामाजिक कर्तव्ये (भाग १)



हिंदू विचारसरणी प्रमाणे हिंदू लोक सर्व दिशा, सूर्य, चंद्र, नद्या, पर्वत व मोठे वृक्ष ह्यांची सर्वांनी आशिर्वाद (पुण्य) प्राप्तीसाठी पूजा करतात. ब्रह्माने सर्व श्रृष्टीची निर्माती केली आहे त्यामुळे श्रृष्टीतील सर्वाची ते पूजा करतात. आजही ते ह्याच तत्वाला मानतात व पूजा करतात.

बुध्द जेव्हा वेळू वनात राजगीरजवळ वास करीत होते तेंव्हा त्यांना सिगल तरुण अशाप्रकारे चारही दिशांची पूजा करतांना भेटला तो चारही दिशांची पूजा करुन वर पाहत होता नंतर खाली पाहत होता. बुध्दाने त्याला विचारले अशाप्रकारची पूजा तू कशामुळे करतो? सिगलने उत्तर दिले की, माझ्या वडीलाने मृत्युपूर्व सांगितलेल्या पवित्र शब्दामुळे त्यांना आदर व्यक्त करण्यासाठी ही अशा प्रकारची पूजा मी करित आहे. त्यामुळे मी जर अशाप्रकारची पूजा केली तर मला देवाचा आशिर्वाद प्राप्त होईल.

बुध्दाने त्याला उत्तर दिले की, ठीक आहे तू ही अशाप्रकारची पूजा कर! परंतु तुला तो विधी समजला नाही. तुझे पहिले कर्तव्य आहे की तू तुझे घर सांभाळावे, तुझी पत्नी, तुझी मुले सांभाळावीत व त्यांना कोणतेही वाईट कृत्ये करण्यापासून परावृत्त करावे. मी तुझ्यावर वडीलाप्रमाणेच प्रेम करतो. मी तुला ह्या सहा दिशांचा अर्थ सांगतो तो असा आहे.

- आई वडील हे पूर्व दिशा आहेत.
- शिक्षक हे दक्षिण दिशा आहेत.
- मुले, पत्नी हे पश्चिम दिशा आहेत.
- मित्र व आप्त हे उत्तरदिशा आहेत.
- सहकारी व नोकर किंवा कामकरी वर्ग हे खालील दिशा आहेत.
- तर भिक्खू आणि भिक्खूणी हे तथा धार्मिक व्यक्ती ह्या(वरील)वरची दिशा आहेत.

सिगल म्हणाला भगवान मला ह्याविषयी सविस्तर माहिती सांगा.

बुध्दाने त्यास सविस्तर माहिती देत सांगितले की, पूर्व दिशा पालकांशी संबंधीत आहे. आपल्याला पालकांनी जन्म दिला, ते आपली काळजी घेतात व आपली प्रगती साधण्यासाठी प्रयत्न करतात. आपले आईवडील आपणास वाईट मार्गापासून परावृत्त करतात व चांगले काम करण्यासाठी प्रोत्साहित करतात. आपल्याला शिक्षण देतात व योग्यवेळी त्यांची संपत्ती आपल्याकडे सोपवितात. आपण त्यांची मुले आहोत तेंव्हा आपण आईवडीलांना मदत करुन त्यांच्या प्रत्येक बाबीची काळजी घेतली पाहिजे. त्यांची वंशावळ सांभाळली पाहिजे. त्यांच्या कौटूंबिक चालीरिती जपल्या पाहिजेत.

त्यांच्या कार्याचा वारसा ठेवण्यासाठी व सांभाळण्यासाठी लायक असले पाहिजे. ते मृत्यु पावल्यानंतर त्यांचा वारसा सद्‌गुणीवृत्तीने सांभाळला पाहिजे.

सिगल दक्षिण दिशा शिक्षकाच्या संदर्भात आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षकास पाच प्रकारची सेवा तथा मदत करावी. जेव्हा ते वर्गात प्रवेश करतील तेंव्हा उभे राहून त्यांचे स्वागत करावे. शिक्षकांच्या गरजेपूर्ती त्यांना मदत करण्यास तयार असावे. ते शिकवित असतांना त्यांच्या अध्यापनाकडे पूर्ण लक्ष द्यावे. त्यांना व्यक्तीगत सेवा द्यावी. जेंव्हा शिक्षकांविषयी विद्यार्थींनी कसे वागावे हे झाल्यावर शिक्षकाने विद्यार्थ्यांप्रती मदत कशी करावी ते येणे प्रमाणे.

- शिक्षक जसे स्वतः त्याविषयाचे ज्ञात असतात तसेच मुलांना त्यांनी ज्ञानी करावे त्यांना उपदेश करुन कोणत्या बाबी आवश्यक आहेत ते शिकवावे.
- अध्यापन करतांना काळजीपूर्वक आवश्यक बाबी शिकवाव्यात.
- कोणत्याही विषयाचे अध्यापन करतांना त्यातील काहीही मागे ठेवू नये किंवा गुप्त ठेऊ नये.
- मुलांची त्यांच्या मित्रपरिवारात योग्य स्तुति करावी.
- प्रत्येक प्रसंगी त्यांची काळजी घ्यावी. पुढे ते कोठेही गेले तरी त्यांची काळजी ते स्वतः घेतील.

सिगल घरातील वडीलधाऱ्या माणसांसंदर्भात ह्या दोन दिशा विषयी प्रथम काळजी घ्यावी. जेथे आशिर्वाद असेल तेथे आनंद व सुख असेल. भगवान मी आपला अत्यंत ऋणी आहे. आपल्या शिकवणूकीमुळे मी धन्य झालो. भगवान बाकी दिशाविषयीसुध्दा सविस्तर सांगा.

२३. सामाजिक कर्तव्ये (भाग २)

पूर्व दिशेचे (आईवडील), पालकाविषयी असलेले महत्व आणि दक्षिण दिशांचे शिक्षकाविषयी असलेले महत्व मागील घटकात बुध्दाने सिगल ह्या गृहस्थी युवकास राजगीर येथे स्पष्ट केलेले आपण शिकलो. राजगीर ही मगध राज्याची पूर्वकाळी राजधानी होती. ह्या घटकामध्ये बाकीच्या दिशांचे, पश्चिम दिशा पत्नी विषयी, उत्तर दिशा मित्राविषयी, खालील दिशा मालक नोकर आणि वरची दिशा भिक्खू भिक्खूणी, अभ्यासक विषयी असलेले महत्व भगवान बुध्दाने जे सांगितले ते ह्या घटकात पाहू.

आज पाश्चात्य संस्कृती, सहकार व अन्योन्य जबाबदारी पेक्षा व्यक्तीगत स्वायत्ततेवर, जास्त भर देते. अशाप्रकारचा कल सध्याच्या पुरुष व महिलामध्ये, नोकर व मालकामध्ये पाश्चात्य राष्ट्रात जाणवत आहे. तेव्हा समाजाने आज खालील मार्गदर्शक तत्वाचा उपयोग करणे जरुरीचे आहे.



पत्नी प्रति पतीनें खालीलप्रकारे आदर व्यक्त करावा तो बुध्दाने सिगला येणे प्रमाणे सांगितलेला आहे.

पतीची कर्तव्ये :

- तिची स्तुति करावी, योग्य समान करावा.
- तिला कमी मानू नये, तिचा तिरस्कार करु नये.
- तिच्याशी प्रामाणिक असावे.
- तिचा आदर करावा व घर कामात सहकार्य करावे.

- शक्य तेव्हढे कपडे, दागिणे प्रदान करावेत.

पत्नीची कर्तव्ये

- पत्नीने घरप्रपंचाची कर्तव्ये जास्तीत जास्त चांगल्या रितीने पार पाडावीत.
- पतीच्या नातेवाईकांशी, मित्राशी आदरयुक्त व्यवहार ठेवावा.
- पतीशी एकनिष्ठ असावे.
- पत्नीने तिच्या कर्तव्याची पूर्णपणे एकाग्र राहून आपली जबाबदारी सांभाळावी.
- मौल्यवान वस्तुची, संपत्तीची काळजी घेऊन त्याचे रक्षण करावे.

बुध्द म्हणाले सिगल! जर पत्नी व पती ह्या सद्‌गुणीविचारापासून दूर गेलेले असतील तर ते त्यांच्या कौटूंबिक जीवनात सुखी राहणार नाहीत. समजले का सिगल! सिगल म्हणाला होय भगवान! हे अत्यंत उपयुक्त स्पष्टीकरण आहे. भगवान मी हे ऐकूण अत्यंत समाधानी झालो.

बुध्द म्हणाले सिगल! मित्र एकमेकांशी चांगले व प्रामाणिक असावेत. मी तुला चांगल्या मित्राची वैशिष्ट्ये सांगतो. तो प्रत्येकबाबतीत कसा असावा. त्याचे संभाषण करुणामय असावे व दोघांनाही आनंदी करणारे असावे. मदत व संरक्षण दोघाच्या सहवासात असावे. त्यांचा परस्पर चांगला कल असावा. तो परस्परांच्या भावना दुखविणारा नसावा.

मित्र हे सत्य व शब्दाला पाळणारे असावेत आणि संकटसमयी एकमेकाच्या मागे उभे राहणारे असावेत. चांगला मित्र आपल्या मित्रास मार्गदर्शक असतो. वाईटबाबी टाळण्यास सांगतो, मादकद्रव्ये, धुम्रपान व पद्यपानापासून मित्रास परावृत्त करतो. विद्यार्थ्यांनी पुढील सुखी जीवनासाठी चांगल्या मित्राची वरील वैशिष्ट्ये शालेय जीवनापासूनच आत्मसात करावीत.

पुढील सूचना कामगारांविषयी आहेत. त्यांच्या मालकाची आपल्या नोकराविषयी कोणती कर्तव्ये असावीत त्याविषयी आहे.

- त्याने आपल्या नोकरास त्याच्या कौशल्यानुसार व क्षमतेनुसार काम द्यावे.
- नोकराची सर्वतोपरी काळजी घेऊन त्यांच्या आरोग्यविषयक सोयी उपलब्ध करुन द्याव्यात.
- प्रासंगिक सुट्टी द्यावी.

सिगल कामगाराने आपल्या मालकाविषयी खालील कर्तव्ये पार पाडावित.

- आपले काम वेळेवर चालू करावे व वेळेच्या आत पूर्ण करावे.
- आपल्या प्रत्येक कामात प्रामाणिक परिश्रम करावेत.

- आपल्या कामात सतत प्रगती असावी.
- मालकाचा आदर करावा, प्रशंसा करावी व त्याच्या कार्याशी प्रामाणिक असावे. ही अशाप्रकाराची कामगाराची नीति त्यांच्या प्रगतीचे लक्षण होय.

नीतिशिवाय केलेले कार्य अपूर्ण होय तथा ते पूर्ण होणार नाही व संपणार नाही.

शेवटचा उपदेश भिक्खू-भिक्खूणी व धार्मिक शिक्षकाविषयी आहे. सामान्य माणसानी, उपासकानी त्यांच्या प्रती आदर व सन्मान कसा व्यक्त करावा ह्याविषयी आहे. भिक्खू कोणत्याही प्रतीफळाची व बक्षीसाची आशा न करता समाजाची सेवा करतात. भिक्खू, भिक्खूणी व धम्मशिक्षक उपासकांना मार्गदर्शक असतात व अपकारक बाबीपासून त्यांना परावृत्त करतात. चांगल्या बाबीकडे त्यांना नेतात. त्यांच्यामध्ये करुणा व दया वृधिंगत करतात, त्यांना माहिती नसलेल्या धम्मातील बाबी सांगतात. त्यांच्या मनातील शंकांचे निरसन करतात व सुखी व शांतमय जीवनासाठी मार्गदर्शन करतात.

सिगल उपासकांनी भिक्खू व धम्म शिक्षकाविषयी खालीलप्रमाणे आदर करावा.

- त्यांच्या भौतिक गरजापूर्तीसाठी उपासकांनी कृतज्ञतापूर्वक मदत करावी.
- त्यांच्याशी कृतज्ञ संभाषण ठेवावे.
- त्यांच्याशी वागताना व मदत करतांना करुणामय विचार ठेवावेत.
- आपल्या घरी भिक्खूचे आगमन झाल्यावर त्यांचे प्रथम स्वागत करावे.
- ते विहारात वास करतात म्हणून त्यांना आपल्या घरी आगमन झाल्यावर अन्नदान करावे.

ही सामान्य माणसाची तथा उपासकांची कर्तव्ये होत. त्यांनी जर ही अंगिकृत करुन वर्तन केले तर त्याचे परिणाम आनंदी व सुखी जीवनास उपयुक्त ठरतात.

भिक्खू, भिक्खूणी व धम्मशिक्षकांप्रती कसे वर्तन करावे त्यासाठी वरील बाबी मार्गदर्शक ठरतात. बुध्दधम्मच्या जीवनमार्गाप्रमाणे अशाप्रकारे आपण धम्म जाणून व त्यानुसार आचरण करावे.

सिगल तुला ह्या विषयी कसे काय वाटते - भगवान मी हे ऐकूण कृतज्ञ झालो. नंतर वरील सहा दिशाविषयी भगवान बुध्दाचा उपदेश ऐकूण सिगल धन्य झाला व आपल्या घरी परत गेला.

२४. बुध्दधम्म व स्त्रिया

मनुष्य चांगला किंवा वाईट हे त्याच्या जन्मावरुन हिन्दू तत्वानुसार मानले जाते. त्यांच्या कुटूंबावरुन ठरविले जाते. त्यामुळे केवळ ब्राह्मण कुलास नीति व सद्‌गुणाचा वारसा प्राप्त झालेला होता असे हिन्दू तत्वज्ञान सांगते. फक्त ब्राह्मण हेच विद्येचे अभ्यासक होते व तेच उच्च विद्या प्राप्त करित असत. खालच्या जातीच्या व्यक्ती विद्याप्राप्त करु शकत नव्हत्या. बुध्दाच्या काळात ह्या प्रश्नावर त्यांनी परिणामकारक प्रयत्न करुन ही तफावत दूर केली. व समाजातील ही वाईट प्रवृत्ती नष्ट केली. बुध्द ह्या जातीव्यवस्थेविरुध्द ठामपणे उभे राहिले व आपले प्रखर विचार मांडून जातीव्यवस्थेमुळे समाजाची खुंटलेली प्रगती विकसीत केली.

बुध्दाने बंधुभाव, समानता, धार्मिक मुक्तता व स्वातंत्र्य या बाबीचा प्रामुख्याने प्रसार केला.बुध्दाच्या मते

जन्माने कोणही जातिबहिष्कृत नाही.
जन्माने कोणही ब्राह्मण नाही.
कृतिने कोणीही बहिष्कृत होतो.
कृतिने कोणीही ब्राह्मण होतो.

बुध्दांच्या मतानुसार जात ही कोणासही बौध्द होण्यासाठी प्रतीबंध करित नाही किंवा बुध्दधम्मातील संघप्रवेशात प्रतीबंध करीत नाही. कोणतीही व्यक्ती (पुरुष-स्त्री) भिक्खू, भिक्खूणी होऊ शकतात.

सर्वासाठी मुक्त : बुध्दधम्म हा सर्वांसाठी मुक्त आहे. त्यामध्ये कोणताही स्त्री-पुरुष प्रवेश करु शकतो. मुक्तपणे बुध्दधम्मच्या संघात प्रवेश करुन सर्वाप्रमाणे कोणताही व्यक्ती समान दर्जा उपभोगू शकतो. संघ ही बुध्दधम्मात उच्चप्रतीची लोकशाही प्रणाली होय. जगाच्या इतिहासात गुलामगिरी नष्ट करणारे. गुलामगिरी विरुध्द कार्य करणारे बुध्द हे पहिले आहेत.

बुध्दाने त्यांच्या काळात स्त्रियांना उच्च दर्जा प्राप्त करुन दिला, समान हक्क दिला, त्यांच्यात महत्वाची जाणीव व समाजात त्यांना महत्वाचे स्थान निर्माण करुन दिले. स्त्री म्हणून त्यांना कमी न लेखता त्यांना समाजात बरोबरीचे स्थान प्राप्त करुन दिले. त्यांनी स्त्री व पुरुष या दोघाचा अंतरिक स्वभाव पाहून दोघांना संघात समान संधी दिली. बुध्द म्हणाले की कोणतेही लिंग हे निर्वाण प्राप्तीसाठी अडथळा ठरत नाही. स्त्री पुरुष दोघांपैकी कोणीही निर्वाण प्राप्त करु शकतो. बुध्दधम्माचे पुष्कळसे तज्ञ अभ्यासक मानतात की धम्मग्रंथात भिक्खूंणी व अनेक बाबी स्त्रियाविषयी लिहीलेल्या आहेत. त्यात काही बुध्दावर सुध्दा आरोप करण्यात आलेले आहेत. आपल्याला अडीच हजार वर्षापूर्वीची परिस्थिती कशी असेल ह्याचा विचार करणे व समजूत घेणे महत्वाचे आहे.

पवित्र व्यक्ती : पालीमध्ये स्त्रियाविषयी 'मातूगामा' शब्द प्रयोग केलेला आहे. समाजाची आई किंवा समूहमाता म्हणतात. स्त्री ही विशेषकरुन आई म्हणून महत्वाची मानलेली आहे. बुध्दधम्मामध्ये पत्नीला स्त्री ह्या नात्याने सर्वच भूमिका कौटूंबिक जीवनात कराव्या लागतात. स्त्रिला पतीचा उत्तम मित्र, लहान बहीण, आई तथा निरिक्षक म्हणून भूमिका करावी लागते. बुध्दाने आईला देवाचे तथा पवित्र व्यक्तीचे स्थान दिलेले आहे. तिला आपल्या मुलामुली समवेत पवित्रस्थान दिलेले आहे.

सामाजिक परिस्थितीनुसार बुध्दाने प्रथम स्त्रियांना संघात प्रवेश देण्याचे नाकारले होते. परंतु भिक्खू आनंद ह्याने बुध्दासोबत चर्चा करुन स्वतंत्र स्त्रियांचा भिक्खूणी संघ निर्माण केला. त्यांना संघामध्ये तीनशे अकरा तत्वे आचरणात आणावी लागतात.

सिध्दार्थाची सावत्र आई (मावशी) महाप्रजापती गौतमी ही पहिली भिक्खूणी होती. त्यानंतर सिध्दार्थ संबुध्द झाले.

धम्म सर्वांसाठी - बुध्दधम्म येण्यापूर्वी स्त्रिया विषयी कोणत्याच धर्मामध्ये पूरक असे वातावरण नव्हते. हा नवीन संघ स्त्रियासाठी वरदान ठरला होता. ह्या संघामध्ये महाराणी, राजकन्या, श्रेष्ठ कन्या किंवा सामान्यकन्या, विधवा, नाडलेल्या माता, निराश्रित स्त्रिया, व्यभिचारी स्त्रिया, ह्या सर्वांना संघात प्रवेश देऊन त्याचे जीवन सुखी केले. बहुसंख्य स्त्रियांना संघातील प्रवेशामुळे निराश्रीतून मुक्ती प्राप्त झाली. जेंव्हा नाडलेल्या किंवा दिशाहिन निराश स्त्रिया बुध्दाकडे प्रवेशासाठी प्रथम येत होत्या तेंव्हा ते माझ्या भगिनीनो म्हणून बोलण्यात प्रारंभ करित. बुध्द हे जगातील पहिले धार्मिक नेते होत. ज्यांनी स्त्रियाचा मान व दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न केलेले होते. सत्याचा शोध त्यांच्या मुक्तीसाठी उपयोगी आणला.

अतिसुंदर स्त्री - जसे अरहंत सारीपूत्त व मोग्गलान हे धम्मामध्ये दोन महत्वाचे भिक्खू होते तसेच अरहंत भिक्खूणी खेम्मा व उप्पालवना ह्या स्त्रियांच्या संघात प्रमुख होत्या. पुष्कळ स्त्रियांना संघात प्रवेश देऊन अरहंत केले. त्यातील पुष्कळ भिक्खूणी बुध्दीमान होत्या, थोर होत्या, सल्लागार होत्या, ध्यान भावना शिक्षक होत्या. बुध्दधम्म प्रसारासाठी स्त्रियांनी सुध्दा कार्य केलेले आहे. त्यांनी भारतात व आशिया खंडात धम्म प्रसार केला कारण त्या स्त्रियांना व त्यांच्या कुटूंबियाना धम्म सांगत असत. त्यांच्यामुळे पुष्कळ स्त्रिया व कुटूंब दिक्षीत झाले. उदा. महाउपासिका विशाखा ही लाखोमध्ये अतिसुंदर स्त्री होती, तिने आपले जीवन बुध्द, धम्म व संघासाठी खर्च केले. बुध्दधम्माच्या तत्वाचा प्रसार केला. धम्मप्रचारक म्हणून संघमित्रा थेरा राजा अशोकाची सुकन्या बुध्दाच्या जीवन प्रणालीनंतर तिने धम्म कार्यास स्वतःला वाहून घेतले. बुध्दाच्या नंतर २३० वर्षानी भिक्खूणी संघात संघमित्रास महत्वाचे स्थान देण्यात आले होते. संघमित्रा व महेंद्र थेरो ह्या दोघाना श्रीलंकेस पाठविण्यात आले होते. त्यांनी धम्मप्रसारासाठी, जातांना त्यांनी सोबत बोधीवृक्षाची कलम

नेली होती व ती आजही विशाल बोधीवृक्षाच्या स्वरुपात श्रीलंकेत अस्तित्वात आहे. तेंव्हा पासून बुध्दधम्म श्रीलंकेत फोफावत गेला.

सध्या जगातील प्रामुख्याने अमेरिका व युरोप खंडात स्त्रियांचा मोठा संघ कार्य करीत आहे व धम्मातील संघाचा प्रमुख भाग म्हणून तयार होत आहे. त्या धम्माचा अभ्यास करीत आहेत, धम्म आचरणात आणीत आहेत व इतरांना धम्म शिकवित आहेत. त्यांचे हे कार्य मोठ्या निष्ठेने व श्रध्देने चालू आहे.



२५. यशाचे मूळ

प्रत्येक व्यक्ती त्यांच्या कार्यात यशस्वी असली पाहिजे. यशस्वी पुरुष हे मान्यता पावलेले व आदरणीय असतात. त्यांच्या जीवनातील प्रसंगाची नोंद होते. समकालीन व पुढील पिढी त्याचे अनुकरण व अभ्यास करते. अशा यशस्वी व्यक्ती, ज्यांना यश संपादन करावयाचे असते. त्यांच्याकरिता रचनात्मक प्रेरणाचे साधन ठरतात. बुध्द धम्मानुसार यशाचे मूळ आपण अभ्यासू.

बुध्दाने त्यांच्या उपदेशामधून यशाचा मार्ग शिकविलेला आहे. 'इध्दिपाद' हा एक तसाच धर्मोपदेश होय. इध्दिपादमध्ये चार सद्‌गुणाविषयी (नीति) स्पष्टीकरण आहे जे जीवनाच्या यशाकरिता, उद्दिष्टापर्यंत नेण्यासाठी मदत करतात. ते चार सद्‌गुण म्हणजे इच्छा, कर्मान्त, मन आणि अन्वेष.

पहिला सद्‌गुण म्हणजे इच्छा किंवा प्रेरणा कोणत्याही कामात आनंद मानणे व काम करण्यास सतत तयार असणे म्हणजे त्या व्यक्तीला त्या कार्यात आवड आहे इच्छा आहे व योग्यप्रकारे ते कार्य पूर्ण करण्याची त्याची क्षमता आहे. इच्छा किंवा प्रेरणा ही प्रत्येक कार्याची प्राथमिक गरज आहे त्याशिवाय काहीही पूर्ण होऊ शकत नाही.

दुसरा सद्‌गुण म्हणजे प्रयत्न तथा परिश्रम असून तो प्रत्येकाने जाणून घेणे आवश्यक होय. हा दुसरा सद्‌गुण म्हणजे ऊर्जाद्वारे प्रत्येक कार्य ज्यांना पाहिजे तसे पूर्ण करणे ते दर्शवितो. जेंव्हा विद्यार्थ्यावर एखादे काम सोपविलेले आहे तेंव्हा त्याने ते परिश्रमपूर्वक पूर्ण करण्यासाठी मेहनत घ्यावी.कोणतेही दडपण न बाळगता, काळजी न करता पूर्ण करावे. संतुलीत प्रयत्नाने पूर्ण करावे. जर त्यांनी परिश्रमपूर्वक पूर्ण केले नाही तर यशाची शाश्वती कमी होत जाते. दारिद्र्याचा, गरिबीचा पराभव केवळ प्रयत्न व परिश्रमच करु शकतात.

तेव्हा प्रयत्न व परिश्रम हे यशासाठी महत्वाचे घटक आहेत. ते आपल्यामध्ये वृध्दिंगत करावेत.

तिसरा सद्‌गुण म्हणजे चित्त होय म्हणजे कोणतेही कार्यकरित असतांना पूर्ण एकाग्रता ठेवणे. आपण कोणतेही काम करीत असू ते लहान क्षुल्लक असेल अथवा महान असेल, त्या कामात पूर्णपणे मन ओतावे. विचारपूर्वक पुन्हा पुन्हा विचार करुन कृति करावी ही प्रक्रिया ते पूर्ण होईपर्यंत ठेवावी. जर आपणास प्रथम अपयश आलेले असेल तर पुन्हा तिच कृति मेहनतीने व मनःपूर्वक एकाग्रतेने करावी.

चौथा सद्‌गुण म्हणजे अन्वेषण किंवा परिक्षण - परिक्षणा शिवाय कोणतेच कार्य योग्यप्रकारे पूर्ण होऊ शकत नाही. अन्वेष व परिक्षण काळजीपूर्वक करावे. ही प्रज्ञास्तरावरील कोणत्याही कार्यासाठी लागू पडणारी अवस्था होय. जे कार्य आपणास करावयाचे असते त्याचे पूर्णपणे आपण निरीक्षण/अन्वेषण केलेले असावे. त्यासंबंधीत कामाविषयी योग्य नियोजन व जाणीव मनात ठेवावी. केवळ कठोर परिश्रम उपयोगाचे नाहीत तर कार्य करताना बुध्दी चातुर्य व शहाणपणा असावा. प्रज्ञासोबत ठेवून जर कार्य केले तर आपल्याला मोठ्या प्रमाणात यशाची, प्रतीफलाची खात्री आहे. म्हणून आपण यश प्राप्तीसाठी वरील चार सद्‌गुणाची वृध्दी करावी व ते प्रयत्न कार्यासाठी कसे उपयोगात आणावे हे ज्ञात झाल्यावर आपल्या जीवनात निश्चित यशप्राप्ती आहे. इध्दिपद हे परिणामकारक साधन बुध्दधम्मात कार्याच्या यशाकरिता म्हणून उदाहरण होय.

२६. मंगल

जेव्हा भगवानबुध्द श्रावस्ती येथील जेतवनात विहार करीत होते त्यावेळी लोकांमधील वेगवेगळ्या गटात मंगल हेतु विषयी मतभिन्नता होती. मंगल हेतुविषयी मतभिन्नता वाढत गेली व चर्चा वाढत गेली. चर्चेत एकमत न होता रात्रभर भेद वाढत गेला. ते सर्व रात्रीच्याच वेळी प्रकाश कंदील सोबत घेऊन जेतवनातील विहारात भगवान बुध्दाकडे गेले. त्यासर्वांनी घडलेला प्रकार भगवान बुध्दास सांगितला. व मंगल हेतु विषयी बुध्दाकडे प्रश्न टाकला. भगवान बुध्दाने मंगल हेतुविषयी त्या सर्वांना सविस्तर माहिती दिली.

आपण केलेल्या कृतिचे मंगल हे फलीत होय. बाह्य घटकांच्या परिमाणापेक्षा जर प्रगती, मंगल व सुख आपल्या जीवनात पाहिजे असेल तर आपणास प्रत्येक गोष्टीसाठी, बाबीसाठी स्वतःच कार्य केले पाहिजे. विद्यार्थ्याला जर चांगले गुण संपादन करावयाचे असतील तर त्याला स्वतःच परिश्रमपूर्वक प्रामाणिकपणे, सचोटीने, बुध्दिपुरस्सर व हुशारीने अभ्यास करावा लागेल. महामंगल सूत्त्तामध्ये आडतीस महामंगल प्रतीपदित केलेली आहेत. निब्बाण, निर्वाण तथा दिव्यत्त्व प्राप्ती, अध्यात्मिक प्राप्ती अशा अतिउच्च बाबी महामंगल सूत्त्तामध्ये प्रारंभी दिलेल्या आहेत.

१ दूष्ट व्यक्ती सोबत संबंध नसावेत.

२ चांगल्या, ज्ञानवान व्यक्ती सोबत संबंध असावेत.

३ जे आदरणीय आहेत अशा लायक व्यक्तीचा आदर, सन्मान करावा.

४ ज्याठीकाणी अनुकूल वातावरण आहे अशा ठीकाणीच वास करावा.

५ भूतकाळात गुणोत्कृष्ट कार्य केलेले असावे.

६ स्वतःला सम्यक विचारात समायोजित करावे.

ही सर्व उच्च प्रतिची महामंगलहेतु आहेत.

७ सखोल अध्ययन व अनुभव असावा.

८ हस्तकला व चित्रकला विषयीचे कौशल्य असावे.

९ शिस्त प्रिय असावे.

१० उत्तम अनुभवी असावे.

११ सुखावह भाषा व संवाद असावा.

ही सर्व उच्च प्रतिची महामंगल हेतु आहेत

१२ आई वडिलांची सेवा करावी.

१३ पत्नीची व मुलांची काळजी घ्यावी.

१४ योग्य व्यवसाय व सम्यककृती असावी.

१५ स्वतंत्रता.

१६ अचूकवर्तन.

१७ नातेवाईकांशी सहकार्याची भावना.

१८ निर्दोषकृती असावी.

ही उच्च प्रतिची महामंगल हेतु आहेत.

१९ वाईट कृतिपासून परावृत्त असावे व त्या करणे थांबवावे.

२० स्वतःला मद्यपानापासून अलिप्त ठेवावे व स्वतःच ते टाळावे.

२१ सर्वच कृतिमध्ये काळजी घ्यावी.

ही उच्च प्रतिची महामंगल हेतु आहेत.

२२ बुध्दाप्रती, बुध्दशिकवणूकीप्रती, भिक्खू संघाप्रती, पालकाप्रती व ज्येष्ठ व्यक्तीप्रती आदर असावा, ठेवावा.

२३ नम्रता, लीनता असावी.

२४ तृप्ती, संतोष असावा.

२५ कृतज्ञता असावी.

२६ बुध्द शिकवणूकीचे नियमित श्रवण असावे.

ही उच्च प्रतिची महामंगल हेतु आहेत.

२७ धैर्य, सहनशीलता (शारिरीक व मानसिक दुःख प्रती) चिकाटी.

२८ अज्ञाधारक असावे.

२९ पवित्र, आदरणीय व्यक्तीना भेट देणे.

३० योग्यवेळी धम्मावर चर्चा करणे.

ही उच्च प्रतीची महामंगल हेतु आहेत.

३१ आत्मसंयमन असावे.

३२ पवित्र, शुध्द जीवनप्रवास असावा.

३३ आर्यसत्य जाणावेत.

३४ निर्वाण जाणीव व दिव्यत्वप्राप्ती जाणावी.

ही उच्च प्रतिची महामंगल हेतु आहेत.

३५ विश्वातील आठ बाबीचा मनाला धक्का बसू देऊ नये वा परिणाम होऊ देऊ नये.
१. फायदा-तोटा २. मान-अपमान ३. प्रशंसा (स्तुति)-अपकीर्ति ४. सुख-दुःख

३६ क्षमाशील असावे.

३७ दडपणाविरहीत असावे.

३८ सुरक्षित असावे.

ही उच्च प्रतिची महामंगल हेतु आहेत.

बुध्दाने हे अडतीस महामंगल हेतु स्पष्ट करुन आपले प्रवचन पूर्ण केले. ते ऐकूण सर्वजण प्रभावीत झाले. बुध्दाप्रती आभार व्यक्त करुन आनंदाने ते सर्वजण घरी परतले.

बुध्द धम्मातील ही उच्चप्रतिची महामंगल हेतु आहेत. हे निश्चितच अनुभविक जीवनमार्ग होत. कोणतीही बाह्य पूजा करण्यापेक्षा ह्या बाबीचे आचरण करावे. अद्‌भुत शक्ती तथा धर्म भोळेपणास अंगिकृत करु नये.

२७. नाशाची कारणे

सर्वांना जीवनात प्रगती हवी आहे परंतु काही व्यक्ती जीवनात अधःपतन अनुभवतात त्यामुळे त्यांचा परिणाम दुःख व त्रासा होय. दररोजच्या जीवनात पुष्कळ घटना घडतात की ज्यामुळे नाश होतो. उदा. मद्यपान करणे, अपायकारक द्रव्याचे सेवन करणे, रस्त्यावर टवाळक्याकरित फिरणे, वाईटाची संगती करणे, आळशीपणा करणे वगैरे ज्यांना समाजात शांत, आनंदी, सुखी जीवन जगावयाचे आहे त्यांनी वरील सर्व बाबीचा त्याग केला पाहिजे. आपण नाश करणाऱ्या चार वाईट बाबीविषयी माहिती पाहू.

१. लैंगिक गैरवर्तन -



स्त्री-पुरुषाने आपल्या जीवनात ह्या विषयी सावध असावे. विशेषतः स्त्रियानी पुरुषाविषयी तर नंतर पुरुषानी स्त्रियाविषयी स्त्रीपुरुषानी लैंगिक गैरवर्तनापासून परावृत्त असावे जे स्वतः व इतरांनाही हानिकारक आहे. पुरुषाने स्त्रियाचा आदर करावा. जसे स्वतःच्या आई व बहिणीविषयी ठेवतो. तो ह्या बाबतीत प्रामाणिक असावा. जर मनुष्य जाणीवपूर्वक स्त्रियाविषयी गैरवर्तन करीत असेल तर तो समाजात सुखी राहणार नाही. त्याला कोणी मान देणार नाही. त्याचा आदर करणार नाही. त्याच्याशी एकनिष्ठ राहणार नाही. व त्याच्याविषयी कोणीही करुणा दाखविणार नाही. त्याला कपटी , दगलबाज म्हणूनच सर्वजण ओळखतात. स्त्रियांनीसुध्दा पुरुषाचा योग्य आदर करावा. करुणा, दया व प्रज्ञा त्यामध्ये असावी.

२. मद्यपान व अपायकारक द्रव्याचे सेवन -

मद्यपान आणि अपायकारक द्रव्याचे सेवन, निष्काळजीपणा, अयोग्यकृती, स्वतःला दुःख व इतरांनाही दुःख निर्माण करते. ते स्वतः दुःखी कष्टी होऊन त्यांच्या कुटूंबाचे सुध्दा सुखीजीवन घालवितात. प्रत्येकाने ह्या बाबतीत काळजी घ्यावी व मद्यपान करु नये. मद्यपान व अपायकारक द्रव्याचे सेवन आजार निर्माण करतात ज्यामुळे मनुष्य शारीरिक व मानसिक दृष्ट्या विकलांग होतो. आजारीपणामुळे तो जीवनात दुःखी कष्टी असतो व त्याला लवकर

मृत्यु येतो. धुम्रपानसुध्दा एकप्रकारची नशा होय. धुम्रपानसुध्दा वाईट आहे.

धुम्रपान व मद्यपानाचे परिणाम - त्याचे सहा अनैच्छिक परिणाम होतात. १. संपत्तीची हानि होते. २) भांडणाची वृत्ती वाढते. ३) कर्जबाजारी होतो ४) बदनामीची निर्मिती होते ५) अनुचित प्रकार उघडपणे करतो. ६) बुध्दीमत्ता व बुध्दी भ्रष्ट होते. म्हणून प्रत्येकाने मद्यपान व अपायकारक द्रव्याच्या सेवनापासून परावृत्त असावे.

३. जुगार -

जो व्यक्ती नेहमी जुगार खेळतो त्याचा कोणीही आदर करीत नाही. त्याचे मित्रसुध्दा आदर करीत नाहीत. नियमीत जुगार खेळल्यामुळे खालील सहा वाईट परिणाम दिसून येतात.

१. जो जुगार जिंकतो त्याचा सर्वजण द्वेष करतात.

२. जो जुगार हरतो त्याचे आर्थिक नुकसान होते.

३. जुगारात प्रत्यक्ष संपत्तीची हानि होते.

४. जुगाऱ्याच्या शब्दास समाजात किंमत नसते.

५. त्याचा मित्राकडून तिरस्कार होतो.

६. चांगली व्यक्ती जुगाऱ्याशी वैवाहिक संबंध करीत नाही. जुगारी आपल्या नोकरीत टिकून राहत नाही.

ह्या प्रश्नाचा उकल करण्यासाठी त्यानी खालील गोष्टी आचरणात आणणे जरुरीचे आहे. नीति, परिश्रम, योग्य जीवनप्रणाली, चांगल्या व्यक्तीशी मित्रत्व, चांगल्या बाबींचा सांभाळ करावा. अतिदक्ष ध्यानभावना सुध्दा उपयुक्त आहे.

४. वाईट लोकांशी मैत्री -

वाईटांशी संगती ही वाईट गोष्टी करण्यास प्रवृत्त करते. वाईटासोबत संगत केल्यास काय परिणाम होतात? वाईटासोबत मित्रत्व ठेवल्यास, जुगारी वृत्ती, लैंगिक गैरवर्तन, ज्यामुळे महाभयंकर आजार गोनोरिया, एड्स, सिफिलिस होतात. मद्यपानामुळे निष्काळजीपणा वाढतो. अपायकारक द्रव्यसेवनामुळे लबाडी, खोटे बोलणे, फसवेगिरी व अशांतता निर्माण होते. त्याठीकाणी वाईट मित्रासोबत सत्याचा अभाव असतो. जरी व्यक्तीचा मनाचा निश्चय पक्का असेल व मनामध्ये बुध्दधम्माचाच विकास झालेला असेल तरीही कधी कधी वाईटांची संगती प्रभावी ठरते व त्याला चुका करावयास लावून त्याच्या वर्तनात बदल करण्याची शक्यता असते.

ज्याना जीवनामध्ये प्रगती साधावयाची आहे सुखी जीवन पाहिजे त्यांनी वाईटांची

संगती टाळावी व चांगल्या व्यक्तीशी मैत्री वाढवावी जो आपणास मार्गदर्शन करेल व सुखी जीवनासाठी मदत करील असे मित्रत्व चिरकाल असावे.

चांगले मित्र तुम्हाला वाईटापासून अलिप्त राहण्यासाठी मार्गदर्शक असतात ते वाईट कृति, मद्यपान, अपायकारक द्रव्याचे सेवन, धुम्रपान ह्यापासून अलिप्त राहण्यासाठी मार्गदर्शन करतात. चांगले मित्र प्रामाणिक व सुयोग्य असतात. त्यांच्या शब्दाशी जागृत असतात व अडचणीच्या प्रसंगी मागे उभे असतात. चांगले मित्र मदत करतात व तुम्हाला आवश्यकता असल्यास महत्वाची मदत करतात. तुम्हाला संरक्षण देतात व तुमच्या कुटूंबीयाचे आपले म्हणून संरक्षण करतात. कधीच तुमची फसवणूक करीत नाहीत.



भाग चौथा – जातक कथा

२८. अलौकीक विश्वास


फार वर्षापूर्वी एक वयोवृध्द दांपत्य श्रीमंत जमीनदार माणसाच्या हवेली शेजारी लहानशा सुंदर अशा झोपडीमध्ये राहत होते. त्यांच्या सोबत मुले तथा नातेवाईक कोणीही नव्हते. जरी ते गरीब होते तरी सुखी कुटूंब होते. त्या श्रीमंताच्या प्रती ते प्रामाणिकपणे राहिले होते. कारण त्या हवेलीमुळे त्यांना संरक्षण मिळाले होते. त्या जमीनदार श्रीमंत माणसाला झोपडीत राहणाऱ्या गरीब कुटूंबाविषयी काधिही मदत करण्याची गरज भासली नाही. त्याला नेहमी वाटत असे की ह्यांच्या झोपडीमुळे आपल्या हवेलीची शोभा गेली. व तिच्या सौंदर्यात कमीपणा आला. मात्र त्यांने गरीब कुटूबास कधीही त्रास दिला नाही किंवा त्याच्याबद्दल कधी औदार्य दर्शविले नाही.

एके दिवशी त्या जमीनदाराने आपल्या बंगल्यावर एक समारंभ घेण्याचे ठरविले. आपल्या नोकरास भिक्खूंना ह्या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यासाठी पाठविले. त्याने आपल्या जवळच्या लोकांना निमंत्रणे देऊन भिक्खूसाठी अन्न घेऊन येऊन समारंभात सहभागी होण्यासाठी बोलविले. जमीनदाराला वाटले की त्या गरीब कुटूंबास निमंत्रण देणे उपयोगाचे नाही कारण ते गरीब आहेत त्यांच्या जवळ भिक्खूना दान करण्यासाठी अन्न नाही.

जमीनदाराने आपल्या पत्नीसह समारंभात सहभागी होण्याचे ठरविले होते. त्याला वाटत होते की, समारंभ भव्य झाला पाहिजे. परंतु तो खर्च करण्यास मागे पुढे पाहात होता. आपण ह्यासाठी पैसे काय म्हणून खर्च करावेत असा विचार करु लागला. परंतु त्यांची पत्नी हुशार होती. ठीक आहे पत्नी म्हणाली, आपल्याकडे तळ्यात खुप मासे आहेत, बगीच्यात पालेभाज्या आहेत, नारळ आहेत व सुकलेला गरम मसाला आहे. आपण माशांची घरीच आमटी करु. हे ऐकूण कुबेर खुश झाला. कार्यक्रमापूर्वी त्याने आपल्या नोकरांना सुचना दिली व त्याप्रमाणे तयारी केली.

ते गरीब कुटूंब जमीनदाराच्या हवेलीतील समारभांची गडबड पाहात होते, ऐकत होते. त्यांना वाटत होते की समारंभात आपणही सहभागी व्हावे व भिक्खूंना अन्न दान करावे. तो गरीब म्हातारा पत्नीला म्हणाला आपल्याला जरी निमंत्रण नाही तरीही आपण भिक्खूंना कां अन्नदान करु नये. तेंव्हा त्याची पत्नी म्हणाली तोच मी ही विचार करीत आहे. तेंव्हा तुम्ही जमीनदाराकडे जा व काही मासे घेऊन या. मी ते तयार करते व उद्या आपण समारंभात सहभागी होऊ.

तेंव्हा वृध्द गृहस्थ जमीनदाराकडे हवेलीत गेला व जमीनदाराच्या नोकराला सोनीला मासे मागितले. आणि म्हणाला आम्हाला उद्या भिक्खूना अन्नदान करावयाचे आहे. त्या



ठिकाणी मासे भरपूर होते परंतु नोकर आपल्या जमीनदार मालकाला घाबरत होता. मनातून मात्र त्याला वाटत होते की ह्या गरीब वृध्दास मासे द्यावेत. तेव्हा तो वृध्दास म्हणाला जर तुम्हास मासे पाहिजे असतील तर तुम्ही एक शब्द जमीनदारास विचारा.

गरीब वृध्द जमीनदाराकडे मासे मागण्यासाठी गेला व म्हणाला मला थोडे मासे द्या, माझी पत्नी ते तयार करील. आम्ही उद्याच्या कार्यक्रमात सहभागी होऊ इच्छितो. नाखुश नजरेने जमीनदार म्हणाला जर मी तुला मासे दिले तर तुम्ही कसेही तयार कराल कारण स्वादिष्ट बनविण्यासाठी तुमच्याकडे काहीही नाही. त्यामुळे मला अडचण होईल असे बोलुन त्या वृध्दास जमीनदाराने मासे दिले नाहीत. वृध्द म्हातारा घरी परत गेला. पत्नी हुशार होती. तिने त्यांच्या नाराज चेहऱ्यावरुनच सर्व काही जाणले, आपणास जमीनदाराने मासे दिलेले नाहीत. नवऱ्याचे तिने सांत्वन केले. नवऱ्याला म्हणाली काळजी करु नका मी काही तरी नवीन मार्ग शोधते.

तिला माहित होते की, स्वयंपाक्याने मासे तयार करतांना माशाचे डोके व काटे (हाड) कोठे फेकूण दिलेले आहेत. तेव्हा ती तेथे गेली व माशाचे डोके व काटे जे चांगले होते ते जमा करुन घरी घेऊन आली. त्याला स्वच्छ केले व कोळश्याच्या निखाऱ्यावर (विस्तवावर) लाल व खुसखुशील होईपर्यंत भाजले. नंतर त्यात थोडे मीठ टाकले व बारीक पावडर होईपर्यंत वाटले. त्यांची पूड तयार केली.


सकाळीच तिने शिजवलेल्या तांदुळात ही माशाची खुसखुशीत पूड मिसळविली व तांदुळाचे गोळे तयार केले. वृध्द कुटूंब आनंदी होते ते आता भिक्खूंना अन्नदान करु शकणार होते.

जेव्हा जमीनदाराने ते गरीब जोडपे तांदुळाचे गोळे घेऊन हवेलीकडे येतांना पाहिले तेंव्हा तो अस्वस्थ झाला. त्याने नोकरास त्यांच्या जवळचे तांदुळाचे गोळे घेऊन फेकून देण्यास सांगितले. व भिक्खूना जमीनदाराने सांगितले की त्या वृध्दांनी तयार केलेले तांदुळाचे गोळे बरोबर नाहीत.

तेंव्हा भिक्खूने जमीनदारास सांगितले की आम्ही बुध्द भिक्खू अन्नाविषयी कधीही ते चांगले किंवा वाईट असा विचारच करीत नाही. त्या गरीब जोडप्याचा भिक्खूंना अन्नदान करण्यासाठी चांगला व सद्गुणी विश्वास आहे. त्यांनी जे आणले असेल ते आम्ही स्विकारु. जमीनदाराने ते तांदुळाचे गोळे नोकरास जमा करावयास लावले व गरीब जोडप्यास भिक्खूना दान करावयास सांगितले. ते गरीब जोडपे खूपच आनंदी झाले कारण त्यांनी तयार केलेले अन्न भिक्खूंनी स्विकारले होते.

भिक्खूंना अन्नदान केल्यानंतर आनंदाने घरी परत येताना वृध्द म्हातारा पत्नीला म्हणाला आपण आता घरी गेल्यावर काय खावयाचे कारण सर्वच अन्न आपण भिक्खूना दान केलेले आहे. शिल्लक मागे काहीच नाही. पत्नी म्हणाली ठीक आहे, मी खुप आनंदी आहे. आज संध्याकाळी काहीही खाल्ले नाही तरी चालेल. तुम्हाला असे नाही का वाटत? ती आपल्या नवऱ्यास म्हणाली, चला आपण घरी जाऊ!

ते वृध्द जोडपे घरी परत गेले. ह्या गरीब कुटूंबाने भिक्खूना अन्नदान केले ते बऱ्याच लोकांनी पाहिले होते. तेव्हा इतर लोकांनी त्या गरीब जोडप्यास तांदुळ, भाजीपाला, फळे व खाद्य पदार्थ भेट दिली. त्या वृध्द कुटूंबास भिक्खूना दान केलेल्या अन्नाबद्दल लोकाकडून ते बक्षिस होते. त्यांचा भिक्खू प्रती विश्वास व आदर होता. व ते धम्माविषयी चांगले कर्तव्य करीत होते. आता त्यांच्याकडे तांदुळ भरपूर होते. व घरी लोकांनी भेट दिलेल्या चांगल्या अन्नपदार्थाची रेलचेल होती.



२९. घुबड व कावळा

एके काळी विश्वाच्या निर्मितीच्या प्रारंभी लोकांनी एकत्र येऊन चांगला हुशार व सुंदर राजा निवडला होता. चतुष्पाद प्राण्यानीसुध्दा एकत्र येऊन त्यांचा राजा म्हणून सिंहाची निवड केली होती. समुद्रातील माशानी सुध्दा आनंद ह्या माशाची आपला राजा म्हणून निवड केली होती. सर्व पक्षी एका ठीकाणी मोठ्या सपाट पर्वतावर एकत्र आले होते. व राजा निवडीचा विचार करीत होते.

मानवांमध्ये राजा आहे चतुष्पाद प्राण्यामध्ये आणि माशामध्ये सुध्दा राजा आहे परंतु आपण पक्षामध्ये कां नाही. आपण राजाविना, नेत्याविना राहु शकत नाही. चला आपणही आपला कोणी एक राजा निवडू व त्याला राजाच्या ठीकाणी बसवू. त्यानी अशाप्रकारे राजा म्हणून घुबडाची निवड केली. सर्वानाच मान्य आहे असे गृहीत धरुन तीनवेळा जाहिर केले की मित्र हो! आपल्या सर्वांच्या वतीने घुबड हा आपला राजा होय. घुबडाच्या नावाची राजा म्हणून घोषणा होताच कावळा विचार करुं लागला की घुबड कधीही रागावत नाही आणि ते रागेभरल्यावर कसे दिसेल! त्याने जर रागाच्या भरात प्रजेकडे पक्षाकडे नजर टाकली तर आपण गरम तव्यावर मीठ टाकल्यानंतर जसा प्रकार होतो त्याचप्रमाणे आपण सर्वजण विस्कळीत होऊ! आक्षेप ! मी त्याला राजा म्हणून स्विकारावयास तयार नाही. तुम्ही म्हणालात की घुबड हे आपला राजा होय! परंतु मी आपणा सर्वांना एक सूचना करु इच्छितो. सर्वच पक्षी म्हणाले ठीक आहे! मित्रा, परंतु हे आवश्यक आहे की तुम्ही चांगले सत्य व सम्यक बोलावे कारण येथे इतर हुशार, तरुण व समंजस पक्षी आहेत. कावळ्यास बोलण्याची संधी दिली.

कावळ्याला बोलण्याची संधी मिळताच तो बोलू लागला व म्हणाला मित्रहो घुबडाच्या चेहऱ्याकडे पहा. जेंव्हा ते आनंदी असते त्यावेळी ते कशाप्रकारे दिसते. परंतु रागावल्यानंतर कसे दिसेल. मी व्यक्तीशः त्याचा माझा राजा म्हणून स्विकार करीत नाही. मानत नाही. असे म्हणून कावळा ओरडत आकाशात उडुन गेला. मला घुबड नको आहे! मला घुबड नको आहे! घुबड उठून कावळ्याच्या पाठीमागे लागले, त्याचा पाठलाग करु लागले. तेंव्हापासून घुबड व कावळा एकमेकाचे कट्टर शत्रु आहेत. सर्वांनी राजहंस पक्षाची नंतर राजा म्हणून निवड केली व सभा संपली.

उत्तम व मधुर वाणीचे फायदे :

१. तुमच्याशी प्रत्येकजन प्रेमाने वागतील.

२. तुम्हाला शत्रु राहणार नाहीत.

३. तुम्ही स्वतः व इतर सुखी व शान्तमय जीवन जगणार

रागीट व बीभत्स (अभद्र) वाणीचे दुषःपरिणाम :

१. कोणीही आपल्यावर प्रेम करणार नाही.

२. कोणीही तुमच्याशी सलोखा ठेवणार नाही.

३. नाशाचे व शत्रुत्वाचे कारण (बनणार) होणार


बीभत्सवाणी व राग कसा नियंत्रित करावा

१. जेंव्हा आपणास राग आलेला असेल त्यावेळी काहीही करु नका. गप्प असावे किंवा ज्यामुळे मनाचे स्वास्थ्य बिघडविले आहे त्या व्यक्ती किंवा वस्तूपासून अलिप्त राहावे.

२. जर आपणास काही बोलावयाचे असेल तर ते थोडक्यात व जास्तीत जास्त सभ्यपणाने किंवा नम्रपणाने सांगावे.

३. विचार करावा की कोणीही परिपूर्ण नाही (निष्णात) तुम्हीच चूक केलेली आहे असे नाही. क्षमाशिलता व स्वनियंत्रण हिच खरी पध्दती इतराच्या चूकीबद्दल होय.





३०. विशाल करुणा

राजा बिंबीसार : संबोधीप्राप्तीपूर्वी बुध्द मगधदेशाचा राजा बिंबीसार यांना भेटले होते. राजाने बुध्दास निमंत्रण देऊन सांगितले होते की, मी आपणास माझे संपूर्ण राज्य देतो व ते सांभाळा. परंतु बुध्दाने राजा बिंबीसाराने दिलेले निमंत्रणसुध्दा नाकारले होते. ते राजाला म्हणाले होते की मला प्रथम सत्याचा शोध घ्यावयाचा आहे. तेंव्हा राजा म्हणाला होता ठीक आहे ज्यावेळी आपणास सत्याचा शोध होईल तो प्रथम मला सांगा. हा प्रसंग बुध्दास संबोधीप्राप्तीपूर्व एक वर्ष अगोदरचा होय!

बुध्द ह्या प्रसंगास विसरले नव्हते. योग्यवेळी त्यांनी अलवाक शहर ते राजगीर असा प्रवास प्रारंभ केला. राजगीर शहराच्या बाहेर टेकडीजवळ बुध्द त्यांच्या शिष्यासह पोहोचले व तेथे गुहेत वास करीत होते. राजा बिंबीसार नेहमी धम्म ऐकण्यासाठी त्या टेकडीकडे जात असत. त्या टेकडीवरील मृत-मासभक्षक माणसेसुध्दा बुध्दाचा धम्म ऐकत असत. शहरातील लोकसुध्दा धम्म जाणण्यासाठी त्या टेकडीकडे जात असत. बुध्दाच्या शिष्याची उपासकांची संख्या दिवसेंदिवस वाढत होती. त्यामुळे राजा बिंबीसार व तेथील व्यापाऱ्यानी बुध्दासाठी व शिष्याकरिता योग्य ठीकाण जेथे सर्वजण राहू शकतील असे वेळू वन दान दिले. तेथे सर्व लोक धम्म शिकवणूक शांतपणे ऐकू शकत होते.

देवदत्त – बुध्दाचा चुलतभाऊ देवदत्तसुध्दा भिक्खू म्हणून संघात होता. जेव्हा बुध्द कपीवस्तू शहरास भेटीसाठी गेले त्यावेळी असंख्य लोक बुध्दाच्या भेटीसाठी येत होते. हे पाहून देवदत्तच्या मनात द्वेष निर्माण झाला. कारण प्रत्येकजण बुध्दाप्रती आदर प्रदर्शित करीत होता. आणि मला कोणीही ओळखत नाही. मी सुध्दा बुध्दाप्रमाणे श्रेष्ठ आहे. मी

बुध्दाचा शेवट केलाच पाहिजे म्हणजे मग लोक मला आदरणीय म्हणून मानतील. त्याला माहित होते की आपणास कोणाची तरी मदत घ्यावी लागेल. म्हणून देवदत्त राजा बिंबीसारच्या अजातशत्रू ह्या मुलाकडे गेला. व म्हणाला की तुझ्या वडीलाकडेच राज्याचे सर्वश्रेष्ठ अधिकार का असावेत. तुझ्याकडे सुध्दा पाहिजेत, तू त्यांचा मुलगा आहे. तेंव्हा तू मला बुध्दाला मारण्यास मदत कर. मी तुला तुझ्या वडिलास मारण्यास मदत करतो. म्हणजे तू पुढे मगधचा राजा होशील.

दुष्टशब्द - अजातशत्रूने देवदत्ताचे दुष्ट शब्द ऐकले व परस्परास मदत करण्याचे ठरविले. बुध्दाला मारण्यासाठी त्यांनी अनेक प्रयोग केले. एकदा बुध्द ध्यानासाठी टेकडीजवळ बसले असता त्यांनी वरुन एक मोठा दगड खाली घरंगळत सोडला ज्यामुळे त्यांचा मृत्यू होईल अशी त्यांची अपेक्षा होती. परंतु दगड खाली येत असतां त्याचे दोन भाग होऊन बुध्दाच्या बाजूला पडले. बुध्द त्या प्रसंगामधुन सुरक्षित राहिले. दुसरा प्रसंग बुध्द एकदा शहरातून शिष्यासह जात असतांना दोन माणसांनी एका हत्तीला खूप मद्य पाजून व त्याला क्रोधीत करुन बुध्दाच्या अंगावर सोडले होते. ज्यामुळे क्रोधीत हत्ती बुध्दाला चिरडील, तुडविल व मारुन टाकेल.

जेंव्हा शिष्यांनी व लोकांनी पाहिले की हत्ती त्यांच्याकडे येत आहे ते सर्व घाबरुन सैरावैरा पळू लागले. केवळ बुध्दाचा निकट शिष्य आनंद बुध्दाजवळ राहिला. त्याने बुध्दाचे चिवर धरुन ठेवलेले होते. बुध्द घाबरुन जाण्याऐवजी व क्रोधीत होण्याऐवजी त्या हत्ती (चतुष्पाद) प्राण्याविषयी दया व करुणा त्याच्यात निर्माण झाली. जरी तो हत्ती मद्य प्यालेला व त्यामुळे वेडा झालेला होता तरीही बुध्दाच्या मनात त्या प्राण्याविषयी अमाप करुणा होती. तो हत्ती बुध्दाजवळ येऊन थांबला व नम्रपणे बुध्दासमोर झुकला. नतमस्तक झाला.

बुध्दाने हत्तीवर हळूवार थाप मारली आणि आनंदास म्हणाले आनंद, केवळ प्रेम व करुणाच द्वेषाचे उच्चाटन करु शकते. द्वेष वाढविल्याने द्वेष कमी होत नाही. म्हणून विश्वातील प्रत्येकाने करुणा व दया स्वतःमध्ये वृंध्दीगत केली पाहिजे. करुणा वृध्दी केल्यामुळेच आपण आनंदी व सुखी जीवन जगू शकू. केव्हाही अपवित्रता करुणा व दयावर विजय मिळवू शकणार नाही. कोणताही अपवाद मनात न ठेवता प्रत्येकाने विशेषतः बुध्द अनुयायानी प्रत्येक सजीवाबद्दल दया व करुणा ठेवावी.

३१. मांजर व कोंबडे

एकदा वाराणशी (बनारस) येथे ब्रम्हदत्त नावाचा राजा राज्य करीत होता. बोधीसत्व नावाचा कोंबडा त्याच्या हजारो कोंबड्यासह जवळच्या जंगलात राहत होता. एक मादी मांजर त्यांच्या जवळच राहत असे. ते मांजर कोंबड्याना अनेक आमिषे दाखऊन एक एक कोंबडे खात असे परंतु बोधीसत्व तिच्या अमिषाला बळी पडला नाही.

ते मांजर विचार करु लागले की हा कोंबडा फार हुशार आहे परंतु त्याला माहित नाही की मी (मांजर) किती हुशार आहे. मी असे अमिष दाखविण की त्यामुळे तोसुध्दा माझ्या जवळ योईल. मी तुझी पत्नी आहे असे अमिष दाखऊन जवळ करीन व त्याला खाईल. ती त्या झाडाजवळ गेली जेथून ती कोंबड्यास बोलू शकत होती की मालक तुझी मी पत्नी आहे! ती फांदी सोडा व माझेजवळ खाली या! जेंव्हा बोधीसत्वाने तिचे शब्द ऐकले तेंव्हा तो विचार करु लागला की ह्या मांजरीने माझे सर्व नातेवाईक खाऊन टाकले आणि आता मलाही अमिष दाखवित आहे. मी हिच्यापासून मुक्त झालो पाहिजे. म्हणून तो मांजरीला म्हणाला माझ्या हुशार मांजरी तुला चार पाय आहेत आणि मला दोन आणि म्हणून तू चतुष्पाद प्राणी व मी द्विपाद पक्षी आपल्या दोघांचा विवाह कसा काय शक्य आहे?

जरी मांजरीने कोंबड्याला अनेक प्रकारे फसविण्याचा प्रयत्न केला परंतु बोधीसत्वास फसवणूकीचे सर्व प्रकार माहीत होते. आणि शेवटी त्याला वाटले की मांजरीला दूर हाकलून लावावे. म्हणून तो म्हणाला, तू माझ्या नातलगांचे रक्त पिलेले आहे, लुटलेले आहे व त्यांना निर्घुणपणे ठार केलेले आहे. तुझ्या ह्या बोलण्यात काहीच दया नाही, तथ्य नाही. जेंव्हा तू माझ्याशी पत्नी म्हणून बोलते आहे. अशा संभाषणामुळे मांजर त्या ठीकाणाहून निघून गेले व कोंबड्याकडे पाहण्याची हिम्मतदेखील केली नाही.

दुष्ट माणसाच्या ह्दयात दया व सत्याचा अभाव असतो. स्वार्थी व्यक्तीच्या मनात करुणा व प्रामाणिकपणाचा अभाव असतो. प्रत्येक मनुष्य मृत्यूला भितो म्हणून हे लक्षात ठेवता कोणाचीही हत्या करु नये किंवा त्याच्या हत्तेचे कारण बनू नये. प्रत्येकाने खोटे बोलणे व अमिष दाखविणे टाळावे. आपल्या अंतःकरणापासून सत्य बोलावे.

३२. अप्रामाणिक व्यापारी

बनारसमध्ये एकदा एका व्यापाऱ्याच्या घरी एक मूल जन्मास आले. व्यापाऱ्याने त्याचे नांव शहाणा असे ठेवले. तो मोठा झाल्यावर भागिदारीमध्ये दुसऱ्या अतिशहाणा नावांच्या भागीदाराबरोबर व्यापार करु लागला. एकदा पांचशे बैलगाड्या माल घेऊन दोघेही बनारसहून दुसऱ्या देशात विक्रीसाठी गेले व त्या धंद्यात दोघांना खुप पैसा मिळाला.

परत घरी येतांना रस्त्यामध्ये भागीदारीचा प्रश्न निर्माण झाला. अतिशहाणा शहाण्यास म्हणाला मला तुझ्यापेक्षा दुप्पट भागीदारी पाहिजे कारण मी अतिशहाणा आहे. तू केवळ शहाणा आहेस. तुला एक हिस्सा व मला दोन हिस्से आवश्यक आहे. परंतु शहाणा म्हणाला आपल्या दोघांची भागीदारी समान आहे, गाड्या समान आहेत तेंव्हा दोघांचीही भागीदारी समान आहे. शहाणा म्हणाला तुला दुप्पट भागीदारी कशासाठी हवी आहे. तो म्हणाला मी अतिशहाणा आहे म्हणून मला दुप्पट भागीदारी आवश्यक आहे.

त्यांच्यातील संवाद वाढत जाऊन भांडणात रुपांतर झाले. अतिशहाण्याने विचार केला व योजना तयार करुन आपल्या वडीलास एका झाडाच्या पोकळीत लपवून ठेवून वडीलास सांगितले की आम्ही झाडाजवळ येताच असे म्हणा की अतिशहाण्यास दुप्पट भागीदारी द्या!

नियोजनाप्रमाणे अतिशहाण्याने शहाण्यास झाडाजवळ नेले व झाडास खोटी विचारना केली. हे झाडाच्या आत्म्या आमच्या भागीदारीविषयी सांग. दोघेही व्यापारातील भागीदार आहोत. आमचे हिस्से कसे असावेत ते सांग.

झाडामधुन आवाज आला की अतिशहाण्यास दोन हिस्से तर शहाण्यास एक हिस्सा देण्यात यावा, असा झाडामधुन आवाज आला. शहाण्याने विचार करुन ठरविले की, हा आवाज खरोखर झाडाच्या आत्म्याचाच आहे काय ते शोधू. म्हणून त्याने झाडांच्या पोकळीत गवत काड्याभरल्या व त्याला आग लावली. अतिशहाण्याचे वडिल त्यात भाजले व पोकळीतून झाडावर चढले आणि खाली पडले. अशाप्रकारे अतिशहाण्याची लबाडी उघडी पडली. आणि शहाणा त्यात विजयी झाला व त्यांनी भागीदारीचे समान दोन हिस्से केले.

आपण काय शिकलो :

अतिशहाणा आपल्या मित्राशी अप्रामाणिक होता. त्याच्या मनास अप्रामाणिकपणा व अधाशीपणाने वेढलेले होते. तो स्वार्थी होता. मित्राशी असे वर्तन अयोग्य होय! शहाणा हा चांगला मित्र होता. जो दुसऱ्याशी अप्रामाणिक असतो तो खरा मित्र नव्हे. कोणीही अशा लोकांशी मित्रत्व करीत नाही. प्रामाणिकपणे अशा व्यक्ती कोणासही आवडतं नाहीत.

बुध्दास समर्पण

ह्या कार्यापासून अशी इच्छा प्रकट करतो मनी
चांगलेपणा व नीति प्राप्त होवो ध्यानी
दयेचा मोबदला चौफेर वाढो जणी
सौंदर्यवृध्दी होईल बुध्दभूमि मनोमनी

दुःख मुक्तीसाठी
तीन रत्न दिधले
प्रज्ञा, शील, करुणा
आधार केले

बध्दिवादी धम्म ग्रहण करतात
त्यांचे हृदयी जाण प्राप्त करतात
उर्वरित आयुष्यात शिकवण जोपासतात
जन्मभर मौलिक धन्यता मानतात

पूजा बुध्दाची करतात
वंदन बुध्दास करतात
वंदन धम्मास करतात
वंदन संघास करतात.

शब्द सूची

राग - तीव्र भावना निर्मिती होणे, चूक किंवा अपमानकारक प्रसंगी किंवा अन्यायकारक प्रसंगी व्यक्तीचे दुसऱ्याशी भांडण/मारामारी होणे

अरहंत - दिव्यत्व प्राप्त भिक्खू ज्याचे मन सर्वस्वी द्वेष, दुःख, भ्रम ह्यापासून मुक्त असते.

आषाढ महिना - भिक्खू ह्या महिण्यात वर्षावास प्रारंभ करतात.

भिक्खू - शिस्तप्रिय जीवन जगणारा. साधे जीवन जगणारा.

मंगल - योग्य वेळ, योग्य प्रसंग, चांगली वेळ

भिक्खू - बुध्द भिक्खू

बोधिसत्व - जगाच्या शान्तीकरीता/आनंदाकरीता कार्य करणारे.

बोधिवृक्ष - उत्तरपूर्व भारतातील बिहार राज्यातील मगध शहराजवळील बुध्दगया येथील वृक्ष जेथे बुध्दाला प्रथम संबोधी प्राप्त झाली.

ब्रह्मा - हिन्दू देव - ज्याने विश्वाची निर्मिती केली असे म्हणतात.

ब्राह्मण - उच्च वर्गीय हिन्दू जातीमधील एक समाज. जो हिन्दू कुटूंबामध्ये मानला आहे.

बुध्द - बुध्दधम्माचे संस्थापक. दिव्यत्व प्राप्त झालेले, ज्ञानप्राप्ती झालेले. उच्च प्रतीला पोहोचलेले, जागृत व पूर्ण निष्णात व्यक्ती. भारतात इ. स. पूर्व ५८८ मध्ये बुध्दधम्माची स्थापना केलेले गौतमबुध्द

बुध्दानुसत्ती - बुध्दशिकवणूक, स्वतःला समजून घेण्यासाठी बुध्दाने दिलेली शिकवणूक.

परोपकार - बुध्दधम्मातील मुख्य शिकवणूक. गरीबाविषयी दया, सर्व सजीवाविषयी करुणेची वृध्दी करणे.

दया - दुसऱ्याच्या दुःखाविषयी वाईट वाटणे.

समाधिभावना - मनास एकाग्रतेकडे नेणारी अवस्था.

उत्कट इच्छा - तीव्र इच्छा

भ्रम - चूकीचा समज मनाची भ्रामक अवस्था, विचारांची भ्रामक अवस्था.

इच्छा - तीव्र आकर्षण

धम्म - बुध्दाची शिकवण, सत्याची शिकवण

धम्मानुसक्ती - बुध्दाच्या नीति विषयक धम्माच्या संस्मृती

असंतोष - असामाधानी विचार.

शिकवण (तत्व) - बुध्दधम्माची शिकवण, विहारामधुन शिकविली जाणारी.

लोकधम्म - १) प्राप्ती - तोटा २) प्रसिध्दी - अप्रतीष्ठा ३) आनंद - दुःख ४)

प्रशंसनीय - अप्रशंसनीय ह्याचा मध्यम पथ

दृष्यस्वरुप - दयेचे प्रत्यक्ष रुप

दृष्यस्वरुपमूर्ति - विचार, भावना व कल्पकता ह्यास आकारणारी बुध्दाची करुणारुपी मुद्रा.

दिव्यत्वप्राप्ती - मनाची निष्णात अवस्था

पहिला धम्मोपदेश - सारनाथ येथे बुध्दाने आपल्या पहिल्या पांच शिष्याना धम्मोपदेश केला. धम्मचक्र प्रवर्तन सूत्त. बुध्दाची पहिली शिकवणूक.

१२५० भिक्खूची परिषद - वेळूवन येथे ही धम्म परिषद भरली होती. त्यातील चार महत्वाचे प्रसंग १) १२५० भिक्खू अरहंत होते. २) त्यांना बुध्दाने स्वतः प्रमाणित केलेले होते. ३) ते स्वतः पूर्व सूचना नसतांना एकत्र आले होते. ४) ती माघ महिन्यातील पौर्णिमा होती.

औदार्य - निःस्वार्थी, उदार

कृतज्ञ - उपकार स्मरणारा

लोभ - हावरटपणा, लोभीपणा

द्वेष - तीव्र नापसंती

हिन्दू - भारतातील हिन्दू व्यक्ती

हिनयान - थेरवाद, बुध्दधम्मातील दक्षिणी गट.

कृतज्ञता - उपकाराबद्दल धन्यता मानणे.

आदरणीय - बुध्दाबद्दल आदर, पूज्यता व्यक्त करणे.

नम्रता - लीनता, मनाची विनम्र अवस्था.

अज्ञान - अशिक्षित, दूरदृष्टीचा अभाव, सृष्टीचक्राविषयी अज्ञान

बदल - हळूहळू क्षीण होऊन बदल होणे.

विपश्यना - सूक्ष्मदृष्टी. उच्चस्तरीय जाणीव व विचार क्षमता वृध्दी होणे. विचार क्षमतेची सूक्ष्मदृष्टी प्राप्त करणे.

कठीण चीवरदान - वर्षावास समाप्ती दिनी भिक्खूस चीवरदान करणे.

सामान्य उपासक - पंचशीलाचे प्रामाणिकपणे पालन करणारे सामान्य व्यक्ती. परंतु ते भिक्खू, भिक्खूणी किंवा नवभिक्खू नसतात.

सामान्य जनता - जे उपासक नाहीत किंवा भिक्खू भिक्खूणी किंवा नवभिक्खू नसतात, ते सामान्य जनता होय.

लॉकथाँग - पानाचे तयार केलेले द्रोण. पाण्यावर ठेवून नदीत तरंगत ठेवण्याचा उत्सव. थायलंडमध्ये लॉ-क्रथाँग हा उत्साहात साजरा करतात.

औदार्य - मनाचा उदारपणा मन सर्व अकुशल बाबीपासून मुक्त असणे. मन दिव्यत्वप्राप्ती झालेले असणे.

चांद्रमास - २९.५ दिवस एका पौर्णिमेपासून दुसऱ्या पौर्णिमेपर्यंतचे एकूण दिवस म्हणजे चांद्रमास.

महायान - बुध्दाच्या नंतर शंभर वर्षानी महायान संप्रदाय निर्माण झाला. उत्तरीय भागात महायान संप्रदाय अस्तित्वात आहे.

पवित्र ठीकाण - जेथे बुध्द भिक्खूसंघ असतो त्याठीकाणास पवित्र स्थळ मानतात. पालीमध्ये उपोसत्त म्हणतात.

ध्यान - मन केंद्रित करणे. मन एकाग्र कसे करावे ते ध्यानातून साधता येते. प्रज्ञा प्राप्ती मधुन मन शुध्द, स्वच्छ करुन शान्ती मिळविणे.

मंगलकाम - कुशलकार्य, पवित्रकृती, दान करणे चांगल्या कार्यासाठी दान देणे. गरजूना दान देणे.

मध्यममार्ग - अष्टांगिक मार्ग. पवित्र अष्टागिक मार्ग, सम्यक विचार पासून प्रारंभ होऊन सम्यक एकाग्रता (समाधी) मध्ये पूर्ण होतो. निब्बाण, दिव्यत्वाकडे नेणारा मार्ग.

विहार - जेथे बुध्द भिक्खू वास करतात त्यास विहार म्हणतात.

भिक्खू - २२७ शीलाचे पालन करणाऱ्या व्यक्ती धम्माच्या कार्यासाठी विहारात राहून समाजाला धम्म देणाऱ्या व्यक्ती भिक्खू होत.

सदाचार - चांगले वर्तन, प्रत्यक्ष नीति शिक्षण. सम्यक तत्व, धम्मातील पांच शीलाचे आचरण

नवभिक्खू - तरुण भिक्खू ज्याचे वय वीसपेक्षा कमी आहे त्यांना दहा शीलाचे पालन करावे लागते. त्यांचा संघात प्रवेश व्हावयाचा असतो.

आज्ञापालन - सांगितलेले काम करणे. बुध्दी, हेतूपरस्सर आज्ञापालन.

गृहहीन - गृहहीनव्यक्ती समाजाने बाहेर वाळीत टाकलेली व्यक्ती, जी व्यक्ती नीच जातीमध्ये जन्मलेली असते.

धम्मदिक्षा - विहारसंस्थेचे जीवन व्यतीत करणारे भिखू, भिक्खूणी किंवा नव भिक्खू.

पंचशील - बुध्दधम्मातील पाच तत्वे, शीलाविषयी सजीवाची हत्त्या, चोरी, व्यभिचार, मिथ्याचार व मद्यपान पासून अलिप्त राहणे.

प्रज्ञा - मनाची स्पष्ट स्थिती, आंतरदृष्टी, बुध्दीमत्ता व प्रश्न उकल करण्याची क्षमता म्हणजे प्रज्ञा.

चिकाटी - कोणताही प्रश्न शांतपणे व गोंधळून न जाता सोडविणे.

शील - पांच शील ग्रहण करणे.

वर्षावास - भिक्खू पावसाळ्यात एका ठीकाणी थांबतात व ध्यानभावना करतात. धम्माचा अभ्यास करतात. पावसाळा हा भिक्खूसाठी विश्रांती व अभ्यास करण्यासाठीचा कालावधी होय.

सालवृक्ष - सालवृक्षाखाली बुध्दाचा जन्म झाला होता व कुशीनगर उत्तरभारत येथे सालवृक्षाखालीच निर्वाण प्राप्त झाले होते.

समाधी - मन एका विशिष्ट संवेदनेने एकाग्र करणे व शांती प्राप्त करणे.
संघ - भिक्खूचा संच म्हणजे संघ. बुध्द उपासकाचा संच किमान पंचशीलाचे पालन करणारा संच.
संघानुसत्ती - बुध्द उपासकाकरीता संस्मृती नीति
निःस्वार्थी - अहंकार, विरहीत, मी, तू, आम्ही विरहीत अवस्था
धम्मोपदेश - बुध्दाने शिकवण विषयीक दिलेली प्रवचने.
शील - नीतिवर्तन, नीतिसंहिता.
सोंगक्रान - एप्रिलच्या मध्यावधीत थायलंड, ब्रम्हदेश, लाओस देशामध्ये सुगंधी पाणी (गुलाबपाणी) वर्षाव करुन नववर्ष उत्सव साजरा करतात.
सुखोथाई काळ - २७० वर्षाच्या काळात राजा सुखोथाईने बुध्दधम्म थायलंडमध्ये उत्तमप्रकारे वृध्दींगत केला.
मंदिर - बुध्दविहार, जेथे बुध्द भिक्खू वास करतात.
थेरवाद - बुध्दसंप्रदाय दक्षिण आशियायी देशात विकास पावलेला बुध्दधम्म.
त्रिरत्न - बुध्द, धम्म व संघ. बुध्द, बुध्दाची शिकवण व आदरणीय संघ.
वैशाखमास - सिध्दार्थाचा जन्म, दिव्यत्वप्राप्ती व महापरिनिर्वाण हे तीनही प्रसंग वैशाख महिन्यातील पौर्णिमेस घडलेले आहेत.
वैशाखपूजा - वैशाख पौर्णिमेस बुध्दाप्रती आदर व्यक्त करुन त्यांची पूजा करणे.
प्रज्ञा - ज्ञानवान, सत्याची जाणीव असलेला, वास्तवता जाणून घेणारा व समंजस विचारी.
बुध्दानुसत्ती - बुध्दाच्या नीतिविषयक गुणांची संस्मृति.
बुध्दधम्म - बुध्दाची शिकवणूक, दिव्यत्व प्राप्त बुध्दाने ज्या शिकवणूकीचा भारतात प्रारंभ केला. स्वतःला जाणून घेण्याची विचार प्रक्रिया.
परिक्रमा - बुध्दउपासक काही ठिकाणी विहारातील मूर्ती आपल्या उजव्याबाजूस येईल अशा तऱ्हेने विहारास तीन फेऱ्या मारतात.
समाधान - मानवाने जे आहे त्यात समाधान मानणे. अल्पसंतोषी असणे, म्हणजे लोभ प्रवृत्तीच्या विरुध्द असणे.
बहूश्रृत सभा - वेळूवनात बुध्दाच्या उपस्थितीत झालेली १२५० अरहंत भिक्खूची सभा. ही माघ महिन्यातील पौर्णिमेस झालेली सभा होय.
शरणार्थी - धोका किंवा त्रास यासाठी संरक्षण घेणे, बुध्दास शरण जाणे.
कंदन - कोंडिण्य, संघाचा अरहंत प्राप्त पहिला भिक्खू.

The single purpose of Buddhas' Birth into the world is to expound the Forty-Eight Great Vows of Amitabha Buddha!



बुध्द - अजिंठा लेणी

"Wherever the Buddha's teachings have flourished,
either in cities or countrysides,
people would gain inconceivable benefits.
The land and people would be enveloped in peace.
The sun and moon will shine clear and bright.
Wind and rain would appear accordingly,
and there will be no disasters.
Nations would be prosperous
and there would be no use for soldiers or weapons.
People would abide by morality and accord with laws.
They would be courteous and humble,
and everyone would be content without injustices.
There would be no thefts or violence.
The strong would not dominate the weak
and everyone would get their fair share."

**※ THE BUDDHA SPEAKS OF
THE INFINITE LIFE SUTRA OF
ADORNMENT, PURITY, EQUALITY
AND ENLIGHTENMENT OF**
THE MAHAYANA SCHOOL ※

With bad advisors forever left behind,
From paths of evil he departs for eternity,
Soon to see the Buddha of Limitless Light
And perfect Samantabhadra's Supreme Vows.

The supreme and endless blessings
of Samantabhadra's deeds,
I now universally transfer.
May every living being, drowning and adrift,
Soon return to the Pure Land of
Limitless Light!

~The Vows of Samantabhadra~

I vow that when my life approaches its end,
All obstructions will be swept away;
I will see Amitabha Buddha,
And be born in His Western Pure Land of
Ultimate Bliss and Peace.

When reborn in the Western Pure Land,
I will perfect and completely fulfill
Without exception these Great Vows,
To delight and benefit all beings.

~The Vows of Samantabhadra
Avatamsaka Sutra~